१० डिसेंबर १९६६

साप्ताहिक


# माणूस

चाळीस पैसे

?

## वेंगालील कृष्णन् कृष्ण मेनन

## पुढे काय?



श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २





एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : तेवीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्था विभाग
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र - मैत्री

स. न.  नोव्हें. २०

'माणूस'चा दीपावली अंक श्रेष्ठांच्या पंक्तित मानाचे पान मिळविण्याइतका छान निघालाय. अभिनंदन.

विशेषत: 'कश्मीर' लेखमाला श्री. वि. स. वाळिंबे यांच्या सखोल अभ्यासाचे दर्शन घडविते. हे श्री. वाळिंबे कोण? लेखकाचा परिचय अधून-मधून दिल्याने वाचकांना त्या लेखकाच्या नव्या कृतीबद्दल ओढ वाटते हे 'माणूस' जाणीत असेलच.

ऐतिहासिकदृष्टचा एक गोष्ट लेखात समाविष्ट व्हायला हवी होती. श्री. फ्रँक मोराएस यांनी नेहरू चरित्रात (पृष्ठ ३९५) म्हटले आहे की, भारताने संयुक्त राष्ट्रसंघाकडे ३४–३५ कलमानुसार तक्रार करण्यात चूक झालेली आहे. कारण ३४–३५ कलमे प्रकरण सहाखाली येतात. प्रकरण सहा "वादग्रस्त प्रश्नांची शांततामय मार्गाने सोडवणूक" असे आहे. या प्रकरणाखाली तक्रार करून भारताने सुरक्षासमितीला पाकिस्तानने केलेल्या पोकळ प्रत्यारोपांची चर्चा करण्यास संधी दिली व त्यामुळे चर्चा मूळच्या "पाकिस्तानी आक्रमणाच्या" प्रश्नापासून फार दूर गेली. त्याऐवजी भारताने प्रकरण सात "आक्रमक कृत्ये" या खाली तक्रार नोंदविणे आवश्यक होते. विधिज्ञ अशा प्रश्नांचे महत्त्व ओळखतात म्हणूनच ही मूळ चूक कशी झाली हे उजेडात येणे ऐतिहासिकदृष्टचा आवश्यक आहे.

कश्मिरलढ्यातील सुवर्णक्षण 'हाजीपीर'चा खिंडीत भारतीय जवानांनी

अनुभवला त्याचा ओझरता उल्लेख या लेखात करायला हवा होता. दोनदा आपल्या जवानांनी हे यश मिळविले व वाटाघाटीच्या जुगारात आपण ते हरवले हे सत्यार्थाने 'हाजीपीर' वद्दलच म्हणता येईल. असो.

'माणूस'ची अशीच प्रगतीकडे वाटचाल होवो.

**ज्ञानेश्वर धोंगडे, मुंबई.**

**स. न.** **नोव्हें. २४**

आपला दिवाळी अंक मिळाला. धन्यवाद ! अंक वाचनीय आहे. अनेक क्षेत्रांना स्पर्श केल्यामुळे 'माणूस' सुस्वादू व रसिकराज ठरला आहे.

या म्हसावद गावी एका महान् स्वामींचे आगमन झाले आहे. अंकातील काही भाग त्यांना हिंदी भाषेतून सांगितल्यावर त्यांनी सहज जे 'दोन शब्द' सांगितले ते आपल्याकडे पाठवीत आहे. स्वामीजी सिद्धहस्त लेखकही आहेत. मातृभाषा मराठी नसल्यामुळे त्यांनी आपले विचार हिंदीमध्ये व्यक्त केले आहेत. ते हिंदीमधे कृपया छापावे.

**चौधरी, धुळे.**

**स. न.**

अप्रत्याशित रूपेन आप इस लेखको हिन्दीमें देखकर संभवत: कुछ आश्चर्यान्वित होंगे। ठीक वैसेही अनायास आज आपके द्वारा सम्पादित साप्ताहिक 'माणूस' देखकर मुझे भी कुछ कुतूहल हुआ, जिससें प्रेरित होकर अन्तर्मन से जाने क्यों एक उद्‌गार वाहर आनेके लिए छटापटाने लगा और तत्कालही इस प्रेरणाको लिपिवद्ध करनेकी इच्छा हुई।

संभवत: उसमें एक प्रधान तथा सामान्य कारण है आपका नामकरण–संस्कार ज्यों कि सामान्य रूपसे मानव–मात्रको अपनी ओर आकर्षित किए वगैर नहीं रहता। केवल आकर्षण ही नहीं अपितु कुछ और भी उससे हमें मिलता है और वह है 'मनुष्य' की वैयक्तिक एवं सामाजिक स्थितिकी उत्प्रेरणा।

'माणूस' शब्द मानव-मात्र के लिए एक अत्यंत लुभावना शब्द है जो कि अनंत कालसे मानव-मस्तिष्कमें एक अधिकार जमाये हुए है और समय-समय पर मानवने इस शब्दपर विचार तथा मनन भी किया है। और अपने अनुभवसे एक निष्कर्ष पर भी पहुँचा है। भारतके प्राचीन विचारक-वर्गने 'मनुष्य' शब्दका एक व्यापक अर्थ किया है–'मनन्येषु मनुष्य:।' जिससे साधारणतया हम समझते हैं कि 'मनुष्य' शब्द न कि किसी एक प्राकृतिक रूपसे संबंधित रूप-विशेष-शरीर-धारी के लिए प्रयुक्त किया गया है अपितु एक विशिष्ट–शरीर-धारी जीवका गुण-मूलक विश्लेषीकरण हैं। इसके अभाव-मात्रसे 'मनुष्य' के पास 'मनुष्य' कहलानेके लिए क्या बचता है, कहना अशक्य है। तथापि जाने क्यों मनुष्यमें उस सामान्य–गुण–धर्मका आधिक्य न होकर कम से कम का भी समावेश यथोचित रूपमें नहीं पाया जाता है।

वास्तवमें वही कारण है, जिससे आपके साप्ताहिक 'माणूस' को देखकर इस विचारके द्वारा एक शंकाका समाधान करवानेकी इच्छा हुई। कए

'माणूस' के नाते एक 'माणूस' के संसर्गमें आनेका 'माणूस' का जन्मसिद्ध अधिकार है–संभवतः आजके तथाकथित सभ्य एवं सुशिक्षित समाजके लिए मान्य न हो, तथापि इसकी विशेषताको तो हर मनन-शील मनुष्य मानेगाही।

'माणूस' नामसे आपने जो एक साप्ताहिक शुरू किया है वह अत्यंतही 'सराहनीय' प्रयत्न है, कारण आजकी इस भौतिकवाद कि विभीषिका ने तो 'मनुष्य' को हर प्रकारसे यन्त्रवत् बनाकर रख दिया है। यदि इसी प्रकारसे मानवने अपने स्वनिर्मित यन्त्रके सामने घुटन टेक दिया तो मानव-जीवन का बौद्धिक एवं आध्यात्मिक ( Intellectual and Spiritual) पक्षका भविष्य तो अंधःकार के गौहर-गर्त में पडा पडा सडता रहेगा। फिर तो मनुष्यका परित्राण अशक्य ही नहीं, असंभव ही अधिक दिखेगा, तब मनुष्य मनुष्य न रहकर एक यन्त्राधिकृत यन्त्रवत् जडत्वमें घेरकर अपनी अखिल मानवीय परम्पराको खोकर अपना सर्वनाश कर लेगा। जिससे न तो मानव-जीवन के उद्देश्यकी पूर्ति होती है और न तो होती है मानव-समाजकी सेवा; फिर वह चेतनत्व का प्रतिरूप मानवतावादके आधारपर मानवका क्या अस्तित्व है या होगा, समझना कठिन है।

आशा है, आपके प्रयत्न कृतकार्य होकर 'माणूस' नामको सार्थक कर प्रत्येक भ्रमित मानवको समझानेमें 'सफल' हो कि 'मनुष्य' क्या है, 'मनुष्य' को क्या होना चाहिए?

और आपकी पत्रिकाका 'नामकरण-संस्कार' से वह आशा की जा सकती है कि आप वास्तविक रूपमें मनुष्य–मात्रका पथ-प्रदर्शन कर समाजकी सेवा करें। सेवाही मानवका एकमात्र धर्म है। जिस अभावमें कोई भी धर्म मनुष्य को मनुष्य बनानेमें समर्थ नहीं है, अन्यथा आज संसार महामानवकी महान् क्रीडाभूमिही नजर आता। इसके विपरित आज संसारभरके मानव बोझिल, थकित, हतोत्साह और कुण्ठितही नजर आते हैं, स्वार्थ के भयंकर विषने यहाँपर सबकुछ विषास्त कर रखा है। आज शायदही किसी मनुष्यमें स्वार्थहीन जीवन बितानेका साहस शेष रह गया है! कारण, वह भ्रमित-मानव जो कुछ सोचता है, उसको कार्यरूपमें परिवर्तनके स्थानपर बौद्धिक-वमन तक ही सीमित कर रखा है। और हम देखतें आ रहे हैं कि इस 'Intellectual Vomitting' से मौलिक रूपमें आजपर्यन्त कोई ठोस काम तो दूर उसकी आधार-शिला भी स्थापित नहीं कर पाये हैं। इस संदर्भमें संसारके एक प्रख्यात विद्वान श्री. रोमा रोलाँ ने ठीक ही कहा है–" Action is the end of thought. All thoughts that doesn't look towards action is an abortion and a treachery." अपितु आप आज हमारे समाजकी स्थितिमें एवं गतिमें मोड लायें और हमें कर्तव्य-कर्मसे पराङ्मुख होनेसे बचाकर भारतमाताकी सन्तानोंमें राष्ट्रीयता का महामन्त्र फूंककर सजीवताका संचार करें। धन्यवाद!

**– एक घुमक्कड**



# ‘ सिंडिकेट ’ची कामराज यांच्यावर मात !

गृहमंत्रिपदाचा वाद निकाली निघाल्यानंतर व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या तिकीट-प्रकरणाने येथे जोरदार वादळ निर्माण केले. मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने शिफारस केलेल्या नावांचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती निवडणूक समितीची नुकतीच जी बैठक भरली होती तीत मेनन यांच्या तिकीट प्रकरणासंबंधी दोन तास चर्चा चालू होती. यावरून हे प्रकरण किती चिघळले आहे याची कल्पना येईल.

गेल्या दोन निवडणुकांमध्ये श्री. मेनन उत्तर मुंबई मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. त्यामुळे या वेळेसही त्यांनी मुंबई प्रदेश काँग्रेसकडे तिकिटासाठी अर्ज धाडला. सामान्यत: उमेदवारांचा मतदारसंघ बदलावयाचा नाही असे धोरण मध्यवर्ती निवडणूक समितीने आखले असल्यामुळे मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने आपल्याला तिकिट द्यावयास हवे, असा आग्रह मेनन यांनी धरला. परंतु मध्यंतरी ‘ घेरा डालो ’ व ‘ मुंबई बंद ’ या आंदोलनांचे निमित्त साधून महाराष्ट्र सरकारविरुद्ध व पर्यायाने श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याविरुद्ध मोहीम उघडण्यासाठी श्री. स. का. पाटील यांच्या आशीर्वादाने मुंबईमधल्या काँग्रेस आमदारांनी विधानसभा-सदस्यत्वाचे राजीनामे देण्याचे ‘नाटक’ केले. ‘ नाटक ’ हा शब्द येथे अशासाठी वापरला की या पाटील-पुरस्कृत बंडावाबत ताठर भूमिका स्वीकारा, असा काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना कानमंत्र देताच श्री. पु. ग. खेर प्रभृतींनी यशस्वी माघार घेतली. कसेही करून मंत्रिपद टिकविण्यासाठी धडपडणाऱ्या होमी तल्यारखानांनी गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांच्यापुढे नागपूर मुक्कामी लोटांगण घातले.

या साऱ्या अपमानास्पद प्रकाराच्या वेळी ताठ राहण्याचे धैर्य श्री. शांतिलाल शहा यांना दाखवावे लागले. एकतर तल्यारखानी तंत्र अवलंबिण्याइतका त्यांचा स्वभाव

लवचिक नाही. शिवाय निवडणुकीनंतर तयार होणाऱ्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आपल्याला स्थान राहणार नाही हेही त्यांना पक्के ठाऊक होते. त्यामुळे मंत्रिपदाचा राजीनामा देऊन आताच हुतात्मा होणे व या त्यागाच्या बदल्यात लोकसभेची जागा हस्तगत करणे शांतिलाल शहांना जास्त व्यवहार्य वाटले. याच सुमारास आपण मुंबईतून लोकसभेसाठी उभे राहाल काय अशी पाटील यांनी स. गो. बर्वे यांना विचारणा केली होती व त्यांनीही आपला होकार कळविला होता.

आगामी निवडणुकीसाठी जुन्या उत्तर मुंबई मतदारसंघाचे वायव्य व ईशान्य असे दोन विभाग करण्यात आले आहेत. त्यातील एकासाठी श्री. शांतिलाल शहा व दुसऱ्या विभागासाठी श्री. स. गो. बर्वे असे दोन उमेदवार श्री. पाटील यांनी त्याच-वेळी निश्चित केले असल्यामुळे आपण मुंबई प्रदेश काँग्रेसऐवजी दुसऱ्या प्रदेश काँग्रेसकडे तिकिटासाठी अर्ज करावा असे कृष्ण मेनन यांना कळविण्यात आले. पं. नेहरू यांनी लादलेला उमेदवार त्यांच्या निधनानंतर उडवून लावण्याच्या दृष्टीने स. का. पाटील यांनी हा सारा खटाटोप सुरू केला.

मेनन हेही पाटलांइतकेच उग्रप्रकृती आहेत. त्यामुळे उभा राहीन तर मुंबईमधल्या आपल्या सध्याच्या मतदारसंघामधूनच असे त्यांनी जाहीर केले. या सुमारास दुसऱ्या काही कामासाठी मी त्यांना भेटावयास गेलो होतो. त्यांचे निवासस्थान तीन मूर्ति भवनाच्या समोरच आहे. मी तेथे गेलो तेव्हा सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या एका दाव्याच्या वकील पत्राची तयारी करण्यात ते गढून गेले होते. मी त्यांच्या खोलीत गेलो. तेव्हा पुस्तकांचे ढिगारे पुढे ठेवून कसली तरी टिपणे काढण्यात ते गढून गेले होते. कामकाजाचे बोलणे पुरे झाल्यानंतर त्यांच्या तिकिटाचा प्रश्न बराच चर्चिला जात आहे असे मी म्हणताच. मेनन म्हणाले, " हे बघा, मी माझी भूमिका आधीच स्पष्ट केली आहे. केवळ एखाद्या व्यक्तीला मी नको आहे म्हणून मी मतदारसंघ बदलावा ही भूमिका मला कधीच मान्य होणार नाही. मुंबई प्रदेश काँग्रेसच्या सूत्र-धारांकडे दयेची याचना करण्याचे मला काय कारण ? तिकिटे देण्याचा प्रश्न सर्वस्वी मध्यवर्ती निवडणूक मंडळाच्या कक्षेतील आहे. केंद्रीय काँग्रेस नेत्यांना मी जर लोकसभेत हवा असेन तर त्यांनी माझा हा आग्रह मानला पाहिजे. मी त्यांना नको असेन तर त्यांनी तसे स्पष्ट कळविले पाहिजे. लोकसभेतील जागा मिळविण्या-साठी कोणत्याही खालच्या पातळीवर जाऊन उभे राहण्याची माझी इच्छा नाही. खरे म्हणजे ते माझ्या स्वभावातच नाही. आणि एवढी धडपड करण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयातले माझे कामकाज मी नियमितपणे पाहिले तरी तासाला हजार रुपये मी सहज मिळवीन."

मेनन यांची ही भूमिका जेव्हा जाहीर झाली तेव्हा पाटील यांनी आणखी एक डाव टाकला. उत्तर मुंबईऐवजी मध्य मुंबईतून मेनन यांनी उभे राहावे, असे त्यांनी सुचविले. या मतदारसंघातून कम्युनिस्ट नेते श्री. श्री. अ. डांगे यांना उभे करण्याचे

संपूर्ण महाराष्ट्र समितीने ठरविले असल्यामुळे डांगे विरुद्ध मेनन हा सामना होऊ देण्यास पाटलांची हरकत नव्हती. तसे झाले असते तर डावे काँग्रेसवाले व उजवे कम्युनिस्ट अनायासेच पेचात सापडले असते. परंतु आपल्या जुन्या मतदारसंघाऐवजी दुसरा कोणताही मतदारसंघ स्वीकारण्यास मेनन यांनी नकार दिल्यामुळे पाटलांचा हा बार वाया गेला.

या मेनन-प्रकरणाचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती निवडणूक मंडळाची नुकतीच जी बैठक भरली होती तीत मेननविरुद्ध पाटील या संघर्षामागचा निवडणुकीनंतर सत्ता हस्तगत करण्याचा जो अंतिम संघर्ष होणार आहे त्याची चुणूक दिसून आली. इंदिरा गांधी व कामराज या दोघांनीही मेनन यांची मागणी मान्य केली पाहिजे, असे आपले मत असल्याचे सांगितले. सरकारप्रमुख व पक्षप्रमुख या दोघांनी आपले मानस जाहीर केल्यानंतरही पाटलांनी आपली ताठर भूमिका कायम ठेवली. यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम व गुलाम महंमद सादिक यांनी इंदिरा गांधी–कामराज यांच्या भूमिकेला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले तर अतुल्य घोष, चंद्रभानू गुप्ता, डॉ. रामसुभगसिंग प्रभृतींनी आपण पाटील यांच्या पाठीमागे उभे असल्याचे सांगितले. ही बैठक संपण्यापूर्वी इंदिरा गांधी व सादिक अन्य कामासाठी बाहेर गेले. त्यामुळे उर्वरित सदस्यांत बहुमत पाटलांच्या बाजूचे होते. ते मान्य करण्यावाचून कामराज यांना गत्यंतर नव्हते. शेवटी तात्पुरती तडजोड म्हणून कामराजांनी या प्रकरणाचा निर्णय करावा असे सुचविण्यात आले. अर्थात् दुसरी-कडून उभे राहण्याबाबत कामराज यांनी मेनन यांचे मन वळवावे यावर या सूचनेत भर देण्यात आला.

दुसऱ्या दिवशी कामराज मद्रासला निघून गेले व गुरुवारी दिल्लीत परतल्या-नंतर यासंबंधीचा निर्णय जाहीर करू असे त्यांनी सांगितले. दुपारी इंदिरा गांधी प्रेसक्लबमध्ये आल्या तेव्हा मेनन यांच्या तिकिटासंबंधी पत्रकारांनी त्यांना छेडले. मेनन यांना ईशान्य मुंबईतील जागा मिळाली पाहिजे, असे आपले वैयक्तिक मत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. परंतु कामराज येथे परत येईपर्यंत काहीच ठर-णार नसल्यामुळे दोन-चार दिवस पत्रकार स्वस्थ होते. या मधल्या काळात पाटील, अतुल्य घोष प्रभृति सिंडिकेटच्या सभासदांची दररोज बैठक होत होती व काहीही झाले तरी मेनन प्रकरणांत माघार न घेता कामराज, इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध निर्धाराने उभे राहावयाचे हा बेत पक्का केला. कामराज दिल्लीला परतावयाच्या आदल्या दिवशी मी पाटील यांना सहज विचारले, " मेनन-प्रकरणातून काय निष्पन्न होणार आहे ? "

" बर्वे ईशान्य मुंबईतून उभे राहणार आहेत हे पक्के समजा. " एवढेच त्यांनी सांगितले.

गुरुवारी रात्री कामराज येथे परतल्यानंतर मध्यवर्ती निवडणूक समितीतील

बहुमत पाटलांच्या बाजूला असल्यामुळे आपल्याला ईशान्य मुंबईचा आग्रह सोडावा लागेल, असे त्यांनी कृष्ण मेनन यांना कळविले. परंतु मेनन हेही आपल्या भूमिकेत बदल करावयास तयार नव्हते. इंदिरा गांधींनीही त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनाही यश आले नाही.

शेवटी शुक्रवारी संध्याकाळी निवडणूक मंडळाची बैठक बोलावण्यावाचून कामराजांना गत्यंतर नव्हते. सारा बनाव आधीच ठरला असल्यामुळे अवघ्या पंधरा मिनिटांतच या बैठकीचे कामकाज संपले आणि स. गो. बर्वे यांनाच ईशान्य मुंबईतून उभे करावे या पाटील यांच्या भूमिकेवर कामराजांना शिक्कामोर्तब करावे लागले.

चव्हाणांना गृहमंत्रिपद देण्याच्या वेळी माघार घेतलेल्या मोरारजी देसाई, स. का. पाटील गटाने या वेळी इंदिरा गांधी-कामराज गटावर मात करून पुढले पवित्रे टाकावयास प्रारंभ केला आहे. काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारण्यापासून कामराजांचा एवढा मोठा पराभव प्रथमच झालेला आहे. आणि त्यामुळेच दिल्लीला रामराम ठोकून पुन्हा मद्रासचे मुख्यमंत्रिपद स्वीकारावे असे त्यांना वाटू लागले आहे. तसे झाले तर इंदिरा गांधी एकाकी पडणार असून नेहरूंच्या निधनापासून प्रधानमंत्रिपदाची स्वप्ने पाहणाऱ्या मोरारजी देसाईंचा यापुढचा मार्ग अधिकच सुकर होणार आहे. ज्या कामराज योजनेमुळे आपल्याला केन्द्रीय मंत्रिमंडळातून हुसकावून लावण्यात आले त्या कामराजांचा पराभव करण्याची संधी गमावण्याइतके मोरारजी भाबडे नाहीत. या बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात श्री. कृष्ण मेनन यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्यासंगी अभ्यासूसमोर पुढे काय ? असे प्रश्नचिन्ह उभे राहणे साहजिक आहे. अर्थात हे प्रश्नचिन्ह केवळ त्यांना एकट्यालाच भेडसावीत नसून या प्रकरणात मेनन यांच्या बाजूने उभ्या राहिलेल्या इतरेजनांनाही या प्रश्नचिन्हाने व्यग्र करून टाकले आहे.

थोडक्यात मेनन-प्रकरणाच्या निमित्ताने स. का. पाटील यांनी इंदिरा गांधी–कामराज या आजच्या समाजवादी गटाविरुद्ध उघडपणे दोन हात करण्याचे ठरविले आहे. पक्षसंघटनेतील आपली सारी प्रतिष्ठा आणि शक्ती पणास लावून पं. नेहरूंच्या निधनानंतर होणाऱ्या या पहिल्या निवडणुकीत सत्ता हस्तगत करण्याचा जुगार खेळण्याचे पाटील यांनी ठरविलेले दिसते. अर्थात् हा जुगार कदाचित त्यांनी जिंकला तरीही त्यांना मोरारजी देसाई यांचे सहकारी अशी दुय्यम भूमिकाच स्वीकारावी लागणार आहे. कारण इंदिरा गांधी आणि मोरारजी देसाई यांच्यांतच प्रधानमंत्रीपदासाठी चुरस होणार असून या स्पर्धेत जो गट यशस्वी होईल त्याच्या हाती भारताची सूत्रे दीर्घकाळ राहतील याची सर्वांना खात्री आहे आणि म्हणूनच पं. नेहरूंच्या दडपणामुळे निर्माण झालेल्या तथाकथित एकजुटीची सारी बंधने झुगारून देऊन दोन्ही गटांनी आपापले मोर्चे बांधण्यास प्रारंभ केला आहे. आगामी

[ पृष्ठ ६४ वर चालू ]

# मुक्ताफळे...



## □ गाईची गोष्ट

गोष्ट जुनी आहे. नंदाघरी कृष्ण वाढला. कृष्णामुळे गायी वाढल्या. कृष्णाचा गोपालकृष्ण झाला. ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. पुढे काय झाले ? गोपाल वाढले नाहीत. गायी मात्र वाढत गेल्या. माणसे वाढत गेली. माणसे गायींसारखी गरीब होती. गायी माणसांसारख्या शहाण्या होत्या. आखुड शिंगाच्या, भरपूर दुधाच्या.

परंतु या गायींनी माणसांना पेचात टाकले. गायींचे कळप सैन्यापुढे चालवून शत्रू आत घुसला. गायी मारायच्या नाहीत म्हणून माणसे दक्षिणेकडे पळत सुटली. शत्रू गायी मारून खाऊ लागले. गायीने असा या माणसांचा घात केला.

परंतु पळून पळून किती पळणार ? दक्षिणप्रांती एक पुरुष उभा राहिला. गो-प्रतिपालक असा झेंडा त्याने हाती धरला. शत्रू रोखला गेला; परंतु गायी खाणाऱ्यांचा आणि पुजणाऱ्यांचा झगडा संपण्यापूर्वी साहेबाचे राज्य आले. लोक हवालदिल झाले.

स्वातंत्र्यासाठी झगडा सुरू झाला. लोकांना त्यांच्या पुढाऱ्यांनी सांगितले—— " एकदा स्वातंत्र्य मिळाले की गोवधबंदीचा कायदा करून टाकू – तूर्त ज्यांना गायी खायच्या असतील त्यांच्याशीही आपल्याला जमवून घ्यायचे आहे ! "

परंतु गायी खाणाऱ्यांशी कधीच जमवता आले नाही. पुन: एकदा गायीने या गरीब माणसांना दगा दिला. कलकत्त्यात एका गायीला प्रथम मारून दंगलीला सुरुवात झाली. गायी खाणाऱ्यांचे स्वतंत्र राज्य हवे, यासाठी ही गाय मारण्यात आली. क्षुद्र गोष्ट ! तिकडे दुर्लक्ष करायला हवे होते. परंतु तसे झाले नाही. फाळणीच्या दंगली पेटल्या. अखेर साहेब गेला. गायी खाणाऱ्यांची व न खाणाऱ्यांची राज्ये वेगवेगळी करून गेला.

दोन धष्टपुष्ट बैलांची निशाणी दाखवून काँग्रेसने लोकांची मते मागितली. लोकांनी राज्य स्वाधीन केले. देशापुढे कठीण प्रश्न होते. लोकांनी पाच वर्षे, दहा वर्षे, पंधरा वर्षे वाट पाहिली. लोकांच्या लक्षात आले, देशापुढचे प्रश्न सुटण्याचा सुतराम संभव नाही. शिवाय गायी खाणाऱ्यांची मतेच जास्त महत्त्वाची आहेत.

सत्ताधीशांनी नवी युक्ती केली. गोवधबंदी न करता त्यांनी ' राधाकृष्णन ' नावाच्या एका थोर व्यक्तीला राष्ट्रपती केले ! नंदा नावाच्या माणसाला गृहमंत्री केले. सगळ्यांना वाटले, चला ' गोपालकृष्णांचे ' राज्य आले. आता या ' नंदा- '-घरी कुणी गायी मारण्याचा विचार करणार नाही. धष्टपुष्ट गायींची खिल्लारे आता पुनः दिसू लागतील. दूधदुभत्याचा सुकाळ होईल.

नंदांनी पण पाच वर्षे गोभक्तांचा शोध सुरू केला. तीर्थक्षेत्री निवास करणारे असंख्य साधु-बैरागी नंदांनी जवळ केले. दाढी वाढलेले, अंगाला राख फासलेले, वस्त्रांचेही भान सुटलेले असे असंख्य गोभक्त नंदांनी जमवले. गोभक्तांचा आवाज सुरू झाला.

राजवाड्यात गडबड सुरू झाली. गायी खाणाऱ्यांच्या मतांचा सौदा जवळ जवळ पक्का होत असताना गायीने पुनः असे अचानक विघ्न आणले ! प्रश्न सोपा नव्हता. चार साडेचार कोटी मतांचे पान हातातच कुजणार की काय ? दरबारी कासावीस झाले. पाटिलकीची वतने जाणार की काय ? सत्तेच्या गडाला आता कुठेशी काहींची घोरपड चिकटली होती तोच असा तिढा पडला. कारस्थाने सुरू झाली. हुजरे संपादक मुजरे करून गेले. लिहू लागले —

" गायीचे अर्थकारण पाहिले पाहिजे. सर्व गायी जगवायच्या तर भारताला ते कसे शक्य आहे ? आधी सगळ्या माणसांना खायला मिळू द्या. मग गोवधबंदीचा विचार करता येईल. "

परंतु संपादकांचे चेहरे पडलेलेच होते. खाजगीरीत्या ते सांगत, " पोटासाठी असे लिहावे लागते. तसं पाहिलं तर चरख्याला काय अर्थशास्त्र आहे ? दारूबंदीला काय अर्थशास्त्र आहे ?"

दुसऱ्या एकाने लिहिले —

" यामुळे राजकारणात धर्म येतो ! जातीयवाद्यांचा हा डाव आहे. निवडणुकीचा मोका साधून सरकारला लोक अडचणीत टाकत आहेत. " या संपादकाचा चेहरा तर अगदी काळाठिक्कर पडला होता. पोपच्या स्वागताला दिल्ली सोडून धावणारे राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान त्याने पाहिले होते. महात्माजींची खिलाफत त्याने पाहिली होती.

इकडे राजवाड्याबाहेर ' गाय ' शिंगे रोखून उभी राहिली.

राजवाड्यात हलकल्लोळ माजला. शेवटी ' नंदा 'शिवाय सर्वांनी सल्लामसलत केली. हे कुणामुळे झाले ? नंदामुळे. आपण नंदालाच उडवू. साडेचार कोटी मते कुजता कामा नयेत. बेत ठरला. सर्वजण संधीची वाट पाहू लागले.

गोभक्त एके दिवशी प्रचंड संख्येने ' नंदा ' घरी निघाले ! लोकसागराचे ते रुद्र रूप पाहून राजवाड्यात काहींना भोवळ आली.

राजवाड्यातून गोळ्या सुटल्या. काही गोळ्यांनी मेले, काही चिरडून मेले. राज-

वाड्यात गडबड उडाली. तीन दिवस गारद्यांनी गाजवले. " इंदु मला वाचव ! इंदु मला वाचव!" म्हणत नंदा सैरावैरा धावत होते. अखेर गारद्यांचे घाव पडले. " शास्त्री ! शास्त्री !" म्हणत नंदांनी सत्ता सोडली. राजवाड्याबाहेर रक्त सांडून आत मात्र अहिंसक खून झाला. गायींचा कायमचा बंदोबस्त करण्याकरता राजवाड्यातून घोषणा झाली –" चिनी व पाकिस्तानी दुष्टांपेक्षा हे गोभक्त अधिक दुष्ट आहेत !"

लंडनमधून आयुबखानांचा आशीर्वाद आला. गोभक्तांचा पुरा बंदोबस्त करून इंदिराबाईंचेच स्थिर सरकार पुन: राज्यावर येईपर्यंत आम्ही वाट पाहतो ! तूर्त आसाममध्ये ' ताश्कंद ' कराराप्रमाणे आमची माणसं येत राहतील. भूतानमध्ये घुसलेल्या चिन्यांनी श्वास सोडला.

गायींचा बंदोबस्त पुरा झालेला आहे. जनतेने फक्त ' बैलांच्या जोडीला ' आठवणीने निवडणुकीत मते द्यावीत.

## □ सोन्याच्या विटा

' सोव्हिएट देश ' या नियतकालिकातर्फे भारतातील साहित्यिकांना नुकतीच पारितोषिके मिळाली. ' शांतता व तिचे रक्षण ' यासाठी लेखणी झिजवणाऱ्यांना हे पारितोषक देण्यात येते. यंदा मराठी साहित्यिकांसाठी दोन सोन्याच्या विटा मांडण्यात आल्या. त्यातली अडीच हजार रुपये किंमतीची मोठी वीट ही ' पांडुरंगा '-साठी व एक हजार रुपयांची लहान वीट ही ' पुंडलिका 'साठी. ' नवशक्ती ' चे संपादक ' पांडुरंगपंत ' गाडगीळ यांनी नेहरूंविषयक लेखन करून जगात शांततेसाठी नेहरूंनी जे थोर कार्य केले त्याचा परिचय मराठी वाचकांना करून दिला आहे. त्यांचे हे कार्य लक्षात घेऊन ' सोव्हिएट देश ' या नियतकालिकाने २५०० रुपयांचे पारितोषिक त्यांना दिले. हे पारितोषिक मिळाल्यानंतर गाडगीळांनी लिहिलेला, ' पाटलांनाच गृहमंत्री करा ' हा अग्रलेख जर रशियन भाषेत भाषांतर केला गेला व तो क्रेमलिनने वाचला तर कदाचित ' हेचि फळ काय मम विटेला ' म्हणून क्रेमलिन कपाळाला हात लावील.

प्रा. विद्याधर पुंडलिक यांच्या ' चक्र ' या एकांकिकेला रु. १००० चे दुसरे पारितोषिक मिळाले. " सूडाचे चक्र हे कुठेतरी थांबले पाहिजे; " या व्यथेने व्याकूळ झालेल्या द्रौपदीचे चित्रण पुंडलिकांनी या एकांकिकेत केले आहे. भाषा सुंदर आहे. पांडव सम्राट झाले आहेत. तीन तपे राज्य भोगून महाप्रस्थानाला निघाले आहेत. त्या वेळची द्रौपदीची ही व्यथा आहे. अश्वत्थाम्याला ती सांगते– " कुणीतरी हा न संपणारा गुणाकार थांबवलाच पाहिजे. कुणीतरी, केव्हातरी, कसंतरी ही ठिणगी

बनायचं नाकारलं पाहिजे. कुणीतरी हा आपला लहानसा हात मध्ये घातला पाहिजे आणि हे प्रचंड चक्र थांबवलं पाहिजे."

सूडाचं चक्र थांबवण्याचं हे तत्त्वज्ञान 'सोव्हिएट देश' या पाक्षिकाने उचलून धरावं यात मुळीच आश्चर्य नाही. कारण या चक्रात कुणीतरी आपला 'लहानसा' हातच घालावा, असेच त्याचे मत आहे. रशिया, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स ही मंडळी हे चक्र सारखे फिरते ठेवतील व भारताने त्यात मध्ये मध्ये हात घालावा व 'ची–ची' करावे एवढेच रशियाला अभिप्रेत आहे. Russia at War, 1940–45 या अलेक्झांडर वेर्थ याने लिहिलेल्या ११०० पृष्ठांच्या ग्रंथात खालील हकीकत आहे.

"बर्लिन येथे रशियन जनरल मार्शल शोलोलोव्हस्की याला वेर्थ याने फोन केला, 'रशियन सैनिकांनी जर्मन स्त्रियांवर बलात्कार केले, जर्मन शिरे तुटली व जर्मन युद्धकैद्यांना गोळ्या घातल्या हे कसे घडले?'"

यावर मार्शल शोलोलोव्हस्कीने उत्तर दिले– "What do you expect? दुसरी काय अपेक्षा आहे आपली? जर्मनांनी रशियन युद्धकैद्यांना गोळ्या घातल्या, आमच्या देशाची राखरांगोळी केली, आमच्या स्त्रियांना लुटले. 'आस्विज'चा तुरुंग पाहिला आहे तुम्ही?"

'सोव्हिएट देश' पत्राने मार्शल शोलोलोव्हस्कीला 'मूर्ख' म्हटलेले कुठे वाचनात आलेले नाही.

## □ लेखणी आणि बंदूक !

भारताचे भूतपूर्व सरसेनापती जन. चौधरी यांनी नुकतीच अशी लेखी कबुली दिली आहे, की ते भारत सरकारच्या सैन्यात अधिकारपदावर असताना बंगालमधील एका नियतकालिकात टोपण नावाने नियमितपणे लेखन करीत असत. ज. चौधरी यांचा हा गौप्यस्फोट होऊन बरेच दिवस झाले, तरी त्यांच्याविरुद्ध सरकारने काही कारवाई केली नाही. जन. चौधरी यांचा आदर्श पुढे ठेवून सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील माणसांनी आपआपल्या खात्याविषयी टोपण नावाने वृत्तपत्रांतून लिहिण्याचे मनावर घेतले तर वृत्तपत्रांना सनसनाटी बातम्यांची कधीच वाण पडणार नाही. सरकारी खाती, त्यांतील मंत्र्यांची ढवळाढवळ, दाबलेली प्रकरणे यांची सर्व माहिती जनतेला लगोलग उपलब्ध होईल. लेखणी न मोडता बंदूक चालवता येते, हे जन. चौधरींनी दाखवून दिले आहे.

– ग्यानबा

●

# 'निवडणूक....निव्वळ एक फ्रॉड !'

(पुण्याच्या लकी रेस्टॉरंटमधील एका टेबलाशी सिगारेटचे झुरके मारीत नखशिखांत टेरिलिनचा पोशाख केलेला एक कॉलेजकुमार एकटाच बसला आहे. टेबलवर एक-दोन वह्या आहेत. बहुधा कॉलेजच्या तासाला दांडी मारून आला असावा. वय वर्षे बावीस. बी. ए. फायनलचा दुसरा प्रयत्न. अनेक वेळा इंग्रजी विषयाने दगा दिलेला.)

कॉलेजकुमार : (मला दुरून पाहताच) हाय की ऽ... ! किती दिवसांनी भेटतोयस ! कुठे लाईन टाकत होतास इतके दिवस...?

मी : अरे, कामाची गडबड आहे ना ! सध्या निवडणुका जवळ आल्यायत.

कुमार : अरे डॅम--! काय निवडणुका घेऊन बसलायस...बॉऽय...दो कोक...नो...नो. घेतलेच पाहिजे तुला. बऱ्याच दिवसांनी भेटतोयस. निवडणुकांना मार गोळी.

मी : गोळी कसली मारतोस् लेका... तुलाही आता मतदानाचा हक्क आला असेलच की, नाव वगैरे नोंदवलंस नं ?

कु. : आँ...? हो-हो-येस. म्हणजे आय डीडण्ट बॉदर. पण काही लोक आले होते. बहुधा अर्धी चड्डीवाले. गुड पिपल दे आर. ऑनेस्ट. त्यांनी विचारलं...कुठे तरी सही करायला सांगितलं...फिनिश. स्वतः उठून कोण जातंय !

मी : मग काय मतदान करणार की नाही ?

कु. : (सिगरेटचा झुरका मारीत) इट डिपेंड्स्...

मी : ऑन द कँडिडेट ?

कु. : ऑऽऽऽनॉऽऽऽ...ऑन माय मूड...अरे हो. सॉरी हं. ही घे. पण कॅप्स्टन आहे. आपल्याला दुसरा ब्रँड चालत नाही.

मी : (सहनशीलतेने) पण समजा, तू मतदान केलंच नाहीस तर काय होईल ? म्हणजे...आपल्या लोकशाहीच्या दृष्टीनं तुला कसं वाटतं ?

कु. : (संशयाने) तू माझी मुलाखतच घेतो आहेस ! आर यू सिरीयस ?

मी : तसंच समज.

कु. : फूलिश ऑफ यू.

मी : असू दे. माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.

कु. : ओ. के. शूट. हां मतदानच केलं नाही तर ना ? गुड आयडिया. नथिंग विल हॅपन. यू सी. निवडणूक म्हणजे निव्वळ फ्रॉड आहे. खरं सांगू का ? निवडणूक, लोकशाही या गोष्टींचा मी विचारच करीत नाही.

मी : ते खरं रे. पण आजूबाजूची परिस्थिती तर पाहत असशील ना ? देशाचं कसं काय चालू आहे असं वाटतं तुला ?

कु. : ठीक चालू आहे. पण सालं कर-

प्शन वाढतं आहे, तुला म्हणून सांगतो. एज्युकेशनमध्येही वाढतं आहे. जनसंघासारखे लोक पाहिजेत. दे आर ऑनेस्ट. करप्शन अगदी साफ धुऊन काढतील. आणि चांगली शिस्तही लावतील. साली उगाच मंकसगिरी वाढते आहे, आणि हो इनीक्वालिटी वाढतेय. इट मस्ट बी स्टॉप्ड. कम्युनिस्ट लोक त्यासाठी चांगले. सगळ्यांना कामाला जुंपतील आणि मस्त दंडा वळवतील...हां. डोंट लाफ्. आय् मीन या दोघांच्या काहीतरी मधलं हवंय..डॅम...सिगारेट संपलीय. बॉय. एक कॅप्स्टन पाकीट आणि हे काय ? अजून कोक आला नाही ? नॉन्सेन्स्...! बाय द वे, यू हॅव सिम्प्ली इग्नोअर्ड माय न्यू टेरिलीन पँट. एकदम इंपोर्टेड माल. डॅडना मस्त बनवून पैसे घेतले. पुन्हा अशी पँट मिळणार नाही...

मी : असं ? छान आहे. पण तू इक्वालिटीविषयी काहीतरी...

कु. : ओह् डॅम इट. काय पॉलिटिक्स घेऊन बसलायस, जरा चांगल्या गोष्टी बोल. यू पुअर फेलो तुझी मला कीव येते. अरे, जरा रसिक नजरेनं जगाकडे पाहायचे सोडून हे काय फॅड घेऊन बसलायस ! अगदीच संकुचित दृष्टी बुवा.

मी : बरं, बोल. तुझं कसं काय चालू आहे ?

कु. : एकदम मस्त. पुढच्या महिन्यात स्कूटर घेतेय. डॅडची कृपा. डॅड एकदम मस्त माणूस. यू नो डॅड ! आम्हांला काय वाट्टेल ते घेऊन देतात. पण स्वतः मात्र कधी खादीतून बाहेर येत नाहीत. काँग्रेसवरचं आणि गांधीवरचं त्यांचं डिव्होशन बघून मलाही कधी कधी वाटतं काँग्रेसलाच मत द्यावं.

मी : म्हणजे त्यांच्या सांगण्यावरून तू मत देणार ?

कु. : व्हॉट ! नो...नेव्हर ! त्यांच्याच काय कुणाच्या बापाच्या सांगण्यावरून माझं मत मी टाकणार नाही. मी स्वतंत्र माणूस आहे. आय हॅव माय ओन व्हूज. आणि डॅडही मला कधी सांगणार नाहीत. यू नो डॅड...हां,...हो विसरलोच होतो. त्या ' स्टार अँड स्टाईल 'वरच्या सायराबानूच्या चित्रावरून एकदम आठवण झाली. परवा तळ्याच्या गणपतीत मीना दिसली होती. ओ माय गॉड...शी वॉज सीं ऽ ऽ प्ली रॅव्हिशिंग. आय टेल यू... स् स् सीं ऽ ऽ ऽ प्ली...

(अनेक सिगारेट्सची राख झाल्यावर आणि आणखी दोन कोकाकोलाच्या बाटल्या रिकाम्या झाल्यावर अर्धमेला होऊन 'माणूस' प्रतिनिधी बाहेर पडतो.)

## सर्वाधिक कटकटींचे राज्य...केरळ

केरळमधल्या महाविद्यालयांतून दरवर्षी पोटासाठी नोकऱ्या शोधणारे पदवीधर शेकड्यांनी बाहेर पडतात. देशात सर्वाधिक साक्षरतेचे प्रमाण असलेल्या आणि औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या या राज्यात चांगल्या नोकऱ्या मिळाल्या नाहीत, म्हणजे बस कंडक्टर, प्राथमिक शिक्षक, ऑफिस शिपाई अशा खालच्या दर्जाच्या

नोकऱ्या स्वीकारतात. ज्या पदवीधरांना त्याही मिळत नाहीत, ते नोकऱ्यांच्या शोधार्थ देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात जायला तयार असतात. आणि ज्यांना हेही शक्य होत नाही, ते राजकारणात पडतात.

वैफल्याने ग्रासलेला सुशिक्षित बेकार तरुणवर्ग ही केरळमधील एक फार मोठी समस्या आहे. हिरवे माड, खाड्या, होड्या आणि शेतमजुरांचे जळते दारिद्र्य यांची या भूमीत रेलचेल आहे. देशातला सगळ्यात दरिद्री प्रांत म्हणजे केरळच असेल. म्हणूनच कम्युनिस्टांना या भूमीत पाय रुजविणे शक्य झाले आहे. आणि म्हणूनच देशातील सर्वाधिक कटकटींचे राज्य म्हणून केरळ ओळखले जाते. दरिद्री शेतकरी आणि मजूर व विफल बेकार तरुण यांच्या प्रश्नांना हात घालून कम्युस्टांनी त्यांची मने जिंकली आहेत. आपली प्रचंड इस्टेट पक्षकार्याला आणि गरिबांना वाटून टाकून अमाप लोकप्रियता मिळवणारे ई. एम्. एस्. नंबुद्रीपादसारखे नेतेही कम्युनिस्टांतच आहेत. त्यामुळे केरळमधील कम्युनिस्ट पक्ष प्रथमपासूनच बलिष्ठ आहे. १९५७ च्या निवडणुकांत विजय मिळवून लोकशाही पद्धतीने सत्ता काबीज करून केरळ कम्युनिस्टांनी इतिहास घडविला. पण स्वतःच्याच अतिरेकी उत्साहामुळे ते पुढे कोसळले. पुढच्या पोटनिवडणुका आणि निवडणुकांमध्येही कम्युनिस्टांनी केरळ विधानसभेच्या अनेक जागा मिळवून कम्युनिस्टांनी आपले सामर्थ्य दाखवून दिले. आता येत्या सार्वत्रिक निवडणुकीतही सात विरोधी पक्ष एकत्र करून काँग्रेसला जबरदस्त शह देण्याची तयारी केरळ कम्युनिस्टांनी चालविली आहे.

केरळमधील काँग्रेस या कम्युनिस्टांच्या आणि विरोधी पक्षीयांच्या आव्हानाला तोंड देऊ शकत नाही. कारण काँग्रेसमधील नेतृत्वाची मोठी पोकळी. सबंध केरळ काँग्रेस ज्याचे नेतृत्व मानते, असा एकही नेता तीमध्ये नाही. केरळात काँग्रेसला एक कणाच नाही. त्यामुळे नुसत्या 'काँग्रेस नको' या घोषणेवरही विरोधी पक्ष वेळ मारून नेऊ शकतात.

१९५७ साली केरळात कम्युनिस्टांचे मंत्रिमंडळ आले. लोकशाही निवडणुकांच्या मार्गाने कम्युनिस्ट सत्तेवर येण्याचा साऱ्या जगातील हा पहिलाच प्रसंग होता. ते कोसळल्यानंतर प्रजासमाजवादी पक्षाचे मंत्रिमंडळ आले. नंतरच्या निवडणुकीत काँग्रेस-प्रजासमाजवादी पक्षाचे संयुक्त मंत्रिमंडळ आले. तेही कोसळल्यानंतरच्या निवडणुकीत कोणताच पक्ष बहुमतात न आल्याने राष्ट्रपतींचा अंमल केरळवर बसला. केरळचे राजकीय वृड हे असे अस्थिर आहे. लोक आता निवडणुकांना आणि मंत्रिमंडळांच्या खो–खो ला कंटाळले आहेत.

येत्या निवडणुकीचेही केरळमधील चित्र विशेष उत्साहवर्धक नाही. काँग्रेससह कोणताही एक पक्ष बहुमताने अधिकारावर येण्याची लवमात्र आशा नाही. डाव्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या पदराने डाव्या विरोधक आघाडीत सात विरोधी पक्षांची मोट बांधलेली आहे. ही आघाडीच बहुमताने सत्तेवर येईल, असा अंदाज आहे.

काँग्रेस आणि प्रजासमाजवाद्यांच्या संयुक्त मंत्रिमंडळातील मारामाऱ्यांच्या सुरस कथा केरळीय लोक अद्याप विसरलेले नाहीत. त्यामुळे नव्या संयुक्त मंत्रिमंडळाचे संभाव्य स्वरूप बघून आत्तापासूनच अनेकांच्या अंगावर शहारे उभे राहिले आहेत.

केरळमधील विधानसभेच्या १३३ जागा आणि लोकसभेच्या १९ जागा यांसाठी काँग्रेस आणि ही विरोधी आघाडी यांच्यांतच खरा सरळ सामना होणार आहे. दोन वर्षांपूर्वी काँग्रेसमधून फुटून निघालेल्या बंडखोर केरळा काँग्रेसने आपला सवता सुभा कायम ठेवला असला, तरी त्यांच्यात आता विशेष जोर उरलेला नाही; कारण या बंडखोरांतही दोन गट पडून श्री. मन्नथ पद्मनाभन यांचा जबरदस्त गट काँग्रेसच्या कुशीत परत आला आहे. उरलेला बंडखोर काँग्रेस पक्ष स्वतंत्र, प्रजा-समाजवादी आणि द्रविड मुन्नेय कळघम या पक्षांशी हातमिळवणी करू पाहत आहे. पण या हातमिळवणीने बंडखोरांच्या शक्तीत विशेष भर पडणार नाही.

## संयुक्त आघाडीचा जाहीरनामा

डाव्या कम्युनिस्टांनी आपल्या पदराखाली विरोधी आघाडीत बांधलेल्या पक्षांची रंगरूपेही परस्परविरोधीच आहेत. सर्व देशभर डाव्या-उजव्या कम्युनिस्टांचे विळ्याभोपळ्याएवढे सख्य आहे. पण केरळात मात्र दोघेही या आघाडीत आहेत. त्याशिवाय मुस्लीम लीग, संयुक्त समाजवादी पक्ष, रिव्हॉल्युशनरी सोशालिस्ट, केरला सोशालिस्ट आणि करशागा तोझीलालीज (शेतमजूर पक्ष) हेही पक्ष त्यात आहेत. त्यात सर्वांत बलवान डावे कम्युनिस्टच.

या संयुक्त आघाडीने आपला एक जाहीरनामा काढला असून, त्यात आपण सत्तेवर आल्यानंतर काय करणार याचा किमान कार्यक्रमही दिलेला आहे. सात राजकीय पक्ष एका किमान कार्यक्रमाला राजी होत आहेत, असे दृश्य केरळातच दिसते. विधानसभेच्या जागांसाठी १३३, डावे कम्युनिस्ट ६२, सं. सो. पा. २५, उजवे कम्युनिस्ट ३४, मुस्लिम लीग १५, रिव्हॉल्युशनरी सोशालिस्ट ३, केरला सोशालिस्ट १ आणि करशागा ३ असे उमेदवार उभे राहणार आहेत.

१९६५ च्या केरळ पोटनिवडणुकीत काँग्रेसला केरळ विधानसभेसाठी ३२ टक्के मते आणि ३६ जागा मिळाल्या होत्या. त्याच निवडणुकीत या सातही विरोधी पक्षांना सर्व मिळून ४९ टक्के मते आणि एकूण ७२ जागा मिळाल्या होत्या. तेव्हा हे पक्ष एकत्र नव्हते. आपापसांत मते विभागली गेली होती. आता ते एकत्र आले आहेत. निवडणुकीचा निकाल काँग्रेसच्या बाजूने लागणार नाही हे निश्चित.

संयुक्त मंत्रिमंडळांच्या मारामाऱ्यांना, राष्ट्रपतींच्या अंमलाला, पुन्हापुन्हा होणाऱ्या निवडणुका, पोटनिवडणुकांना आता केरळातले दुर्दैवी लोक कंटाळले आहेत. त्यांना आपल्या राज्यातले दारिद्र्य आणि बेकारी घालवील अशी स्थिर राजवट हवी. पण याही वेळी त्यांच्या नशिबात कटकटीच दिसत आहेत.

# वेंगालील कृष्णन् कृष्ण मेनन

आधुनिक भारताच्या राजकारणात जिचा सर्वाधिक द्वेष झालेला आहे, हेटाळणी झाली आहे, आणि तरीही जिने भारताच्या धोरणावर काही काळ तरी आपला प्रचंड प्रभाव गाजवून एक कायम ठसा उमटविला आहे, अशी अत्यंत वादग्रस्त आणि वादळी व्यक्ती म्हणजे भारताचे भूतपूर्व संरक्षणमंत्री वेंगालील कृष्णन् कृष्ण मेनन.

भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत श्री. कृष्ण मेनन यांचे नावही भारतातील फारच थोड्या लोकांना ठाऊक असेल. स्वातंत्र्यानंतरच एखाद्या तेजस्वी धूमकेतूप्रमाणे भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर एकाएकी नाट्यमय रीतीने ते अवतरले. हां हां म्हणता आपल्या तेजाने आणि झंझावाती वेगाने त्यांनी सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आणि धूमकेतूप्रमाणेच अनेकांच्या मनांत शंकाकुशंका, भीति, द्वेष, मत्सर यांची जळमटे निर्माण करीत, मार्गात ठिकठिकाणी अनेक उत्पात घडवीत राजकारणातून अचानक नाहीसे झाले. पुन्हा केव्हा क्षितिजावर उमटतील याचा नेम नाही.

श्री. कृष्ण मेनन यांचे व्यक्तिमत्त्वच तसे वादग्रस्त आहे; किंबहुना एक त्यांची विलक्षण प्रखर बुद्धिमत्ता सोडली तर मेनन यांच्या साऱ्याच गोष्टी वादग्रस्त आहेत. अतिशय भेदक दृष्टी, गरुडचोचीसारखे धारदार नाक, जाड ओठ, पांढऱ्या शुभ्र ओठांमागे दडलेले नजर खिळविणारे आणि कधीकधी तितकेच जहरी वाटणारे, क्वचितच दिसणारे रहस्यमय स्मित हास्य, भव्य कपाळ आणि त्यामागे अस्ताव्यस्त झालेले लांब, राखी रंगाचे कुरळे केस, यांमुळे एखाद्या जादूगारासारखा दिसणारा अत्यंत विक्षिप्त आणि कोपिष्ट व विलक्षण प्रतिभेचा उर्मट वाटणारा हा सत्तरीतला ब्रह्मचारी लोकांमध्ये एकदम पराकोटीच्या प्रतिक्रिया निर्माण करतो. लोक त्याचा

# वादळी आणि वादग्रस्त व्यक्तिमत्त्व

एकतर एकदम आत्यंतिक द्वेष तरी करतात किंवा त्याचे चाहते तरी बनतात. त्याच्या उर्मट स्मितामागे कुणाला गुलाब पुष्पांचा मधुर सुगंध तरी येतो तर कुणाला त्यामागे विषाचे हजार प्याले दडलेले दिसतात. त्याच्या कृश काटेरी मूर्तीत कुणाला कारुण्याचे पाझर वाहत असताना दिसतात तर कुणाला चेटकिणीचे रूप दिसते.

म्हणूनच मुंबईतील लोकसभेच्या जागेचे काँग्रेसचे तिकीट येत्या निवडणुकीसाठी श्री. मेनन यांना मिळू नये, म्हणून मुंबई काँग्रेसचा एक गट आपली सारी प्रतिष्ठा पणाला लावत होता तर दुसरा गट त्यांना तिकीट मिळावे म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता.

**मी ' छुपा ' असतो तर !**

श्री. मेनन यांना कम्युनिस्ट लोक सतत पाठिंबा देतात. त्यामुळे लोक त्यांना ' छुपे कम्युनिस्ट ' म्हणतात. पण मेनन म्हणतात, " कृष्ण मेनन जर छुपा कम्युनिस्ट असता तर त्याने एका दिवसात सारा देश हादरून सोडला असता." मेनन कुणीही असोत. पण ते कुठल्याही एका शिस्तीच्या चौकटीत आंधळेपणाने मावू शकत नाहीत. राजकारणाच्या नाहीत. पक्षाच्या नाहीत आणि शासनव्यवस्थेच्याही नाहीत. खाजगी जीवनात वैफल्य आलेले, भांडखोर, तुसडे असे ते स्वतंत्र बुद्धिमत्तेचे, स्वतंत्र मतांचे समाजवादी आहेत. सार्वजनिक जीवनात, आपल्या कामात आणि इतरांच्या कामात अपूर्णत्व असलेले त्यांना खपत नाही. इतरांची कामे त्यांच्या मर्जीला येत नसली तर ती ते त्याला अधीरपणे करायला लावतील. त्यासाठी ते नोकरशाहीच्या लाल फितींना बिनदिक्कत कात्री लावतील आणि कधी लोकशाहीच्या संकेतांनाही वळसा घालतील. त्यांची वृत्ती लोकशाही धीमेपणाची नसून हुकुमशाही धडाडीची आहे !

ब्रिटन–अमेरिकेचा मेननवर अत्यंत आकस. कारण संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून काम करताना श्री. मेनन यांनी सतत त्या दोन राष्ट्रांच्या साम्राज्यवादावर एखाद्या योद्धयाच्या अभिनिवेषाने क्रूरपणे कडाडून हल्ले चढविले आहेत. श्री. मेनन यांच्या आयुष्यातला सर्वाधिक गाजलेला आणि महत्त्वाचा काल-खंड युनोमधलाच. सुएझ कालवा प्रकरणी श्री. मेनन यांनी संयुक्त राष्ट्रसंघात इजिप्तची बाजू घेऊन ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यावर चांगलीच आग पाखडून अमेरिकेच्या नाकाला मिरच्या झोंबवल्या. लाल चीनला युनोत प्रवेश मिळावा म्हणून (नेहरूंच्या संमतीने) सतत पाटीलकी केली. रशियन पंतप्रधान क्रुश्चेव्हची अण्वस्त्रचाचणी बंदीची योजना जोमात पुरस्कारून पाश्चात्त्यांचा रोष ओढवून घेतला आणि स्वत: क्रुश्चेव्हलाही थोडेसे पेचातच टाकले आणि हंगेरी प्रश्नावर रशियाला दोष देण्याचे नाकारून जगात आणि देशातही स्वत:विरुद्ध गांधीलमाशांचे मोहोळ उठविले. या सर्वांवर कडी म्हणजे त्यांची अत्यंत तुसडी आणि उर्मट वृत्ती. युनोतील स्वतंत्र भारताच्या प्रतिनिधीने ज्या स्वाभिमानाने आणि इभ्रतीने राहावे त्या इभ्रतीने आणि मस्तीने ते राहत. पाश्चात्त्यांना ते कसे खपणार ? उर्मट वार्ता-हरांच्या प्रश्नांना ते जशास तशी उत्तरे देत.

त्यांच्या या वर्तनामुळेच लोकांनी त्यांना ' छुपे कम्युनिस्ट ' ठरविले. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्यांनी गाजवलेली भरीव कामगिरी झाकळली गेली. युनो-मधील आफ्रो-आशियाई गटाला त्यांनी जबरदस्त आत्मविश्वास मिळवून दिला. अलिप्ततावादाचे तत्त्व अमेरिकेचे डल्लेस यांचा भयंकर रोष सहन करून त्यांनी बऱ्याच आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या गळी उतरविले. कोरियातील युद्ध मिटविण्या-साठी प्रयत्नांची शिकस्त करून " फॉर्म्युला मेनन " हा कौतुकाचा किताब मिळवला. कोरिया, इंडोचीन, चीनमधील अमेरिकन वैमानिक या प्रश्नांवर त्यांनी मध्यस्थीची कमाल करून यश मिळविले. पण या यशांचे तुरे डोक्यावर खोचण्यापूर्वी त्यांना आपल्या रोखठोक बेगुमान मतप्रदर्शनामुळे चोहोबाजूंची दगडफेक सहन करावी लागली.

## पुढच्या पिढीचा विचार

हीच गोष्ट ते ब्रिटनमध्ये भारताचे हायकमिशनर असतानाची आणि संरक्षण-मंत्रिपदावर असतानाची.

श्री. मेनन यांच्या खातेवहीतील जमा गोष्टी कितीही असल्या तरी त्यांच्या ऋण गोष्टीच इतक्या विचित्रपणे लोकांच्या नजरेत भरणाऱ्या आहेत की जमेकडे लक्षच जात नाही. युनोतील काश्मीर प्रश्नाचे त्यांनी केलेले अत्यंत प्रभावी समर्थन आणि केवळ स्वत:च्या हट्टाने त्यांनी केलेली गोव्याची मुक्ती लोक लवकर विसरतात ते यामुळेच.

पण आपल्याबद्दल लोक काय बोलतात, याची मेनन क्वचितच दखल घेतात. "हाथी चला अपनी चालसे......" अशी त्यांची वृत्ती बसते. हत्ती चिडला म्हणजे प्रसंगी आपल्या सोंडेचाच उपयोग करतो.

१९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचाराची सर्वांत जास्त धमाल उडाली असेल तर ती उत्तर मुंबईच्या लोकसभेच्या जागेसाठी. काँग्रेसचे मेनन विरुद्ध आचार्य कृपलानी असा हा सामना होता. देशाचे जणू सारे प्रश्न पं. नेहरूंनी या निवडणकीत इरेला घातले होते. पण प्रचाराच्या रणधुमाळीत सगळ्यांत जास्त कुठल्या विषयावर चर्चा होत असेल तरी कृष्ण मेनन यांविषयी. श्री. मेनन यांच्यावर व्यक्तिगत हल्ले करण्यासाठी विरोधकांनी अनेक आघाड्या उभारल्या. मुंबईत त्या वेळी ठिकठिकाणी लागलेल्या पत्रकांवर घोषणा होत्या: ' मेनन चीनचे प्रतिनिधी आहेत, भारताचे नव्हेत–'

परंतु आपल्या निवडणूक प्रचारात श्री. मेनन यांनी स्वतःच्या व्यक्तिगत निंदानालस्तीची एका शब्दानेही दखल घेतली नाही. मग त्यांना उत्तरे देणे तर दूरच. चिनी आक्रमणाच्या वेळी त्यांना राजीनामा द्यावा लागला. पण राजीनामा देताना त्यांनी तोंडातून अवाक्षरही काढले नाही. नंदांप्रमाणे आपली भूमिका स्पष्ट करण्याचे त्यांनी ठरविले असते तर जवाहरलाल नेहरूंसकट कितीतरी जणांना ते तोंडघशी पाडू शकले असते, पण ते गप्प राहिले. स्वतःच्या प्रामाणिकपणावर त्यांची अढळ श्रद्धा आहे. ते एकदा म्हणाले, " मी जे बोलतो, करतो, तेव्हा केवळ आजचा दिवस किंवा हे वर्ष माझ्या डोळ्यासमोर नसते, तर पुढची पिढी माझ्या नजरेसमोर असते. आज ज्या गोष्टींबद्दल माझ्यावर टीका होते, त्याच गोष्टी पुढचे लोक स्वीकारायला तयार होतील."

## अर्धी चड्डी, सायकल

श्री. मेनन यांचा हा प्रखर बुद्धिवादाचा आणि विक्षिप्तपणाचा वारसा त्यांनी आपल्या आईवडिलांकडूनच घेतला असावा. त्यांचे पिताजी कृष्णन् कुरुप हे केरळमधील कालिकत शहरात एक ख्यातनाम बुद्धिवादी वकील होते. आईदेखील अतिशय बुद्धिमान पण हट्टी स्त्री होती. पंधराव्या वर्षी शालान्त परीक्षा पास झाल्यावर त्यांना मद्रासला उच्च शिक्षणासाठी पाठविण्यात आले. मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात ते अर्थशास्त्राच्या पदवीसाठी अभ्यास करीत होते. शाळेत ते अतिशय बुद्धिमान विद्यार्थी म्हणून गाजले होते. पण कॉलेजमध्ये त्यांचे लक्ष अभ्यासापेक्षा इतर बाबींकडेच जास्त होते. विद्यार्थ्यांच्या वादसभा भरविणे, राजकीय भाषणांना हजर राहणे, प्रेसिडेन्सी कॉलेजवर डॉ. अ‍ॅनी बेझंटच्या होमरूल लीगचा झेंडा फडकविणे आणि आपल्या भाषणात ब्रिटिशांना लाचार असलेल्या प्राध्यापकांना सतावणे हेच त्यांचे प्रमुख उद्योग होते. एक वर्ष आपटी खाऊन दुसऱ्या प्रयत्नात ते बी. ए. पास झाले. काही

महिने त्यांनी मद्रासच्याच लॉ-कॉलेजमध्ये काढले आणि नंतर सरळ डॉ. ॲनी बेझंट यांच्या अडयार येथील थिऑसॉफिकल लॉजचा रस्ता धरला.

अड्यारला मात्र श्री. मेनन यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने, शिस्तप्रियतेने आणि पद्धतशीर अभ्यासू वृत्तीने डॉ. ॲनी बेझंट आणि त्यांचे सहकारी डॉ. अरूंदले यांची मते जिंकून घेतली. डॉ. बेझंट यांनी हिंदुस्थानात नुकताच स्काऊटचा प्रचार सुरू केला होता. श्री. मेनन यांना त्यांनी संपूर्ण मलबार प्रांतासाठी स्काऊटचा प्रचारक म्हणून नेमून टाकले. सव्वीस वर्षांचे श्री. कृष्ण मेनन अर्धी चड्डी आणि स्काऊटचा स्कार्फ घालून सायकलवरून हिंडत आपल्या मायप्रांतात स्काऊटचा प्रचार करू लागले, तेव्हा त्यांच्या ओळखीचे लोक त्यांची टिंगल करीत. घरी भरपूर श्रीमंती होती. बाप चांगला वकील होता. मुलगा हे भलतेच चाळे करू लागला होता. कृष्ण मेननला वेड लागले आहे, असे बरेच लोक म्हणू लागले.

परंतु डॉ. बेझंटचा मात्र मेननवर विश्वास होता. पुढे दोन वर्षांनंतर दोन तरुणांना शिक्षकांच्या उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठविण्याचा प्रसंग आला, तेव्हा डॉ. बेझंट यांनी श्री. मेनन यांनाच १९२४ साली ब्रिटनला पाठविले. तेव्हा ते जे ब्रिटनला गेले ते तब्बल २८ वर्षांनंतर मायदेशी परतले.

शिक्षकीचा डिप्लोमा घेतल्यानंतर श्री. मेनन यांनी श्री. हॅरॉल्ड लास्की यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स्‌मध्ये नाव दाखल करून प्रथम श्रेणीत तेथील बी. एस्‌सी. ही पदवी मिळवून श्री. लास्की यांची मर्जी संपादन केली. त्याचबरोबर वकिलीचीही परीक्षा दिली आणि त्यानंतर ब्रिटनमधील ' इंडिया लीग 'च्या कार्याला त्यांनी वाहून घेतले.

## प्रेमभंगाचा धसका

' इंडिया लीग ' ही भारतीय स्वातंत्र्याची ब्रिटनमधील एकमेव पुरस्कर्ती संस्था होती. ब्रिटनमधील वृत्तपत्रे भारताविषयी तऱ्हतऱ्हेचे अपप्रचार करीत. त्यांना समर्थपणे उत्तरे देणे, हे या लीगचे एक कार्य होते. मेनन यांनी लीगच्या कार्यात उडी घेतल्यावर कार्याला एक वेगळीच धार आली. तोपर्यंत इंडिया लीगचे कार्य म्हणजे फावल्या वेळचे काम, असे लीगचे सभासद मानीत. पण श्री. मेनन यांनी कार्याला पूर्ण वेळ वाहून घेतले. लीगचे सेक्रेटरीपद मिळविले. प्रचाराची धमाल उडविली आणि हॅरॉल्ड लास्की, बर्ट्रांड रसेल आणि सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स्‌ यांसारख्या ब्रिटिश बुद्धिवाद्यांना इंडिया लीगच्या कार्याला जुंपले. प्रचार पत्रके, पुस्तके, भिंतीपत्रके, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद-जी जी साधने सापडतील त्या त्या मार्गाने श्री. मेनन लीगच्या कार्याचा प्रचार करू लागले. ते स्वतःही लंडन शहराच्या चौकांत उभे राहून छोटी छोटी व्याख्याने देत.

या वेळी श्री. मेनन यांची आर्थिक परिस्थिती बेतावाताचीच होती. लंडनमधल्या

एका दूरच्या कामगार वस्तीत ते राहत. वकिली मिळत होती. पण कामगारांच्या केसेस ते फुकट चालवीत. सुप्रसिद्ध पेलिकन पेपर बँक पुस्तकामध्ये गंभीर विषय आणण्याची कल्पना श्री. मेनन यांची. अशा विषयावर पहिली बारा पुस्तके त्यांनी संपादित करून पैसे मिळवले. ही पुस्तके खूपच लोकप्रिय झाली, पण त्यामानाने मेननना मिळालेले पैसे तोकडे होते. जेवणाकरता पुरेसे पैसे नाहीत, म्हणून ते नुसत्या चहा आणि उकडलेल्या बटाट्यांवर राहत. तेव्हापासून त्यांना जी चहाची सवय लागली, ती आजतागायत कायम आहे. त्यांचा आता नेहमीचाच आहार म्हणजे चहा, बटाटे आणि बिस्किटे. लंडनमध्ये सतत सर्दी-खोकला, दमा, न्यूमोनिया, क्षय आदी शत्रू मेननच्या अवतीभोवती तळ देऊन असत. त्यांना दूर ठेवण्यासाठी भरपूर औषधांचा ते मारा करीत.

याच काळात श्री. मेनन यांना प्रेमभंगाचा एक जबरदस्त तडाखा बसला. एका इंग्रज मुलीवर त्यांचे प्रेम होते. तिचेही त्यांच्यावर होते. पण का कुणास ठाऊक, श्री. मेनन यांच्या रंगामुळे म्हणा की विक्षिप्तपणामुळे म्हणा, तिने त्यांना नकार दिला. त्याचा श्री. मेनन यांनी धसकाच घेतला. त्यांनी एकदम अंथरूण धरले. कितीतरी दिवस काही न खाता-पिता ते आपल्या खोलीत निपचित अंथरुणावर पडून होते. शेवटी हॅरॉल्ड लास्की आणि सौ. लास्की मेननच्या खोलीवर स्वत: गेले. सौ. लास्की यांनी त्यांची समजूत काढली.

पं. नेहरू वारंवार लंडनला येत असत. इंडिया लीगच्या कामामुळे त्यांची आणि श्री. मेनन यांची नेहमीच गाठ पडे. त्यांच्याबरोबर येत असलेल्या नेहरू कुटुंबाशीही श्री. मेनन यांची चांगली ओळख झाली.

## पं. नेहरूंवर प्रभाव

श्री. लास्की यांच्या प्रभावामुळे लंडनमध्ये ते लेबर पक्षाच्या राजकारणात ओढले गेले. लंडनमधील सेंट पॅनकास बरो कौन्सिलवर त्यांची निवड झाली. तेथील ग्रंथालयाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगलेच नाव कमावले. सेंट पॅनकास 'फ्रीडम ऑफ द बरो' हा किताब आजपर्यंत दोघांनाच मिळाला आहे. एक जॉर्ज बर्नार्ड शॉ आणि दुसरा श्री. कृष्ण मेनन यांना. पण पुढे भारतीय स्वातंत्र्याच्या बाबतीत लेबर पक्षाने धारण केलेली उदासीन भूमिका बघून त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. दुसऱ्या महायुद्धात रशिया पडल्यानंतरच ते लंडनच्या सिव्हिल डिफेन्स सर्व्हिसमध्ये भरती झाले. लंडनवरील विमान हल्ल्यांच्या वेळी त्यांनी मोठ्या धाडसाच्या कामगिऱ्या पार पाडल्या.

दरम्यान त्यांची पंडित नेहरूंशी मैत्री वाढतच होती. दोघेही एकमेकांकडे आकर्षिले जात होते. लंडनमध्ये नेहरू आले, की त्या दोघांच्या सतत गाठीभेटी होत आणि चर्चा होत. भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर चर्चा करायला नेहरूंना मेनन-

शिवाय दुसरा मित्र नव्हता. स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी श्री. मेनन यांना भारताचे ब्रिटनमधील राजदूत म्हणून नेमून टाकले. आणि तेव्हापासून भारतीयांना श्री. मेनन यांच्याविषयी माहिती कळू लागली. तोवर श्री. मेनन हे भारतीयांना जवळ जवळ अज्ञात होते. आणि तेव्हापासूनच कटकटींना सुरुवात झाली.

लॉर्ड ॲटली हे तेव्हा ब्रिटनचे प्रधानमंत्री होते. त्यांनी श्री. मेनन यांच्या नेमणुकीलाच विरोध केला. गृहमंत्री सरदार पटेल आणि मौलाना अबुल कलम आझाद यांनीही मेननच्या या नेमणुकीला विरोध केला. पण मेनन हेच ब्रिटनमध्ये भारताचे उत्कृष्ट प्रतिनिधित्व करू शकतील, ही पं. नेहरूंना खात्री होती. कुणाच्या विरोधाला न जुमानता नेहरूंनी मेननचीच नेमणूक पक्की करून टाकली. कुणाच्या विरोधाला न जुमानता नेहरूंनी मेननला उचलून धरावे, ही प्रथा तेव्हापासूनच पडली. श्री. मेनन यांच्या बुद्धिमत्तेचा, त्यांच्या सखोल अभ्यासाचा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या ज्ञानाचा नेहरूंवर खूपच प्रभाव पडला होता.

राजदूत म्हणून नेमणूक होताच श्री. मेनन यांनी पहिली गोष्ट केली असेल तर ती स्वतंत्र भारताचे स्वातंत्र्य ब्रिटिश जनतेला जाणवून देण्याची. लंडनमधील भारतीय हायकमिशनचे ऑफिस त्यांनी खूप सुधारून घेतले. नोकरवर्ग वाढविला. सुंदर चित्रे आणि फर्नीचर घेतले. लांबसडक, सुबक मोटारी विकत घेतल्या. ( ते स्वत: मात्र बसमधूनच प्रवास करीत. सरकारी कामाला मात्र इतमामाने गाडीने जात. ) हायकमिशनच्या निवासस्थानासाठी त्यांनी एक भव्य राजवाडा विकत घेतला. ते स्वत: मात्र त्यांच्या जुन्या इंडिया लीगच्या एका कोपऱ्यातल्या खोलीतच शेवटपर्यंत राहत. आतापर्यंत ते कसेतरी गबाळे कपडे करीत असत. आता मात्र ते बदलले. लंडनमधील उत्कृष्ट कपडे केलेला राजदूत म्हणून लोक त्यांच्याकडे बोट दाखवीत. स्वतंत्र भारताचे हायकमिशन म्हणजे साधीसुधी गोष्ट नव्हे हे त्यांना दाखवून द्यायचे होते. त्यांच्या या खर्चिकपणाबद्दल मात्र इकडे भारतात टीकेची बारेमाप झोड उठू लागली होती.

भारतीय हायकमिशनचे लंडनमधील एक प्रमुख काम म्हणजे भारतासाठी वस्तू खरेदी करणे. आतापर्यंत हायकमिशन ब्रिटिशांच्याच ताब्यात असल्याने विकत घेणारे ब्रिटिश अधिकारी आणि विकणारेही ब्रिटिश व्यापारी, त्यामुळे अनेक लागेबांधे, संबंध, हितसंबंध निर्माण झाले होते. श्री. मेनन यांनी सगळ्या जुन्या प्रथा मोडून अनेक वस्तूंची भराभर खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यात अनेकांच्या हितसंबंधांना बाध येत होता. आणि त्यामुळे श्री. मेनन यांच्यावर बरीच टीका होत होती. भारतीय लष्कराला उत्कृष्ट बंदुका श्री. मेनन यांनी स्वस्त दरांत मिळवून दिल्या. अशाच स्वस्त दरांत जीप्स भारतीय लष्कराला मिळवून देण्याच्या ते प्रयत्नात होते. त्यासाठी त्यांनी एका खाजगी कंपनीशी करार केला. पण त्यात त्यांची फसवणूक झाली. पैसा गेला, पण कराराप्रमाणे चांगल्या जीप्स आल्या नाहीत. हे प्रकरण

श्री. मेनन यांच्या खूपच अंगाशी आले. त्यांच्या हितशत्रूंनी त्याचा खूपच फायदा घेतला, पण या प्रकरणात मेनन यांनी स्वतः काही मिळवले हे जसे हे हितशत्रू सिद्ध करू शकले नाहीत, तसे श्री. मेनन यांनीही स्वतः या प्रकरणावर काही प्रकाश टाकला नाही. बऱ्याच जणांनी शेवटी या प्रकरणात बेजबाबदार उघळपट्टी केली म्हणून श्री. मेनन यांना दोष दिला.

## युनोतील कर्तबगारी

श्री. मेनन यांची हायकमिशनरपदाची मुदत संपत आली होती. पण जीप प्रकरणामुळे ती संपण्याआधीच दोन महिने त्यांची जागा श्री. बाळासाहेब खेर यांनी घेतली आणि नेहरूंनी त्यांची नेमणूक युनोतील भारताचे प्रतिनिधी म्हणून करून टाकली.

युनोमध्ये प्रवेश केल्यावरच श्री. मेनन यांच्या कर्तृत्वाला खरा वाव मिळाला. राजदूतपद हे त्यांच्या कर्तृत्वाला तोकडेच होते. युनोतही पहिले एक वर्ष त्यांना श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांच्या हाताखाली काम करावे लागले. ते वर्ष त्यांनी बाईशी भांडणे करून गाजवले. पुढे बाईंची जनरल असेंब्लीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर त्यांच्या प्रतिभेला खरा बहर आला. कोरिया, इंडोचीन, बांडुंग, कम्युनिस्ट चीन, आफ्रो-आशिया, लॅटीन अमेरिका, बर्लिन—साऱ्या ज्वलंत प्रश्नांवरील चर्चेत ते हिरीरीने भाग घेत आणि प्रश्न सोडविण्यासाठी भराभरा समीकरणे शोधून काढीत. पाश्चात्त्यांना ते अप्रिय होते. पण त्यांची समीकरणे, त्यांनी सुचवलेले उपाय स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नसे. सर्व पाश्चात्त्य देशांत भारतीय पुढाऱ्यांमध्ये नेहरूंनंतर कृष्ण मेनन यांचेच नाव माहीत होते याचे कारण हेच.

हंगेरियन लोकांनी १९५६ मध्ये रशियन दंडसत्तेविरुद्ध केलेले बंड रशियाने आपले पाशवी लष्करी सामर्थ्य वापरून दडपून टाकले. हंगेरियन क्रांतीच्या बातम्या वृत्तपत्रांत येत होत्या. युनोमध्ये सोव्हिएट रशियाच्या दडपशाहीचा निषेध करणारा ठराव पुढे आला, तेव्हा "अद्याप पुरेशी अधिकृत माहिती मिळाली नाही," या सबबीवर श्री. मेनन यांनी या ठरावाविरुद्ध मत दिले आणि सर्वत्र टीकेची झोड उठवली. वास्तविक पाहता हंगेरीच्या प्रश्नावर नेहरू आणि मेनन यांचे एकमत होते. ठरावाच्या आदल्याच दिवशी नेहरूंनी कलकत्त्याला ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीपुढे केलेल्या भाषणात स्पष्टपणे रशियाची बाजू उचलून धरली होती. या भाषणाचा अभ्यास करूनच मेनन यांनी तसे मत दिले होते. परंतु सभोवताली उफाळलेली टीकेची झोड पाहताच नेहरूंनी मागे पाऊल घेतले. आणि "मेनन यांचे मत म्हणजे नेहमीच भारताचे प्रातिनिधिक मत असे धरता कामा नये," असे गुळमुळीत बोलून सारी जबाबदारी मेननवर ढकलली. प्रकरण आपणावर शेकते आहे, असे पाहताच नेहरूंनी मेनन यांना पुढे घातले, असा हा पहिला प्रसंग. दुसरा प्रसंग चिनी आक्रमणाच्या वेळचा.

[पृष्ठ ५० वर चालू]

## मन

मन नागडे नागडे
त्याला कशाने झाकावे
प्रकाशाला अंधाराने
कसे काय रोखावे–
मन रांगडे रांगडे
त्याला कसे शिकवावे
पाप कशाला म्हणावे
पुण्य कशाला म्हणावे
मन उनाड उनाड
मन मुलखाचे द्वाड
किती शोधावे शोधावे
मन मनाच्या पल्याड–
मन लबाड लबाड
मनासारखे वागते
मन जनाची मनाची
लाज कोळूनिया पिते

*ह. शि. खरात*

## आज पहाटे

आज पहाटे
सनईच्या मंजुळ सुरांनी
भिजून चिंब मी उभी राहिले
अंगणातल्या बकुळीखाली.
फिकट चंद्रमा
ढळता ढळता हळूच कलला
खांद्यावरती;
आणि म्हणाला,
'माहित मजला माहित सगळे
गुपित तुझे नि गुपित रात्रिचे…
अस्फुट कुजबुज दरवळलेली
जेव्हा ढळला पदर हिन्याचा…
आणिक काही…बरेच काही…'
मी मोहरले,
मी बावरले,
हरवुन गेले
बकुळफुलांच्या पखरणीमधे.

*विनोद कुलकर्णी*

## आषाढ

आकाशाच्या उंचीचा आधार घेऊन
अंतराळात तरंगणारे बुटके ढग
जेव्हा स्वत:च्या उंचीची फुशारकी मारू लागतात
तेव्हा
आकाशून गेलेला काळा रंग म्हणतो
"लखलखणाऱ्या बिजलीलाही जागा नाही इथं
मग तू रे कोण ?"
अपमानानं काळ ठिक्कर पडलेले ढग
अंधारात डोळे फाकुन पाहू लागतात
नव्या नेतृत्वासाठी … श्रावणाच्या.

*वसंत शा. वैद्य*

## शिल्लक

आकांक्षा विशाल
ध्येयहि उदात्त
धुंद झाले चित्त कल्पनेत.
यशाचे स्वागत
मनात विरले
नाचली पाऊले दुर्दैवाची.
भंगणारी स्वप्ने
भंगुनिया गेली
शिल्लक उरली हळहळ.

*गोविंद कुलकर्णी*

# आस्वाद

मूळ मन हे स्वच्छ निर्लेप मुलासारखे असते. पण संसर्गाने त्याच्यात जाणीव निर्माण होते. जाणीव आली की, पाप-पुण्य इ० द्वंद्व आलेच. ह. शि. खरात यांनी हेच सत्य उघडचा-नागडचा शब्दांत दाखविले आहे. पण मूळ मन जितके स्वच्छ तितकेच आडदांडही आहे. शेवटच्या कडव्यात याचा प्रत्यय आणून दिला आहे. बहिणाबाई चौधरींच्या शैलीचे वळण या कवितेला आहे, असे म्हटले तर चूक ठरणार नाही. दुसऱ्या कडव्याच्या मनाच्या पलीकडे उडी घेण्याचा प्रयत्न आहे. ती उडी थोडी अलीकडे पडली आहे इतकेच !

'आज पहाटे' झालेला साक्षात्कार पुष्कळांना आपलासा वाटेल. पहाटेची पार्श्वभूमी अनुभवलेल्या रम्य अनुभवाच्या स्मृतीला अधिक उत्कट करते. वर्णन स्थूलच आहे. अलंकारांचा साज त्यावर चढविलेला नाही. पण सारे वातावरण कुठेतरी सूक्ष्माला स्पर्श करून जाते. खांद्यावर कललेल्या चंद्राने एक नजीकचे नाते निर्माण केले. आपल्या गूढ भावना निसर्गाच्या विलासात प्रतिबिंबित झालेल्या आपण पाहत असतो. आणि प्रणयाचे अद्वैत अनुभवून जी प्रेमी व्यक्ती आनंदाने न्हाऊन निघाली आहे, तिला तर सर्व चराचर जणू आपल्या त्या आनंदाचे साक्षी आहे, असा भास होत राहतो. हीच मधुर भावना बकुळफुलांच्या पखरणीमध्ये उभ्या असलेल्या नायिकेच्या चित्रात विनोद कुलकर्णी यांनी रंगविली आहे. शेवटच्या तीन अष्टमात्रिक ओळींतली गतिमानता फार हृदयंगम वाटेल.

'शिल्लक' ही कविता अनेक ध्येयवाद्यांच्या जीवनांचा हा ताळेबंद आहे. कित्येकजण म्हणतील की आपल्या समाधीवर हाच मृत्युलेख लिहावा. कारण, यशापयशाची वजावाकी केली तर बऱ्याच ध्येयपूजकांच्या जीवनात हळहळच शिल्लक उरते. गोविंद कुलकर्णी यांना यापुढे काही सांगावयाचे आहे काय ? थोर ध्येये प्रयत्न करूनही साकार झाली नाहीत तर ते अपयशही मोठेच नसते का ? बाजारी जीवनातल्या यशापेक्षाही हळहळ केव्हाही श्रेष्ठच.

सूर्याच्या उन्हापेक्षा तापलेली वाळू अधिक चटके देते. थोर नेत्याच्या आश्रयाने राहणारे अनुयायीच अधिक मुजोर असतात. आकाशाच्या लांबीरुंदीला आणि उंचीला अंत नाही. पण या अनंतत्वाने उन्मत्त होतात बुटके ढग. वसंत वैद्यांनी हे रंगविताना बिनबुडाचा अहंकार नवे नेतृत्व कसे शोधत राहतो हे मार्मिकपणे दाखविले आहे. अगदी खिशात मावण्याजोगे चित्र पण मार्मिकपणाच्या भिंगातून पाहिले तर फार मोठा देखावा डोळ्यांपुढे उभा राहील आणि खोल आशय मनाला पटेल.

—गोपीनाथ तळवलकर

# नकार

## ती विजेसारखी आली, वाऱ्यासारखी निघून गेली, उमाकान्त निराश झाला, त्याच्या कितीतरी स्वप्नांना...

### शरद बरबरे

कालपासून उमाकान्त अगदीच खुशीत होता. सुखस्वप्नात रमला होता. भावी जीवनाची मनोहारी चित्रे रेखाटण्यात त्याने कालची रात्र पापण्या मिटू न देता घालविली होती. त्याला कारणही अगदी तसेच विशेष होते. तसा तो नेहमीच खुशीत असायचा, समाधानी दिसायचा, आनंदी वाटायचा. पण कालपासून त्याच्या सुखासमाधानाला नेहमीच्यापेक्षा खूपच गहिरा रंग चढला होता. त्याचे निळसर डोळे अनामिक सौंदर्याचा वेध घेण्यात मग्न झाले होते. काल संध्याकाळपासून त्या सोनेरी स्वप्नांशिवाय, गुलाबी जीवनाव्यतिरिक्त एकही क्षण त्याच्या मनात दुसरे विचार शिरू शकले नव्हते.

उमाकान्ताने काल एक मुलगी 'पाहिली' होती. अर्थात एकटचा-दुकटचाने जाऊन नव्हे तर आवश्यक तेवढ्या लवाजम्यासहित 'पाहण्याचा' कार्यक्रम पार पडला होता. खरं म्हटलं तर हा काही अगदीच पहिला प्रसंग नव्हता त्याचा मुलगी पाहण्याचा ! पण आतापर्यंत त्याला जे हवं ते दिसलं नव्हतं म्हणून तो बहुधा नाराजच असायचा. मुलगी गोरी असली तर उंच नसायची, उंचीपुरी असली तर लठ्ठंभारती वाटायची, घष्टपुष्ट असली तर रंग घात करायचा, काही ठिकाणी सगळं कसं मस्त जमून यायचं पण मग शिक्षणासाठी घोडं अडून बसायचं ! अर्थातच त्याच्या घरच्यांनी तर अगदी स्पष्टच सांगून टाकलं होतं, "अरे कान्ता-बाबा, तुला अशी बत्तीस लक्षणी आखूडशिंगी बहु दुधी बायको कशी मिळायची रे. देव कुठे ना कुठे तरी जरा 'कमी' ठेवतोच. मोठी चिंता वाटते बघ आम्हांला तुझी ह्या बाबत......" पण उमाकान्तची भूमिका निश्चित होती. ह्या बाबतीत तो आईला म्हणे, "आई, अग, परमेश्वराने मला जन्माला घालताना माझं सर्व काही अगोदरच निश्चित करून ठेवलं असेल ना ? मग झालंच तर ! थोडा उशीर लागेल एवढंच ना, मला तरी कुठं घाई झालीय ? बघू या आपण......" उमाकान्ताच्या उत्तराने सारेचजण मूक बनत.

कालपासून मात्र घरातल्या सर्वांचीच कळी अगदी छानपणे खुलली होती...... दादाला मुलगी पसंत आहे म्हणून लहानगी मुलं बागडू लागली होती, छोटचा साहेबांना मडुम येणार, म्हणून गडी, मोलकरीण खूष होते. पोराला एकदाची मनाजोगती मुलगी सापडली म्हणून नानासाहेबांचा आनंद वाढला होता आणि आता सूनमुख पाहायला फारसा उशीर नाही म्हणून कांताच्या आईचं सुख पोटात मावत नव्हतं......अन् ह्या सर्वांपेक्षा जास्त समाधान झालं होतं ते उमाकांताचं.

...... तो आतासुद्धा मनाशी त्याच प्रसंगांची उजळणी करीत होता. मनाशीच म्हणत होता, "काय पोरगी आहे ! ते स्वप्नाळू डोळे, कुरळे केस, लांबसडक वेण्या केतकीचा वर्ण, मोठं कपाळ, गर्द विटकरी ओठ, कोरीव धनुष्याकृती भिवया, गालावर पडणारी नाजुकशी खळी, चिचोळी हनुवटी, उणीपुरी उंची, लालसर, गुबगुबीत गाल, तारुण्य उमारीला आलेलं, शिवाय बी. ए. झालेली,......ह्यावर आणखी कडी म्हणजे दीड-पावणे दोनशे रुपयांची नोकरी करते आहे..... बस्त ! बस्स ! आणखी काय पाहिजे ?..... अप्सरेचं सौंदर्य, पुरेसं शिक्षण, प्रतिष्ठित घराणं, आपल्यासारख्याच आवडी निवडी... वा ! वा ! ......" अजूनही उमाकान्त विचारलहरींवर तरंगत होता. कालच्या प्रसंगाच्या मधुर स्मृतींत खोल सूर मारीत होता. कलावंतानं आपली कलाकृती निर्माण करीत असताना जसं त्या विषयाशी एकरूप व्हावं, तादात्म्य पावावं, तसा तोसुद्धा त्या मुलीच्या काल्पनिक मूर्तीशी संवाद करीत होता.

इतका एकाग्र झाला होता की, मघापासून त्याच्या आईने अनेकदा हाका मारूनदेखील त्याला एकसुद्धा ऐकू आली नव्हती. शेवटी त्याची आईच त्याच्या खोलीत येऊन म्हणाली, "अरे कान्ता, तुला ऑफिसला जायचं नाही वाटतं आज ? एक तर सकाळी उशिरा उठलाहेस आणि अजूनसुद्धा 'धीमे धीमे' चालूच आहे तुझं....."

तो पटकन उठला आणि जेवणासाठी स्वयंपाकघराकडे वळला. आईने ताट करून ठेवले होतेच. "आणि बरं का, काळयांना कळवलंय म्हटलं आज सकाळीच, की आम्हांला मुलगी पसंत आहे म्हणून. देण्याघेण्याबाबत तर काही तक्रार होणं शक्यच नाही. माणसं समजूतदार आहेत आणि आपणही त्यांची परिस्थिती जाणून आहोत......" जेवताना आई म्हणाली. त्याला एकदम ठसका लागला. "अरे हळूहळू, घाई कशाला एवढी !......" आईने हसून म्हटले. त्याच वेळी त्याला वाटले, "मी नेहमीसारखाच सावकाश जेवतोय,...पण ठसका तर लागलाय. त्या अर्थी नक्कीच तिने आठवण केली असली पाहिजे......" आपल्या कल्पनेचे त्याला खूप कौतुक वाटले...भरभर सारे आवरून तो पटकन् बाहेर पडला नि क्षणार्धात ऑफिसच्या दिशेने निघालेली त्याची सायकल दिसेनाशी झाली.

ऑफिसमध्येही त्याचे कामात लक्ष लागत नव्हते......ही फाईल घे, नुसतीच

उघडून ठेवून दे. हे कपाट बंद कर, दुसरे उघड...असे त्याचे सारखे चालू होते... क्षणभर काही त्याला काम करावेसे वाटत नव्हते...वाटणार कसे ? सतत तिचीच मूर्ती डोळ्यांसमोर दिसत होती...हसताना, बोलताना, लाजताना. मग तोही मनाशीच हसत होता, हलकेच बोलत होता...थोडासा लाजतही होता...योगायोगही मोठा मजेदार होता...त्या मुलीचे नावदेखील 'उर्मिला' होते..."उर्मिला म्हणे उमा,–शॉर्टफॉर्म, आणि आपण उमाकान्त...म्हणजे !...म्हणजे...!!...गंमतच आहे नाही..." त्याचा विचारप्रवाह चालूच होता... "आपण तिला मग कधी लाडाने, म्हणू...उमा,...ए उमा,...," पण ती मुद्दाम न ऐकल्यासारखे करील. त्यावर आपण मुद्दामच हाक मारू, "ए मा ऊ, !, मा ऊ, ए माऊ" मग ती पुन्हा......"

उमाकान्त आपण ऑफिसात आहोत, हेच विसरला होता...भावनेच्या भरात त्याने टेबलावरच्या कागदावर कितीदा तरी 'उमा', 'उमा' अशी अक्षरे लिहिली होती. काही वेळेस मराठीत तर काही वेळेस इंग्रजीत...समोरचे सहकारी खाली माना घालून ढिगारे उतरवीत होते आणि हा मात्र नुसताच घुमत होता, पारव्यासारख्या, एकाच विचाराभोवती...

"गोखले साहेब, ओ गोखले साहेब, तुमच्याकडे कोणीतरी आलंय..." ऑफिसचा शिपाई त्याच्या टेबलासमोर उभा होता. त्याच्या आवाजाने तो एकदम भानावर आला.

"आँ ! काय म्हणालास ?" त्याने पुन्हा विचारले.

"तुम्हांला कोणीतरी भेटायला आले आहे खाली." शिपायाने माहिती पुरविली.

"काय माझ्याकडे ! ह्या वेळी ? ऑफिसमध्ये ? कोण, आहे तरी कोण ?" उमाकान्त खुर्चीवरून उठत म्हणाला...

शिपाई नीरसतेने म्हणाला, "कोणीतरी बाई आहेत. कधी पाहण्यातल्या नाहीत माझ्या, पण तुम्हांला भेटायचं म्हणत् होत्या." शिपायाने पाठ वळविली.

उमाकान्त आश्चर्यात बुडून गेला होता. कोण बरं आलं असेल, ह्या वेळी... उमा, ती तर नसेल ? पण छे, लग्नाअगोदर कशी येईल ती...पण पायऱ्या उतरत असताना अनेक शंका त्याच्या मनाच्या दाराशी मांजरीच्या पावलांनी घुटमळत होत्या. खाली येऊन त्याने पाहिले आणि तो अक्षरशः चकित झाला. त्याची शंका खरी ठरली होती. अकल्पितपणे काल 'पाहिलेली' अन् पहिल्या श्वासात 'पसंत' केलेली 'ती' मुलगीच त्याच्याकडे आली होती...

दोघांची नजरभेट होताच तिने त्याला नमस्कार केला नि आपल्या नादमधुर शब्दांत म्हणाली, "तुम्हांला खास भेटण्यासाठी आलेय मी..."...उमाकान्ताच्या अंतःकरणात गुदगुल्या होत होत्या...खरं म्हणजे ऑफिसच्या वेळात तुम्हांला येऊन भेटणं मूर्खपणाचं म्हणाल तुम्ही, पण—"

"छे ! छे ! तसं काहीच नाही...चला, आपण कँटिनमध्येच बोलू..." आनंद-मिश्रित स्वरात उमाकान्त उत्तरला.

"मी मघाशीच तुम्हांला म्हटलं, तुमची खास भेट घेण्यासाठी आल्येय मी–' कँटिनमध्ये बसल्यानंतर तिनेच प्रथम संभाषणाला सुरुवात केली..."काल तुम्ही आमच्याकडे मला पाहायला आला होता, हो ना ?"

"हो."

"तुम्हांला मी पसंत पडले आहे हे खरं ना ?"

"हो."

"तुमचा होकारही आमच्याकडे तुम्ही आज सकाळी कळविलात ना ?"

"हो म्हणजे जवळ जवळ तसंच."

"म्हणजे एकंदरीत तुम्ही माझी पूर्णतः स्वेच्छेने निवड केलीत असंच ना ?"

"हो." उमाकान्तचे 'हो'-'हो'चे होकायंत्र चालूच होते.

"मग मी स्वतःहून तुम्हांला माझी माहिती करून देते. काल मोठ्या माणसांत नाही बोलता आलं मला. पण आपणा दोघांच्या आयुष्याचा प्रश्न तो आहे...म्हणून मुद्दाम मी स्वतःच तुम्हांला सारे सांगण्यासाठी आले आहे......मागाहून तुम्हांला पश्चात्ताप होऊ नये म्हणून...

"...पहिली गोष्ट म्हणजे मी कॉलेजमध्ये चार वर्षे काढली आहेत...साहजिकच खूप 'सोशल' स्वभाव आहे माझा...तुम्हांला चालेल ?"...उमाकान्तचा होकार ओठातच विरला..."मी बरीचशी सोशल असल्याने ओळखीच्या माणसाशी मी खूपच मनमोकळेपणाने बोलते. तुम्हांला आवडेल ?" उमाकान्त मूग गिळून बसला.

"दुसरं असं की, लग्नानंतर मी ही नोकरी सोडून देणार आहे. कारण लग्नानंतर मला संसार करायचा आहे, नोकरी नव्हे...तुमची हरकत नसेल ?"...पगारदार बायकोचे स्वप्न उमाकान्ताच्या मनात वितळू लागले होते.

"आणखी असं की,...मी गेले दोन वर्षे सर्व्हिस करते आहे...ऑफिसातल्या अनेक तरुण पुरुषांशी माझा सहवास घडला आहे...इतकेच नव्हे तर ऑफिसमधल्या एका तरुणाच्या नि माझ्या संबंधांचा बभ्रा झाल्याची हकीकतही तुमच्या कानी आली असेल..." उमाकान्तने जे त्रयस्थाकडून ऐकले होते आणि थाप, म्हणून सोडून दिले होते ते तो त्या मुलीच्याच तोंडून ऐकत होता...

"मी तुम्हांला हे सर्व अशासाठी सांगते आहे की मागाहून तुमच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येऊ नये... काही झालं तर लग्नानंतर तुम्हांला हे कुणाकडून तरी समजलं असतं, मग विनाकरणच तुमच्या मनात माझ्याबद्दल कायमची अढी निर्माण झाली असती. आता काळ बदललाय...स्वतःचं सुख ते दुसऱ्याचं सुख मानण्याचा काळ मागे पडलाय. आपण सुसंस्कृत आहोत...सुशिक्षित आहोत...संसार सुखाचा व्हायचा असेल तर दोघांची मनं कशी साफ असावीत एकमेकांबद्दल !...मागाहून

तक्रार नको...तर तुम्ही ह्याचा विचार करा...नि मग पुन्हा कळवा ! ..."

ती विजेसारखी आली, वाऱ्यासारखी निघून गेली. पण उमाकान्त मात्र फार निराश झाला होता. त्याच्या कितीतरी स्वप्नांना तिच्या शब्दप्रहारांनी तडे गेले होते...किती थोड्या वेळात मनाचा रंग पालटून गेला होता ?...ती गेल्यावर तो बराच वेळ तिथे बसून राहिला...विचार करकरून त्याचे डोके भणभणू लागले होते...

अखेरीस त्याने अर्ध्या दिवसाची रजा घेतली आणि तो घरी परतला– 'डोके दुखते आहे म्हणून आलो' असे सांगून त्याने सरळ आपल्या खोलीकडे धाव घेतली. रात्रीच्या जागरणाने लागलं असेल दुखायला, असं म्हणत आईनं अमृतांजन आणून दिलं...बराच वेळ तो तसाच निपचित पडून होता...एक मन म्हणत होते. नाकारावी ही मुलगी... नोकरी करण्याची इच्छा नाही, संसाराला हातभार लावण्यास उत्सुक नाही,...स्वभावाने फाजील मनमोकळी,...दोन वर्षे पुरुषांच्या सहवासात भावना कोमट झालेली...शिवाय एक जुनं प्रकरण...स्वत:हून कबुली दिली म्हणून काय झालं ?...वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून कसं चालेल ?"...दुसरं मन ओरडत होतं, "तिचा प्रामाणिकपणा पाहिल्यावर कौतुक वाटते...हल्ली कोणी सांगतं का असं पूर्वकथन...आपली श्रद्धा आहे, निष्ठा आहे चांगुलपणावर तिच्या, नेकीवर...चालायचच बाकीचं...जुनं प्रकरण म्हणे...एवढं कशाला महत्त्व द्यायचं ?"

कितीतरी उशीराने त्याचं विचारमंथन थांबलं...का कुणास ठाऊक मनातलं मळभ दूर झालं...कसं कोण जाणे, उमा अजूनही नजरेआड होत नव्हती...त्याच्या मनातला नकाराचा विचार पिसासारखा गळून पडला...

—आणि मग दुसऱ्या दिवसापासून घरात लग्नाचे वेध सुरू झाले...उमाकान्तने पहिल्यांदा दिलेला होकार बदलला नाही..नंतरच्या काही दिवसांतही त्याने उमाची भेट घेतली नाही...देणे घेणे चुटकीसरशी मान्य झाले...अपरिचित माणसे 'संबंधी' झाली–कितीतरी नवी नाती निर्माण झाली...आणि मग हळदीच्या पावलांनी, मेंदीच्या हातांनी, सुशोभित कंठाने, डोक्यावर पदर घेऊन उमा उमाकान्ताच्या घरी 'लक्ष्मी' म्हणून आली...लग्नापूर्वी आपण उमाकान्ताला जाऊन सगळं काही सांगितलं तरीसुद्धा उमाकान्ताचे विचार बदलले नाहीत. त्यांना आपण खरोखरच खूप आवडलेल्या दिसतो...ह्या विचाराने ती रोमांचित झालेली होती, मोहरून गेली होती...शब्दांपेक्षा दृष्टीनेच त्याला ती आपलेसे करीत होती...

आणि मग तो क्षण येऊन ठेपला. विवाहाच्या पवित्र बंधनांनी एकत्र येऊन लाभणाऱ्या एकांतवासाचा...उमाकान्त संपूर्ण सोहळा पार पडेपर्यंत जरी वरकरणी हसऱ्या चेहऱ्याने वावरत होता तरी त्याच्या अंत:करणात खोल कुठेतरी ओझरती जखम खुपत होती. उमेला आपण आवडलो नसल्यामुळे तिने स्वत: येऊन नकाराऐवजी आपल्याला नकार देण्यास उद्युक्त करणारी कारणे सांगितली असावीत हे अस्पष्ट दु:ख उराशी तो वागवीत होता...

" उमा, आज त्या तुझ्या आकस्मिक भेटीनंतर प्रथमच आपण असे भेटतो आहोत."

" पण त्या वेळी मी कुमारी होते म्हटलं !" उमाने हसून उत्तर दिले...

" पण का ग उमा, हे लग्न तुझ्या मनाविरुद्ध तर झाले नाही ना ? नाही म्हणजे उगाच हीच शंका सारखी माझ्या मनात भुणभुणते आहे."

" छट्, काहीतरीच. उलट मी तुम्हांला इतकी कारणे सांगूनही शेवटी तुम्ही आपली पसंती बदलली नाहीत ह्याचा अभिमान वाटतो मला. दुसरा कोणी असता तर त्याने ते ऐकताच पटकन नकार कळविला असता."

" ...मीसुद्धा त्याला अपवाद नव्हतो उमा, तू गेल्यानंतर माझ्या मनातसुद्धा आले होते तसे...पण मग घरी गेल्यावर खूप खूप विचार केला मी......अन् मग विचारांती पटलं मला...तुझं म्हणणं होतं की मी मनमोकळ्या स्वभावाची आहे, सोशल आहे...प्रथम वाटलं की लग्नानंतर ही बया आपलं लोढणं गळ्यात अडकवून साऱ्या गावाशी गप्पा करण्यात हिंडेल, पण लग्नानंतर जबाबदारीची जाणीव होते माणसाला...कुठं कसं काय वागावं हे का त्या वेळी शिकवावं लागतं ? आणि म्हणूनच उमा, तो विचार मी मनावेगळा केला...

" अन् बरं का उमा, विवाहोत्तर तू सर्व्हिस करणार नाहीस हे मी तुझ्याकडून ऐकलं ना तेव्हा थोडं वाईटच वाटलं बघ मला, पण म्हटलं, लग्नानंतर समजेल तिला दोघंजण कमवत असल्याचं सुख नि चट् येशील मूळपदावर, अन् नाही म्हटलं तरी माझा पगार पुरेसा वाटला मला आपल्यासाठी...

" पण मी दचकलो ते तू जुन्या प्रकरणाची आठवण करून दिल्यानंतर...पण म्हटलं जी स्वतःच्या तोंडून इतकी प्रांजलपणे कबुली देतेय...ती पाकदिलाची असली पाहिजे, नाहीतर एवढं धाष्टर्य कुठून असणार सगळं सांगण्याचं...चुका होत असतातच, पण पुन्हा होऊ नयेत म्हणून पुढचं पाऊल नीट टाकायचं असतं..उमा, मी साऱ्या गोष्टींचा नीट विचार करूनच माझी पसंती बदलली नाही..."

उमा गहिवरून आली होती......भारावलेल्या अंतःकरणाने ती बोलू लागली, " किती विचारी आहात हो तुम्ही...खरं सांगू, मी तुम्हांला जे सांगितलं त्या वेळी ते नेमकं उलटं होतं...म्हणजे असं की, मी सोशल नाही...परपुरुषाशी बोलणं मला जमत नाही, पण नोकरी करणाऱ्या मुली फार बोलभांड असतात, असा सर्वांचा समज !...तेव्हा तुम्हांला मुद्दामच सांगितलं. नि नोकरीचं म्हणाल तर मी खोटंच सांगितलं...हल्ली महागाई ती कोण...कशासाठी सोडायची मग नोकरी ? पण म्हटलं, ह्यांचं माझ्या मिळकतीवर तर लक्ष नाही ना ? म्हणून दिली थाप ठोकून...अन् त्या प्रकरणाचं म्हणाल तर..."

" उमा..." उमाकान्त कातर स्वरात उद्गारला...

बराच वेळ कुणीच बोललं नाही. ते शक्यच नव्हतं. कारण दोघांचे अधर रति-मदन झाले होते.

● ● ●

# सांगत्ये ऐका

: १ :

पंजाबी पोशाख मी एकदाच माथेरानला असताना केला आणि त्याची मला चांगली जन्मभर आठवण राहील.

त्या वेळी आमचं 'मिनर्व्हा'चं 'बैरामखान' हे चित्र चालू होतं, त्याच सुमाराला आई आणि वडिलांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून मी त्यांच्याबरोबर माथेरानला गेले होते. वडलांना पायाचं अधुत्व आलं होतं, पण माथेरानला सुमारे महिनाभर उपचार झाल्यानंतर ते हिंडू फिरू लागले होते. बरोबर रेखाही होतीच.

रेखा तेव्हा तीन-चार वर्षांची असेल. मी तिला घोड्यावर बसवायला शिकवीत होते. तिला मी एकटीलाच घोड्यावर बसवायची आणि मागून चालत जायची.

एकदा तिला अशीच घोड्यावर बसवून मागून चालले असताना समोरून एक मोळीवाला आला. त्याला पाहून घोडा एकदम बुजला. तो बिथरला आणि पाय उंच करीत उड्या मारू लागला. पहिल्याच झटक्यात रेखा फेकली गेली. उंच जाऊन ती धप्पकन जमिनीवर आदळली.

मी घाबरले. घोडेवालाही घाबरला. समोरून आमच्याच ओळखीचं कुणी येत



## हंसा वाडकर
## एक नावित्यपूर्ण आत्मकथा

लेखांक : तिसरा

होतं. मी चटकन रेखाला उचललं, धावत शजारच्या एका बागेत गेले. रेखाचं डोकं चोळलं. कुठं काही लागलं नाही ना याची खात्री केली. तिला धावायला आणि उड्या मारायला लावलं. ती जेव्हा पुन्हा हसत खेळत पूर्वीसारखी धावू लागली तेव्हा तिची भीती घालवण्यासाठी म्हणून मुद्दाम तिला त्याच घोड्यावर बसवून घरी आणले.

माथेरानला घोड्यावर बसण्यासाठी म्हणून मी एकदा पंजाबी पोषाख घातला. मुलीनं ते पाहचलं आणि धावत धावत ती आत गेली. 'आजोबा बघा-बघा' असं म्हणत मला पाहण्यासाठी वडलांचं बोट धरून ती त्यांना बाहेर आणीत होती.

कशाला तरी अडखळून भाई पडले आणि पडूनच राहिले. मला वाटलं, भाई गंमतच करताहेत.

म्हणूनच मी म्हटलं, "– उठाना आता भाई, ही काय गंमत झाली ?"

पण पडल्या पडल्याच भाई म्हणाले, "उठता येत नाही बेबी मला. पाय लुळे पडले आहेत."

मी घाबरले. तावडतोब डॉक्टरांना फोन केला. अँब्युलन्स बोलावली. त्यांना लगेच मुंबईला न्यायचं होतं. तेवढ्यात माथेरानची गाडी सुटलेली. शेवटी कशीवशी स्टेशन मास्तरची अर्जवणी करून एक ट्रॉली मिळवली आणि त्यावरून भाईंना पाठवलं.

पुढे नंतर दीड महिना भाई हॉस्पिटलमध्ये पडून होते. नंतर त्यांच्या गळ्याला कॅन्सर झाला. ते मला नेहमी म्हणत, "बघ, बेबी बघ, हे काय होतं, खूप प्यायलं म्हणजे–"

पण तेव्हा डोकं कुठं होतं ठिकाणावर.

मी 'संत जनाबाई'त काम करत होते. तेव्हापासूनच भाईंची तब्येत ठीक नसायची म्हणून ते माझ्याजवळ पुण्याला न राहता मुंबईला आले होते. त्यांच्या गळ्याला एक मोठी गाठ आली होती. आणि ती हळूहळू वाढत होती. त्याचाच पुढे कॅन्सर झाला. माहिती व्हायच्या अगोदरच कॅन्सर वर आला. कुणा डॉक्टरला आधी कळलं नाही. कळलं असतं तर त्याच्यावर उपचार करता आला असता. नंतर एकदम कळलं तेव्हा पुढची अवस्था आली होती.

त्यांच्या गळ्याला छिद्र पडलं होतं. पोटात काही जात नव्हतं. अन्न देण्यासाठी पोटात नळ्या घातल्या होत्या. त्यांचे हाल बघवत नव्हते.

ते गेले तेव्हा मी त्यांच्याजवळच होते. माझा एकदम मोठा आधारच गेला. भाई गेले आणि माझी घराची ओढच गेली. ते असताना थोडीफार तरी घराची ओढ होती. तीही गेली. त्यांचा मला धाकही होता. "बेबी अमुक कर, तमुक करू नकोस" असं मला सांगणारे तेच एकटे. भाई गेल्यानंतर तर माझ्या आयुष्यात कुठलंच बंधन उरलं नाही.

माझे चित्रपट चालू होतेच. 'माणिक स्टुडिओ'त मी पुढचं पाऊल, पारिजातक, आणि कल्याणचा खजिना या तीनच चित्रपटांत कामं केली. त्यानंतर अनेक चित्रपटांत बाहेर कामं केली पण मनासारखा चित्रपट मिळत नव्हता. 'खेळ चालला' नशीबाचा, शिलंगणाचं सोनं, असे काही चित्रपट होते. शुटिंगसाठी मी मुंबई कोल्हापूर अशा वाऱ्या करीत होते.

'खेळ चालला नशीबाचा'चं आउटडोअर शुटिंग कल्याणला हाजीमलंग टेकडीजवळ होतं. दुर्गाबाई खोटे होत्या. त्यांनी मला विचारलं, "तुम्ही हाजीमलंगला जाऊन आला आहात का? नसल्यास जाऊन या." मी म्हणाले, "ठीक आहे, पुढच्या गुरुवारी जाऊन येईन."

मी आणि दुर्गाबाई खोटे अशा दोघी त्या सीनमध्ये होतो. टांगा पुढे जायचा आणि शॉट झाल्यावर मागे यायचा. तो रस्ता कठीणच होता. एका बाजूला पहाड आणि दुसऱ्या बाजूला दरी. मागे काही अंतरावर रस्ता संपला होता.

शॉट घेताना, टांगा समोर येताना, दुर्गाबाई टांग्यात बसायच्या आणि मागे परतताना खाली उतरायच्या. पण मी मात्र टांग्यातच बसून राहायची. दुर्गाबाई

म्हणाल्या, "तसं नको करूस. उगीच कशाला जीव धोक्यात घालतेस? खाली उतरून चाल."

पण मी ऐकलं नाही. टांग्यातच बसून राहिले. तिसऱ्या वेळी टांगा मागे जाताना घोडा बिचकला. टांगा मागे मागेच जाऊ लागला, थांबेचना. दुर्गाबाई टांग्याच्या बाजूनेच चालत होत्या. त्यांनी ते पाहिलं. सारे आऊटडोअरचे लोक "बाई गेल्या, बाई गेल्या" असे ओरडू लागले. पण दुर्गाबाईंनी मोठं धाडस केलं. टांगा कड्यापर्यंत पोचायच्या आधीच त्यांनी हात घालून मला खसकन् बाहेर ओढलं. मी एका दगडाच्या राशीवर पडले. टांगा घोड्यासकट खाली फेकला गेला होता.

मला थोडं खरचटलं होतं एवढंच. दुर्गाबाईंनी मला उठवलं आणि म्हणाल्या, "खाली बघ काय झालंय ते." मी त्या कड्याखाली पाहिलं. टांगा खोल जाऊन पडला होता आणि त्याचे तुकडे तुकडे झाले होते. घोडा मधल्या एका झुडुपावर थोडा अडकला होता. आणि त्याचं सर्वांग रक्तानं न्हाऊन निघालं होतं. ते दृश्य पाहताच मला एकदम गरगरून आलं. ते चित्रीकरण तिथेच थांबवलं, आणि आम्ही स्टुडिओत परतलो. दुर्गाबाई म्हणाल्या, "बघ, तू गुरुवारी हाजीमलंगला जायचं कबूल केलंस म्हणून वाचलीस."

काही इनडोअर शॉट्स घ्यायचे होते. आम्ही पुन्हा मेकअप केला. सेट उभा राहिला. सारी तयारी झाली. एवढ्यात मोठा ओरडा झाला. "—आग—आग—धावा धावा—"

आम्ही सारेच्या सारे घाबरून बाहेर पळत आलो. पाहतो तो दूर कुठेतरी एक बारीकशी आग लागली होती.

पण आता मूड गेला होता. या दोन्ही घटनांनी मस्तक भरून गेलं होतं. विश्रांती हवी होती. म्हणून म्हटलं, "—आता शुटिंग पॅक करा बाई. मूड सगळा पार गेलाय."

दुर्गाबाई खोटे यांना भजी फार आवडायची. शुटिंगमधून थोडा वेळ मिळाला आणि दुसरा कोणताच चाळा नसला की त्या सर्वांसाठी भजी मागवायच्या.

त्याच चित्रपटात सीन होता की मी रडत रडत येते आणि एका गृहस्थाचे पाय घट्ट धरते, तर ते आपले डायलॉग्ज बोलतात. त्या गृहस्थाचं काम निंबाळकरांनी केलं होतं. शॉटला थोडा अवधी होता. जवळ दुर्गाबाई होत्याच. त्यांनी लगेच एका मुलाला पिटाळलं—"जयंत, भजी आण बघू."

इतक्यात शुटिंग सुरू झालं. मी रडत रडत आले. आणि निंबाळकरांचे पाय धरले. निंबाळकर डायलॉग्ज बोलण्याच्या ऐवजी ओरडले "जयंत, भजी आण बघू." शॉट कट झाला होता. श्रीकांत सुतार दिग्दर्शन करीत होता. तो तोंड दाबून हसत हसत बाहेर पळाला. पण निंबाळकर आपली चूक कबूल करीनात. ते म्हणाले, "लायटिंग चुकलं म्हणून असं झालं."

पुन्हा तयारी झाली. शॉट सुरू झाला. रडत रडत मी आले आणि निंबाळकरांचे

पाय धरले. तरी पुन्हा आपलं तेच—जयंत भजी आण बघू— आमची या वेळी हसता हसता मुरकुंडी वळली. अक्षरशः तेरा वेळा हा प्रकार घडला आणि प्रत्येक वेळी निंबाळकरांचं एकच धृवपद—जयंत भजी आण बघू—

ते गंमतही करत नव्हते कारण आम्ही हसू लागलो की ते चिडत. आणि चूकही कबूल करीनात. ते म्हणत ते काय आहे बाई, तुम्ही त्या मूडमध्ये येऊन पायाला मिठी मारली नाही. त्यामुळे मलाही मूड चढला नाही किंवा आणखी कारण सांगत.

शेवटी जेव्हा ग्लिसरीन डोळयांत टाकूनही मला रडता येईना तेव्हा तो शॉट त्या दिवशी अर्धवटच सोडला.

या वेळपर्यंत मला दारूची चांगलीच सवय झाली होती. घरच्या कटकटी, मुलीची चिंता, सिनेमाजगतातला ओंगळपणा हे सारं विसरून जाण्यासाठी स्वतःला मुक्तपणे बाटलीमध्ये बुडवून घेऊ लागले होते. मन नेहमी अस्वस्थ असायचं. शांती, समाधान असं कधी वाटतच नव्हतं. भाई गेल्यापासून तर मनावर काहीच ताबा राहिला नव्हता. आपलं असं कुणी माणूस वाटत नव्हतं. मुलीसाठी जीव तिळ तिळ तुटत होता. डोकं ठिकाणावर नसायचं. चिंता जाळून काढायच्या. कधी बाटली मिळाली नाही म्हणजे अस्वस्थ असायची.

कोल्हापूरला शुटिंगला आले म्हणजे मी एका हॉटेलात उतरत असे. 'सोन्याची लंका' या चित्रपटाचं शुटिंग होतं. श्रीकांत सुतार दिग्दर्शक होता. एके दिवशी रात्रीच्या वेळी मी उठले, बाटली शोधू लागले. पण बाटली शिल्लक नव्हती. अस्वस्थता जात नव्हती. वेटरला बोलावलं. त्याला विचारलं, "बाटली कुठे मिळेल?"

त्यानं नकारात्मक मान हलवली. दुकानं बंद झाली होती. काहीतरी मार्ग काढ असं मी त्याला सुचवलं. त्याच वेळी माझ्या शेजारच्या खोलीत एक गृहस्थ उतरले होते. त्यांना कुठलं दुःख होतं कुणास ठाऊक. पण संध्याकाळ झाली की ते समोरच्या गॅलरीत बसून पेल्यामागून पेले रिचवीत जायचे.

वेटर म्हणाला, "मी त्यांच्याकडे बघतो काही मिळते का."

मी म्हणाले, "नको. उगाच त्यांना त्रास देऊ नकोस. शिवाय ओळख नाही काही नाही."

वेटर जाऊ लागला तोच त्या गृहस्थांनी स्वतःच दार उघडून त्याला बोलावलं. ते आमचं बोलणं चोरून ऐकत होते की काय कुणास ठाऊक! मी तर त्यांना सभ्य समजत होते!

त्यांनी वेटरला सांगितलं, "बाईंना काही हवं असलं तर माझ्याकडे आहे." आणि ब्रॅन्डीची एक अख्खी बाटली त्यांनी त्याच्याबरोबर पाठवून दिली.

त्यातले एक—दोन पेग खाली करून मी ती बाटली त्या वेटरबरोबर त्या गृहस्थांकडे परत पाठवली. परंतु ती त्यांनी पुन्हा माझ्याकडे पाठवली. आणि निरोप पाठवला, "माझ्याजवळ भरपूर आहे. तुमच्याजवळच ठेवा."

दुसरे दिवशी माझी त्यांच्याशी ओळख झाली. त्यांचं नाव जोशी असल्याचं समजलं. साधारण माझ्याच वयाचे ते होते. त्यांनी माझी विचारपूस केली. आमची ओळख वाढत गेली. ते माझ्याशी खूप बोलायचे. आपल्याला खूप मोठं असं कोणतं-तरी दुःख आहे असं ते भासवायचे. त्यांच्या चेहऱ्यावरून आणि बोलण्यावरून तरी तसं वाटायचं. ते दुःख मला कधी कळलं नाही. परंतु त्यांच्याबद्दल सहानुभूती मात्र जरूर वाटू लागली.

काही दिवसांनंतर कोल्हापूरहून ते निघाले. निरोप घेताना त्यांनी आपला मुंबईत उतरण्याचा पत्ता मला दिला. आणि आग्रहानं सांगितलं. " मुंबईत आलात म्हणजे मुद्दाम येऊन भेटा. "

मी म्हणाले, " जरूर भेटेन. "

आणि त्यांना भेटण्याचा प्रसंग लवकरच आला.

## : २ :

या वेळी कोल्हापूरचं शुटिंग संपवून मी मुंबईला परतले, तेव्हा आमचे घरचे संबंध खूपच बिघडले होते. त्यात भरीस भर म्हणूनं आर्थिक कटकटीही निर्माण झाल्या होत्या.

संबंध बिघडायला तात्कालिक कारण असं नव्हतं. सुरुवातीपासूनच आमची भांडणं होत होतीच. भांडणाला कुठलाही विषय चाले. मला तर हे अगदी असह्य होत होतं. सुख म्हणून लाभतच नव्हतं. चिकार पैसा मिळवत होते, पण समाधान नव्हतं. कामाचंही समाधान नव्हतं. पैसा मिळाल्याचंही नव्हतं आणि घरीही समाधान नव्हतं.

रेखा झाली त्या वेळी मी अठरा वर्षांची होते. त्यानंतर मला दोन-तीन वेळा दिवस राहिले होते. मला खूप आनंद व्हायचा. कारण, मुलांची मला हौस. पण प्रत्येक वेळी यांना संशय यायचा की, ही आपली मुलं नव्हेतच. बाहेर ही अशी वागते, हे आपलं मूल नाहीच. खरं पाहिलं तर त्या बाबतीत मी खूप स्ट्रिक्ट होते. ती आमचीच मुलं असायची. पण हे भारीच संशयी.

तिसऱ्या वेळी यांनी औषध आणून दिलं ते मी घेतलंच नाही. मला मूल हवं होतं. आणि औषधांचा त्रासही फार व्हायचा. यांच्या जेव्हा लक्षात आलं, की मी औषध घेतलं नाही तेव्हा यांनी घरी डॉक्टर आणून ऑपरेशन करवून घेतलं. तेव्हा पाचवा महिना होता. प्रत्येक वेळी मुलं पाडली. मी खूप चिडायची, रडायची. मला मूल हवं होतं.

आमचं पटायचं नाही ते यामुळेच. हा माझा वैरी आहे, असं वाटायचं. मग मी मुद्दाम वाईट दिसेल असं वागायची. त्यांना चिडविण्यासाठी की काय कुणास ठाऊक.

कुणी एखाद्या गोष्टीचा माझ्यावर विनाकारण संशय घेतला की मी चिडते. मुद्दाम त्या गोष्टी करू लागते.

कटकटीचं आणखी एक कारण म्हणजे माझ्या सोन्याच्या बांगड्या.

बंदरकरांचे वडील हयात नव्हते. पण त्यांना काका होते. सावंतवाडीला त्यांचं घर होतं. ते आमच्या समोरच. त्यामुळं त्यांची माझी लहानपणापासूनची ओळख. लहानपणी ते मला गोष्टी सांगत त्यामुळं खूप आवडत.

बंदरकरांशी लग्न झाल्यावर मी काही दिवस सासरी सावंतवाडीला गेले. ते सासरचे दिवस आठवले म्हणजे मन सुखानं मोहरून येतं. मी गेले ते मुलांसाठी खाऊ, खेळणी वगैरे घेऊन. मुंबईची, सिनेमात काम करणारी नवी सून घरात आली म्हणून सारे माझं कौतुक करीत होते.

मी गेले तेव्हा काका आजारी होते. त्यांनी मला बोलावलं, " बेटी, इकडे ये. " मी जाऊन नमस्कार केला. " गोष्ट सांग मला, " ते म्हणाले. " विसरले मी, मला नाही येत आता. " " येते सांग–" काका.

सासूबाई, दीर सारेजण मला फुलासारखं जपत होते. सासरी मी नऊवारी नेसून डोक्यावरील केसांचं मागे चक्कर घालून वावरत असे. त्या वेळी माझे केस खूप लांब आणि छान होते. त्यामुळं चक्कर छान व्हायचं.

गेल्याच्या दुसऱ्या दिवशी काका म्हणाले, " मुंबईला तुम्ही काय जेवता ते तर आम्हांला बघू दे. मुंबईचा एखादा पदार्थ करून दे. "

तिथं बिर्याणी माहीत नव्हती. म्हणून मी सुरेखशी बिर्याणी करून सर्वांना वाढली. सारे खुष झाले. जेवण झाल्यावर काका म्हणाले, " असं कर, स्वच्छ तोंड वगैरे धू आणि इकडे ये. " त्याप्रमाणे मी अबोलीची वेणी घालून त्यांच्याकडे गेले.

त्यांनी प्रत्येक सुनेसाठी सोन्याच्या बांगड्या, कुड्या, नथ, गळ्यातील सरी वगैरे वस्तू मुद्दाम करून ठेवल्या होत्या. माझ्या वाट्याच्या वस्तू त्यांनी मला दिल्या आणि म्हणाले, " हे घाल. " मी ते घातले. देवाला नमस्कार केला, काकांना आणि घरातील साऱ्या वडीलधाऱ्यांना नमस्कार केला. आठ–दहा दिवस सासरी मजेत काढले आणि परतले.

काकांनी दिलेल्या त्या बांगड्या माझ्या अतिशय लोभाच्या. मला त्या फार आवडायच्या. त्या घातल्या म्हणजे मला काका, सासर आणि साऱ्या गोष्टी आठवायच्या, गाव आठवायचं. अनेक गोड, सोज्वळ अनुभवांची गुंफण त्या बांगड्यांभोवती होती.

नंतर काही दिवसांनी आमची आर्थिक परिस्थिती बिघडली. मध्यंतरी मी आणि बंदरकरांनी मिळून–म्हणजे खरं पाहता बंदरकरांनी–एक ' कल्पना चित्र ' नावाची फिल्म कंपनी काढली होती. ' धन्यवाद ' हा हिंदी चित्रपटही या कंपनीतर्फे पूर्ण करण्यात आला. जागीरदार–ललिताबाईंनी त्यात कामं केली होती. पिक्चर पूर्ण

झाल्यावर ते त्या वेळचे गृहमंत्री मुरारजीभाईंना दाखवलं होतं.

पण ते पिक्चर ताबडतोब रिलीज व्हायचं ते झालं नाही. जागीरदार–ललिताबाईंनी चित्रीकरण चालू असतानाच कामाचे भाव वाढवून मागितले. घराचे सारे पैसे गेले. मारवाड्याकडून हुंडीतून पैसे काढावे लागले. रिलीजच्या वेळी शेवटी पिक्चर लिलावात काढावं लागलं.

ही खोट बसली आणि घरी दागिन्यांची विकाविक सुरू झाली. भराभर दागिने जाऊ लागले. इतर दागिन्यांचं मला काहीच वाटलं नाही. पण जेव्हा यांनी त्या सावंतवाडीच्या बांगड्या मागितल्या, तेव्हा मी चक्क नकार दिला. खूप दागिने गेले.

शेवटी एके दिवशी हे म्हणाले, "काही दिवसांसाठीच बांगड्या गहाण ठेवतो. नंतर आणून देईन."

नाइलाजाने आणि काही दिवसांनी परत आणण्याच्या बोलीवर मी त्या बांगड्या काढून दिल्या. पण नंतर त्या परतच आल्या नाहीत. बहुधा त्या विकल्या गेल्या असाव्यात. मी सारखी त्याबद्दल विचारी. मी विचारलं की हे चिडत आणि आमची भांडणं होत.

असं मनाचं अस्वास्थ्य असताना इतर काही कौटुंबिक सुख होतं असंही नाही. रात्री–बेरात्री, पहाटे ४–५ वाजेपर्यंत मी शुटिंगहून घरी परत येई. त्या वेळी घरातले सगळे लोक साखरझोपेत असायचे. मी थकून भागून चिडून आलेली असे. त्यामुळे खूप वाटे की, आईनं विचारपूस करावी. पण आईसकट घरातील कुणीच विचारीत नसत. मी आले की फक्त वडलांना जाग येई. पण ते पांगळे. पडल्या पडल्याच ते म्हणत, "बेबी, जेवून झोप." पण मला जेवावंसं वाटत नसे. भाई गेल्यानंतर तर एवढं सांगायलाही कुणी उरलं नाही.

आमचे बाळू आणि रघुनाथ नावाचे दोन नोकर त्या मानानं काळजी घ्यायचे. रघुनाथ मद्रासी होता.

शुटिंगहून मी आले की तो उठायचा गरम पाण्याचा गीझर सोडायचा. आणि अन्न गरम करायचा. आंघोळ करून मी जेवू लागले, की जेवण होईपर्यंत उभा राहायचा. अशी रात्री भुतासारखं एकटं जेवणाची माझी सवय. मग पहाटे ४॥–५ वाजता झोपायची ती अकरा वाजता उठायची. मग घरी वडलांशी बोल, काही पुस्तकं वाच की लगेच निघाले शुटिंगला. इतर कुणाशी बोलणंच नाही. त्यामुळं वाटायचं कसलं हे घर. हे कसलं कौटुंबिक सुख.

दोन्ही बाजूंकडून असमाधानीच होते. आतून तडफडत होते. ही माझी अस्वस्थता कुणाला माहीत होती की नाही कुणास ठाऊक.

तशातच मी 'श्रीगुरुदेवदत्त' या एका चित्रपटात काम केलं.

कोल्हापुराहून परत आले तेव्हा माझी ही तडफड अधिकच वाढली होती. यांनी माझ्यावर खूपच निर्बंध घातले होते. कामाच्या वेळा अगोदर यांना सांगाव्या लागत.

नमक्या सांगितलेल्या वेळात घरी परत यावे लागे. थोडा जरी उशीर झाला तरी विचारीत, रागावत, संशय घेत.

कोल्हापूरच्या हॉटेलमध्ये ज्यांची ओळख झाली ते जोशी मुंबईतच होते. कोल्हापुराहून आल्यावर मी त्यांच्याकडे अधून मधून जात होते. आमची मैत्री वाढत होती.

एकदा कशावरून तरी माझी न् बंदरकरांची चांगलीच खडाजंगी झाली आणि मी तिरीमिरीतच बाहेर पडले. सरळ जोशींच्या राहण्याच्या ठिकाणचा रस्ता धरला. तेथे श्रीकांत सुतार होता. संध्याकाळी आम्ही चिकार प्यायलो. इतकी जास्त झाली होती की मी शुद्धच हरवले. एवढ्या जास्त प्रमाणावर मला कधी झाली नव्हती.

दुसरे दिवशी सकाळी मी शुद्धीवर आले तेव्हा मी शेजारच्या एका गच्चीत सतरंजीवर पडले होते. रात्री काय झालं हे काहीच आठवत नव्हतं. उठले आणि घाबरले——

आता घरी कसं जायचं ? इतका वेळ होतीस कुठं ? असं विचारलं तर काय सांगायचं ? डोकं बधीर झालं. काय करावं सुचेना.

जोशी आणि सुतार आत होतेच. आम्ही तिघं पुन्हा एकत्र बसलो. आणि काय करावं हे सुचत नव्हतं म्हणून सकाळची वेळ असूनही पुन्हा पिण्यास सुरुवात केली. तोही दिवस पिण्यात गेला. आता तर घरी जाणं अधिकच कठीण झालं. मग मी आणि जोशी पुण्याला आलो. एका हॉटेलात उतरलो. एकदा मनात विचार आला, यांना मुंबईला फोन करावा मी इथे आहे म्हणून. एकाएकी निघणाऱ्या कामासाठी मी पुण्याला आले की असा फोन करीत असे. पण या वेळी मात्र फोन करण्याचं धैर्य झालं नाही. मनच खात होतं. पुण्यातले दिवसही पिण्यात गेले. वाटलं घरचा रस्ताच बंद झाला आहे.

त्या वेळी माझी बुद्धीच फिरली होती. घाबरून पळाले होते आणि आता घाबरून परत जाता येत नव्हतं मारल्यासारखी मी झाले होते. आणि जोशींबरोबर भरकटत होते. ते म्हणतील तिथे जात होते. गुंतागुंतीत गुरफटत होते. घरापासून दूर जात होते. आम्ही बंगलोरला आलो.

काही दिवस बंगलोरलाच काढले. पिण्यात आणि हिंडण्यात. जोशींच्या खिशात किती पैसे होते, कुणास ठाऊक पण ते संपत आले होते. चणचण जाणवू लागली होती. पुढे काय– ? असा प्रश्न आला.

त्यातूनही जोशींनी मार्ग काढला. त्यांचा एक मित्र त्यांना भेटला. त्याच्याकडून थोडे पैसे त्यांनी घेतले आणि आम्ही मराठवाड्याचा रस्ता धरला.

मराठवाड्यात एका लहानशा खेड्यात जोशी मला घेऊन गेले. ते जोशींचं गाव होतं. तिथं त्यांची आई होती. दोन बायका होत्या. त्यांची मुलं होती.

जोशी नेतील तिकडे मी जात होते. आपण कुठे चाललो आहोत, काय करतो आहोत, याची मी काहीच चौकशी केली नाही. त्यांना घर, मुलं-बाळं आहेत हे

कळलं तरीदेखील मी आश्चर्य दाखवलं नाही. जे काही घडेल त्याला मुकाटयानं तोंड देण्याची माझी तयारी होती.

पुढची तीन वर्षं मी या खेडयात जोशी यांच्याकडेच काढली. माझ्या आयुष्यातला हा अगदी वेगळाच तुकडा आहे. स्वप्नात बघावं तसं आयुष्य या तीन वर्षांत घालवलं.

जोशी यांची बरीच शेती होती. गावापासून दूर, नदीपलीकडे, शेतीच्या तुकडयाच्या एका टोकाला त्यांचं घर होतं. घरात आई होती. त्यांची एक बायको वारली होती. दोन हयात होत्या. पैकी थोरली डोळयांनी अधू होती. घरात मुलंबाळं भरपूर होती. हे सर्व मला नंतर कळलं.

घरात दोन सवतींची नेहमी भांडणं होत. त्यांत मी गेले. भांडणात अधिकच भर पडली. दोघींत थोरली अधिक समंजस होती. धाकटी संशयी आणि भांडखोर होती.

मी आल्यावर ही कोण आणखी अवदसा आली म्हणून तिने माझ्यावर खूप तोंडसुख घेतलं. पण मी ठरवूनच गेले होते, जिथं जायचं तिथं राहायचं, रमायचं.

लग्न होऊन नव्या घरात गेलेल्या नव्या गृहलक्ष्मीप्रमाणे माझी स्थिती झाली होती. सकाळी लवकर उठावं लागे. उठल्यावर सडा संमार्जन, सारवण या गोष्टी कराव्या लागत. भांडयांचा मोठा ढीग घासावा लागे. दुपारी स्वयंपाक करावा लागे.

हळू हळू मी घरात रुळले. लोकांची मनं जिकली. त्यांना वाटत होतं, एवढी सिनेमातली ही बाई हिला कसली घरची कामं येतात. पण मी मनापासून कष्ट केले. आपणहून पडतील ती कामं केली. दोघी सवतींच्या मुलांना सांभाळलं. धाकटीची मुलगी अगदीच तान्ही होती. ती तर माझ्या अंगावरच असे. माझ्याशिवाय ती कुणाकडेच जात नसे. घरच शिवण-टिपण करणं, घर स्वच्छ करणं, रांगोळया काढणं ही कामं तर मी मोठया हौसेनं करीत होते.

हळू हळू दोन्ही सवतींनाही माझा लळा लागला. मी नेसत्या वस्त्रानिशी तिथे आले होते. मला तिथं जोशींनी एक जाडभरडं नऊवारी लुगडं व एक पोलकं दिलं. वर्षभर ते पुरत असे.

अशी मी वाहवत वाहवत गेले खरी पण अगदी आतलं मन खात होतंच. वरवर मी खूप उत्साहाने वावरत होते. काम करीत होते. पण आतून सारखं वाटत होतं काय केलं हे आपण — मुलीच्या आठवणीनं आतडी पिळवटत होती. खूप मोठा गुन्हा आपण केला असं वाटत होतं. मी अशा वेळी अस्वस्थ व्हायची पण मार्ग नव्हता —

जोशींचं घर वस्तीपासून खूपच दूर होतं. मध्ये नदी होती. त्यामुळं कुण्णा कुण्णाशी, बाहेरच्या जगाशी संबंध येत नसे. त्यांच्या घरी आणि शेतीवर अधूनमधून गडीमाणसे येत एवढीच फक्त बाहेरची माणसं त्या वेळी मी पाहिली. दोन वर्षं उलटल्यावर मी कंटाळले. परत घरी जावं असं सारखं वाटू लागलं. पण जाणार कशी ?

जोशी यांचा माझ्यावर सक्त नजर होती. अंगणाच्या बाहेरही ते मला जाऊ देत नसत. ह्यांना पत्र पाठवावं, सारं काही कळवावं, असं वारंवार वाटे. पण पत्राला पैसे कुठून मिळणार ? पत्र कसे टाकणार ?

संध्याकाळी एकदा जिवाचा धडा केला नि कोणाचं लक्ष नाही, असं बघून मी अंगणात आले. इकडं तिकडं पाहिलं. अगदी फाटकापर्यंत गेले. तेवढ्यात जोशींनी मला पाहिलं. ते धावत आले. मला ओढून आत आणलं आणि जळणाच्या लाकडांनी मारावयास सुरुवात केली. मला खूप मारलं. शेवटी थोरली आणि धाकटी मध्ये पडल्या आणि ते थांबले.

माझ्यावरची नजर अधिक कडक झाली.

हे असं आयुष्य कुठवर जाणार हे कळेना.

हा प्रसंग घडल्यापासून घरची ओढ अधिकच वाढू लागली. इथून निसटायचं कसं याचा विचार करू लागले.

जोशींच्या वस्तीवर काही सामान विणणाऱ्या बाया येत. त्यांची न् माझी हळू हळू ओळख झाली. एके दिवशी मी त्या बायांना चोरून गाठलं. असेच जमा केलेले पैसे दिले आणि पोस्टातून पाकीट आणायला सांगितलं. त्यांना म्हणाले, " बायांनो, माझं एक काम करा. कुणाला सांगू मात्र नका. "

चोरून चोरूनच मी एक पत्र लिहिलं आणि त्यांच्याजवळ टाकायला दिलं. त्या बाया पत्र घेऊन घरापासून दूरपर्यंत जाईपर्यंत मी त्यांच्याकडे बघत होते. त्या कुणाला सांगत तर नाहीत ना याची मला भीती वाटत होती.

मी ते पत्र बंदरकरांना लिहिलं होतं. मी कुठे आहे, कशी आहे हे त्या पत्रात लिहिलं होतं. आणि इथे कसं यायचं हेही त्यात लिहिलं होतं. येताना माझे कपडे आणायला सांगितलं होतं.

काही दिवसांनी बंदरकर आले, ते स्वत: घरापासून दूर उभे राहिले. पण त्यांच्या बरोबर आलेले पोलीस मात्र आत आले. पोलीस पाहिल्यावर घरात सर्वत्र रडारड सुरू झाली. जोशींना आता पकडून नेतात की काय याची सर्वांना भीती वाटत होती. मी घरातल्या बायांना सांगितलं, " घाबरू नका, मी जोशींविरुद्ध काही सांगणार नाही. " पोलिसांबरोबर मला जायचं होतं.

नाही म्हटलं तरी तेवढ्या अवधीत मी तिथल्या मुलाबाळांमध्ये आणि बायकांमध्ये खूप लळा निर्माण केला होता. धाकटीची तान्ही मुलगी माझ्या खूप सवयीची होती.

तीही रडू लागली. मी घरी सांगितलं, मी नुसती जाऊन येते.

धाकटीला मात्र बाजूला बोलविलं आणि म्हणाले, " मी जाते. आपला नवरा मात्र आता तरी संभाळ. "

बाहेर आले. त्यांनी एक बैलगाडी आणली होती. खाली मान घालून त्यात बसले. चंदरकरांनी माझ्याकडे पाहिलंसुद्धा नाही. नदी ओलांडताना फक्त एवढंच म्हणाले,

" तुझे कपडे आणले आहेत."

नंतर मी कपडे पाहिले. माझे जुनेच, जपून ठेवलेले भारी कपडे होते. या तीन वर्षांत माझ्यात केवढातरी बदल झाला होता. मी अर्धी आले होते. कपडे माझ्या अंगाला होईनात. पोलकं घातलं तर ते अगदी ढगळ झालं.

एका मोठ्या आजारातून उठल्यासारखी मी दिसत होते.

तिथूनच जवळच असलेल्या एका मोठ्या गावी आम्ही आलो. तिथल्या मॅजिस्ट्रेट-पुढे मला जबाब द्यायचा होता. मॅजिस्ट्रेटच्या घराच्या समोरच्याच खोलीत त्याचं ऑफीस होतं, तो म्हातारा होता. आणि प्रेमळ व सज्जन वाटत होता.

बंदरकरांनी सांगितलं, " माझी कुणाविरुद्ध तक्रार नाही. फक्त बायकोला घरी न्यायचं आहे. " मॅजिस्ट्रेटनं बंदरकरांना कुणाची तरी सही आणायला बाहेर पाठवलं.

ते बाहेर जाताच त्या म्हाताऱ्यानं जबाबाचा कागद उचलला. तो मला म्हणाला, " आत चल नाही तर कागद फाडतो ! "

मी घाबरले. त्यानं मला आत नेलं. आतून कडी लावली. पलीकडच्या खोलीत त्याची बायको मुलं होती. नराधम. मला ओरडताही येईना, तोंड दाबून बुक्क्यांचा मार—

बलात्कार होतो तरी कसा हे मला त्या दिवशी कळलं ! —

काही वेळानं बंदरकर परत आले तेव्हा मी त्या म्हाताऱ्या समोरच्या बाकड्या-वर कपाळाला हात लावून बसले होते. विषण्ण झाले होते. आतून तडफडत होते. कुणाला काही सांगण्याची सोय नव्हती.

केवढ्या उमेदीनं मी त्या बैलगाडीत बसून आले होते. सारं पूर्वायुष्य विसरून आता चांगलं वागण्याचा निश्चय करून मी निघाले होते. पण त्या म्हाताऱ्या मॅजिस्ट्रेटने धक्का दिला. साऱ्या कल्पनांची राख केली. आणि साऱ्या जगाविषयीचा माझा त्वेष पुन्हा उफाळून आला.

– आम्ही मुंबईत परतलो.

तीन वर्षांनंतर मी घरी परतत होते. दाराशी आले तो पायरीवरच रेखा उभी होती. ती आता खूपच मोठी झाली होती.

मला एकदम उमाळून आलं. वाटलं झटकन जाऊन तिला हृदयाशी धरावं. ती माझ्याकडे गोऱ्यामोऱ्या तोंडानं बघत होती. मी फारच बदलले होते म्हणून तिनं एकदम ओळखलं नसावं, पण लगेच ओळख पटली. धावत येऊन तीच माझ्या अंगावर पडली आणि म्हणाली,

" मम्मी, कुठे गेला होता तुम्ही इतके दिवस ?"

तिला घेऊन मी रडत धडपडत कशीबशी आत आले.

आयुष्यातलं हे विचित्र पर्व असं संपलं. मी घाबरले होते, काय करावं हे समजत नव्हतं, आधाराला व शहाणपण शिकवायला कुणी नव्हतं म्हणून घरापासून दूर गेले होते. संसारी जीवनाची मला किती हौस. या बायका आपल्या नवऱ्यांना सोडून

राहतात तरी कशा याचं मला आश्चर्य वाटायचं. याच वेळी चित्रपटसृष्टीतील दोघीतिघींनी आपल्या नवऱ्यांना टाकले होते. काही तर आमच्या घरोब्याच्या, ओळखीच्या होत्या. त्यामुळे मला खूपच वाटायचं. मी म्हणायची, आपल्या हातून तर असं कधी होणार नाही.

एकदा 'पारिजातक'च्या शुटिंगच्या वेळी शाहूरावांनी माझा हात पाहून सांगितलं होतं, "बाई, तुमच्या जीवनात खूपच स्थित्यंतरं होणार आहेत. तुम्ही नवऱ्याला सोडाल."

मी म्हणाले, "छट्, ते शक्यच नाही. पाहिजे तर मी लिहून देते, असं काही होणार नाही !"

एवढी मला घमेंड होती.

तरीदेखील मी घर सोडलंच होतं. आणि त्यानंतर जवळ जवळ तीन वर्षांच्या कालानंतर मी घरी परतत होते. प्रसिद्धीच्या झगझगाटात आणि कीर्तीच्या शिखरावर असतानाच मी घर सोडलं होतं. आणि ही सृष्टीही सोडून गेले होते. का गेले, का दूर राहिले, कशी राहिले, हे का घडलं, याचं काही काही उत्तर माझ्याजवळ नव्हतं– नियतीला तरी दोष का द्यावा ?

मला राहून राहून वाटतं. भाई असते तर ? भाई असते तर मी गेलेच नसते. तेच एकटे मला रोखू शकले असते. पण...पण तसा विचार करण्यात अर्थ नाही.

– आता परत आले–तर हे सारं विश्वच पार बदलून गेलं होतं. माझे काही चित्रपट करार अगोदरच झाले होते ते पार बुडाले. माझ्याऐवजी दुसऱ्याच नवीन नटचांना कामं मिळाली. नवनवीन चित्रतारका उदयाला आल्या.

या तीन वर्षांच्या काळानं माझ्यात केवढातरी बदल झाला होता. एकेकाळी अभिनयकौशल्यानं मी महाराष्ट्र गाजवला होता. चित्रपटसृष्टी गाजवली. लोकांच्या तोंडी माझं नाव झालं होतं, यावर माझाच विश्वास बसत नव्हता. काळाच्या पाटीवरून तात्पुरतं का होईना, पण माझं नाव पार पुसून गेलं होतं.

[ अपूर्ण ]



पुस्तके

# भरजरी पण जुन्या बासनातील नवलकथा

श्री. पु. ल. देशपांडे यांनी प्रस्तुत कादंबरीला लिहिलेल्या प्रस्तावनेवरील काही वाक्ये मी सुरुवातीला उद्धृत करणार आहे. त्यांच्यासारख्या मान्यवर साहित्यिकाने आणि सुजाण रसिकाने म्हटले आहे, " अनेक वर्षांपूर्वी साहित्याच्या क्षेत्रातून उचलबांगडी करण्यात आलेली नवलकथा पुन्हा त्याच नाथमाधव किंवा कालिकामूर्तिकार दातारांच्या ढंगांत लिहिण्याचे धाडस हल्लीच्या काळात कुणी करील, असे मला वाटले नव्हते. बिनटोपीच्या ह्या काळात हे पगडवंदाचे दुकान काढण्यापैकी आहे. श्री. भागवतांनी हे धाडस केले आहे; आणि माझ्या मते यशस्वी रीतीने केले आहे......आपल्या साहित्यशास्त्रातल्या शृंगारापासून ते रौद्र-बीभत्स-भयानकापर्यंत साऱ्या रसांचे समविषम प्रमाणात मिश्रण करून तयार केलेले हे एक रसायन आहे. भागवतांनी ही जुनी दारू जुन्याच बाटलीतून दिली आहे. कसल्याही नावीन्याचा, आगळ्या रीतीने मांडण्याचा आग्रह नाही......ह्या साऱ्या खटाटोपाचा हेतू साधा असतो. मनोरंजन. सराईत नवलकथाकाराच्या सफाईने भागवतांनी ही जबाबदारी पार पाडली आहे. ह्या नवलकथेला नाथमाधवांच्या परंपरेचा अस्सलपणा आला आहे..... मराठी कादंबरीलेखनाचा एक हरवलेला धागा पकडून भागवतांनी ह्या कथेचा पट विणला आहे. सारी सांकेतिकता झुगारून लिहिलेली ' कोसला ' सारखी समर्थ कादंबरी हे मराठी कादंबरीचे नवे स्वरूप; तर जुन्या परंपरेचे सारे संकेत सांभाळून लिहिलेली प्रस्तुत ' मर्मभेद ' ही कादंबरी म्हणजे तिचे जुने रूपडे. वय, शिक्षण, संस्कार इत्यादी अनेक कारणांनी रुचिभिन्नत्व असलेल्या आपल्या समाजात भागवतांच्या या प्रयत्नाला प्रतिसाद देणारा वाचक त्यांना लाभेल, याची मला खात्री आहे. नाथमाधवांच्या परंपरेच्या खंडित वृक्षाला फुटलेली ही नवी पालवी आहे. विविधतेने नटलेल्या साहित्यसंसारात तिचेही स्वागत का करू नये ? "

अवतरण मोठे आहे; पण मुद्दाम दिले आहे. पु. लं. च्या या लिखाणाचा दृष्टिकोन असा.

१. सारे संकेत सांभाळून लिहिलेली, सर्व रसांचे कमीअधिक प्रमाणात मिश्रण असणारी नवलकथा हे मराठी कादंबरीचे जुने रूपडे. मनोरंजन हा तिचा हेतू.

२. अशा प्रकारची कादंबरी त्याच साच्यात लिहिणे हे भागवतांचे धाडस.

३. नाथमाधवांच्या खंडित वृक्षाची ही नवी पालवी.

४. विविधतेने नटलेल्या साहित्यसंसारात या कादंबरीचे स्वागत केले पाहिजे.

हे चारही मुद्दे मला विचारणीय वाटतात. नवलकथा ही कादंबरी या साहित्य-प्रकाराच्या विकसनातील एक अवस्था आहे. व्यक्तीच्या मानसिक घडामोडी, समाजात वावरताना व्यक्तीवर पडणारी बंधने आणि समष्टीवर त्यांचे होणारे परिणाम, परस्परविरोधी भावनांचे अनावर संघर्ष आणि त्या पार्श्वभूमीवर होणारी व्यक्तित्वाची जडणघडण या गोष्टी या काळात साहित्याच्या प्रवर्तकांना आणि रसिकांना अपरिचित असतात. सहानुभूतीची प्रगल्भता वाढवायची असते. मन अद्‌भुतात रमते. एक कल्पनेची सृष्टी हवीशी वाटते. अवास्तवाचा मोह पडतो. कादंबरीच्या विकसन-क्रमातील हा पहिला अपरिहार्य टप्पा आहे. या काळातल्या कादंबऱ्यांमध्ये वेगळीच कल्पनामय सृष्टी असते. तिथले वातावरण अवास्तव, अतिरंजित असते. त्याच्या चित्र-णात भडक रंग वापरलेले असतात. पात्रांचे स्वभाव ठोकळेबाज असतात आणि वर्णनांच्या मालिकेत ही एकसूत्रता, सूक्ष्मता, अनेकांगी सहानुभूती यांच्यापेक्षा पृथक् प्रसंगवर्णनावर भर असतो. केवळ मराठीचेच हे प्राचीन ‘ रूपडे ’ नाही. सगळ्या भाषां-तील सुरुवातीच्या कादंबऱ्या अशाच असतात. इंग्रजीतील प्रारंभीच्या कादंबऱ्यांनाही असेच अद्‌भुताचे वेड होते. फार काय, संस्कृतातही दंडीचे ‘ दशकुमारचरित ’ आणि बाणाची ‘ कादंबरी ’ यांमध्ये हाच फरक दिसून येतो. ‘ दशकुमारचरिता ’त प्रसंगांना, घटनांना, रसपरिपोषाच्या ढोबळ भडक अंगाला महत्त्व आहे. ‘ कादंबरी ’ काहीशी प्रगल्भ आहे. सूक्ष्मतरल मनोव्यापारांना त्यात ओझरता का होईना, स्पर्श केला आहे. दुर्दैवाने हा वाङ्मयप्रकारच संस्कृतात पुढे नाटक आणि काव्य यांच्या वर्चस्वा-खाली दबून गेला. नाहीतर ‘ कादंबरी ’चे विकसित प्रगल्भ रूप संस्कृत साहित्यातही पाहावयास मिळाले असते.

## अनुकरण की अनुसरण ?

तेव्हा आज, कादंबरीच्या पूर्ण विकसित अवस्थेच्या काळात, जुन्या साच्यातील नवलकथा त्याच पद्धतीने लिहिणे हे भागवतांचे धाडस खरेच. अर्थात इथे हे स्पष्ट केले पाहिजे की, माझा रोख नवलकथा लिहिण्यावर नाही. ती मुद्दाम जुन्या साच्यात लिहिण्यावर आहे. नवलकथा हा आजच्या काळातही वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून मान्य व्हावा हा आग्रह ठीक आहे. पण नवलकथेची अंतर्गत किंवा साहित्य-प्रकारनिविशिष्ट वैशिष्टये सांभाळली तरी तिचा आविष्कार करताना मुद्दाम जुना आव आणण्याचे काय कारण ? कादंबरीच्या विकसनक्रमात काही गोष्टी खूपच मागे सारल्या गेलेल्या असतात. त्यांचा अकारण स्वीकार हा काही त्या साहित्य-प्रकाराच्या निर्मितीसाठी आवश्यक भाग नसतो. ती मग केवळ जुन्या लेखकाची अनुकृती ठरते. ते आंधळे ‘ अनुकरण ’ होते; सुजाण ‘ अनुसरण ’ होत नाही. अनु-

सरण ही साहित्यनिर्मितीतील अपरिहार्य प्रकृती आहे, पण अनुकरण ही विकृती आहे. 'मर्मभेद 'मध्ये तीच वारंवार खुपते. पु. लं. नी म्हटले तरी मग ही नाथमाधवांच्या वृक्षाला फुटलेली 'नवी पालवी' वाटत नाही. ताजमहाल पाहून जशी बिबीका मकबऱ्याची नक्कल घडविली गेली, तशी ही नक्कल वाटते. भागवतांची स्वतःची जी काही वैशिष्ट्ये असतील तीही मग अशामुळे झाकोळून जातात. निष्प्रभ ठरतात. एकच साधे उदाहरण द्यावयाचे, म्हणजे लेखकाने कथेच्या ओघात मध्येच डोकावणे हे काही नवलकथेचे आवश्यक लक्षण नव्हे. नवलकथा ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या कालाच्या अपरिपक्वतेचा तो परिणाम होता. ( तत्कालीन सामाजिक कादंबऱ्यांतूनही तो दिसतो. ) हे लक्षात न घेता, जुन्या नवलकथेचे पुनरुज्जीवन करायचे म्हणजे सारे जुन्या पद्धतीने लिहायचे असे ठरवून भागवतांनी मधूनमधून वाचकांशी केलेली संभाषणे केवळ हरिभाऊ-नाथमाधव यांच्या नकलेची जाणीव करून देऊन रसभंग करण्यापलीकडे काहीच करू शकत नाही. "त्या महाधूर्त पुरुषाच्या वरील बोलण्यावरून तो दुष्ट, महाकारस्थानी आणि दुराचारांत प्रवीण असा मदनाचे रूप घेऊन अवतरलेला सैतान कृष्णान्त सरदारच होता हे वाचकांनी ओळखलेच असेल." यांसारखी वाक्ये कुठल्याही पानावर सापडतील. 'कसल्याही नाविन्याचा, आगळ्या रीतीने मांडण्याचा भागवतांचा आग्रह नाही' हे ठीक, पण जुन्या मांडणीतले दोष आणि उणीवा दूर करणे त्यांना शक्य आणि इष्ट होते. बिनटोपीच्या काळात पगडबंदाचे दुकान काढण्याचा अट्टाहास कौतुकास्पद आहे; पण त्या पगड्यांची घाटणी स्वतःच्या कल्पनेने सुबक बनविली तर जास्त चांगले. अगदी प्रत्येक झिरमिळी आपल्या पंतोजींच्या झिरमिळीबरहुकूम असली पाहिजे असा आग्रह कशासाठी ?

यामुळे होते काय, की जुन्या लेखकांच्या लिखाणाची विनाकारण आठवण होऊन त्यांच्याशी चालू प्रसंगांची उगीचच तुलना केली जाते. 'वीरधवल' आणि 'मर्मभेद' यांमध्ये कितीतरी प्रसंग सदृश आहेत. वृद्ध रणरागाचे मांसत्वचाविरहित आकृतीमागून जाणे आणि गजगौरीचे सत्यपालाच्या पिशाचामागून जाणे; बलिभोजनाचे वेळी सर्वांगकवचधारी योद्धा पिशाचरूपात प्रकट होणे आणि वसंतपंचमीच्या दिवशी सर्वांगकवचधारी रहस्यमय योद्धयाचे आगमन; लहानग्या वीरधवलास घेऊन दऱ्याखोऱ्यातून भटकणारी वृद्धा आणि सुलसेच्या अपत्यास घेऊन रानोमाळ भटकणारी वृद्धा; वीरधवलास देहदंड देताना झालेले पिशाचाचे आगमन आणि चंद्रकेतू महाराजांना जळत्या चितेतून उचलून नेणारी मांसत्वचारहित आकृती; वीरधवलावर कुमाराच्या खुनाचा आळ आणि युवराज कुणालांवर वृद्धेच्या खुनाचा आळ–कितीतरी प्रसंग असे आहेत की त्यांना पुढे वेगळी मुरड दिलेली असली तरी काही काळ त्यांचे स्वरूप एकच आहे. त्या त्या प्रसंगांची ते आठवण करून देतात आणि तुलनेने फिके पडतात.

## लेखकाचे यश

जिथे भागवत स्वत:चे प्रसंग निर्माण करतात, तिथे मात्र ते रसोत्कटतेची अत्युच्च मर्यादा गाठतात. विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव यांच्या उद्दीपनाने होणारी ही शास्त्रशुद्ध रसनिर्मिती आहे. साहित्यशास्त्राचे पुरातन रूढ रसनिकषच येथे लावावे लागतील. सर्वत्र अद्‌भुताची पखरण अनुस्यूत असली तरी भयानकाची निर्मिती ठिकठिकाणी झाली आहे. भेदकाच्या नरडीचा घोट घेणारे रुंडकेतूंचे पिशाच, विक्राळ लांडगे, भयानक आकाराची असंख्य वटवाघळे, अनेक स्वरांत 'आ ऽ ऊ' करीत बेताल, बेसूर गाणारी असंख्य पिशाच्चे या सर्वांचे वर्णन अगदी प्रत्ययकारी रीतीने भागवतांनी केले आहे. अंगावर सरसरून काटा आणण्याचे सामर्थ्य या प्रसंगांत आहे. याउलट शृंगाराच्या रम्य प्रदेशात भागवत प्रवेश करतात तेव्हा रसराजाची उत्कट प्रतीती ते आणून देतात. कृष्णान्त–सुलसा किंवा शार्दूलसिंह–मायावती यांच्या रतिक्रीडांची वर्णने शृंगाराचा परिणामकारक आविष्कार करतात. रतिसदृश मायावतीचे विवस्त्र लावण्य, अनंगाचा दरबार शोभणाऱ्या मंदिरातील कामक्रीडा करणाऱ्या मूर्ती आणि त्या पार्श्वभूमीवर शार्दूलसिंहाने मायावतीशी केलेल्या विविध कामक्रीडा यांच्या वर्णनांत शृंगार रंगत जातो. याखेरीज वैदूच्या विक्षिप्त प्रयोगशाळेतील बीभत्स, युवराज कुणालांच्या बालिश वागण्यातील कारुण्यमिश्रित हास्यरस, –अशा तऱ्हेने ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रसंगांत अष्टरसनिर्मितीची पराकाष्ठा केली आहे. वाचकाचे भान हरपून टाकण्याचे सामर्थ्य भागवतांच्या या रसाविष्कारात आहे. दृक्‌चित्रकारी परिणामकारक वर्णनशैली, त्यातून होणारी प्रभावी वातावरणनिर्मिती आणि त्यामुळे घडणारा उत्कट रसपरिपोष अशी ही उल्लेखनीय साखळी आहे. रसोत्कटता हा या कादंबरीचा सर्वांत मोठा विशेष आहे.

आणि मनोरंजन हा एकमेव हेतू सांगणाऱ्या नवलकथेचे रसोत्कर्ष हेच केवळ उद्दिष्ट असल्यास त्या दृष्टीने ही कादंबरी यशस्वी म्हणावयास हरकत नाही. पण हीच तिची मर्यादाही ठरावी. रसप्रकर्ष होतो तो कादंबरीच्या एकेका तुकड्यापुरता. तिथे तिथे त्या त्या रसाची अगदी परिसीमा गाठली जाते. पण कादंबरीच्या एकसंध कलात्मकतेचा विचार करताना आणखी काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक ठरते. ही एक घटनाप्रधान कादंबरी आहे. साहजिकच तेजस्विनीखेरीज इतर सर्व पात्रे संपूर्ण स्थिरप्रकृती (flat) आहेत, आणि ते साहजिक आहे. सुष्ट आणि दुष्ट अशी या पात्रांची सोपी वर्गीकरणे करता येतील. पण इथे महत्त्व आहे ते त्या पात्रांच्या भोवती निर्माण झालेल्या विविध घटनांच्या गुंफणीला. त्यातून गुरफटलेल्या रहस्याला. याही बाबतीत लेखक अयशस्वी झाला आहे, असे म्हणता यावयाचे नाही. रहस्यमयतेला प्राधान्य असल्यामुळे वाचकाला विस्मयाचे आणि अपेक्षाभंगाचे वारंवार धक्के बसत राहतात. रहस्यांची गुंतागुंत वाढत जाते. तथापि किरकोळ रहस्यांची वेळीच उकल करून सारे कथासूत्र सर्वांगकवचधारी योद्धयाच्या

रहस्यावर आणि कृष्णान्ताच्या मर्मभेदावर केंद्रित ठेवण्याची समाधानकारक कामगिरी लेखकाने केलेली आहे. कधीकधी मात्र रहस्यप्रियता आणि धक्के देण्याची आवड अतिरेकाला जाऊन त्यातून सुटका करून घेण्यासाठी स्वस्तातल्या युक्त्या वापरणे भाग पडलेले दिसते. प्रलयनीला तेजस्विनी समजून तिच्यामागे रानोमाळ भटकणाऱ्या वीरभद्राची खऱ्या तेजस्विनीशी गाठ घालून देण्यासाठी लेखकाला अखेर हरीहराचे पिशाच उभे करावे लागले. कथासूत्राच्या अनुसंधानाशी हरिहराच्या पिशाच्याचा काहीच संबंध नाही. वारंवार पिशाच्यांचा सुळसुळाट झाल्याने रुंडकेतूंच्या पिशाच्याभोवतालचे भयानकतेचे वातावरण काही अंशी कमी होते. ऐयारी कसबाने काहीही होऊ शकत असल्याने तीही एक स्वस्तातली युक्ती वाटण्याचा संभव आहे, पण ज्या ज्या ठिकाणी लेखकाने तिचा उपयोग केला आहे, त्या त्या ठिकाणी आपल्या वर्णनकौशल्याने तसे मुळीच जाणवू दिलेले नाही हीही एक कौतुकाचीच बाब आहे. कादंबरीच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत ऐतिहासिक वातावरणाची सुसूत्रता आणि परिणामकारकता टिकू देणे हेही कौशल्य आहेच.

कृष्णान्ताचा ' मर्मभेद ' हा कादंबरीचा विषय आहे. युवराज कुणालांना बावळट, अशक्त, भेदरट बनविण्याचा प्रयत्न करूनही शेवटी तेच त्याचे दात त्याच्या घशात घालतात हा त्याचा मर्मभेद. पण वसंतपंचमीच्या दिवशीच आपले खरे स्वरूप प्रकट करून कृष्णान्ताचे नीच स्वरूप लोकांपुढे उघड न करण्यास कुणालांना काय कारण होते, त्यासाठी परचक्र येईपर्यंत थांबून नाटचमय पद्धतीने आपली ओळख पटवून कृष्णान्ताला स्तिमित करण्याचे ' कादंबरीकाराची इच्छा ' याशिवाय आणखी कोणते कारण होते तेही उघड होत नाही.

या कादंबरीत एकूण फारच गोष्टी गृहीत धराव्या लागतात. रचनेबद्दल, रहस्याबद्दल, भाषेबद्दल, शैलीबद्दल ! त्या सगळ्या गृहीत धरल्या म्हणजे मग ' मनोरंजन ' हा कादंबरीचा हेतू यशस्वी झाला असे म्हणायला हरकत नाही. त्या सगळ्या गृहीत धरायलाही हरकत नाही; पण मग ' जुन्या खंडित वृक्षाला फुटलेली नवी पालवी, ' ' मराठी कादंबरीचे जुने रूपडे ' असले काही तिच्याबद्दल उच्च गैरसमज करून घेऊ नयेत. एक चांगल्यापैकी ' जुनाट ' कादंबरी आहे; भरजरी आहे, पण अकारण जुन्याच बासनात गुंडाळलेली आहे एवढेच. वाचताना मन रंगून जाते, धक्के मिळत राहतात, हातातले पुस्तक खाली ठेववत नाही. पण वाचून झाल्यावर त्यातल्या उणीवा जाणवतात. क्वचितच खटकतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करूनही काही प्रसंग पुन्हा वाचावेसे वाटतात. ते त्यातल्या उत्कट भडक रसाळपणामुळे. हेच तिचे यश आणि याच तिच्या मर्यादा.

**—निशिकांत मिरजकर.**

**[ ' मर्मभेद – भाग पहिला व दुसरा : शशी भागवत : मॅजेस्टिक : मूल्य साडेसात रुपये प्रत्येकी : पृष्ठे – २३७ व २६३ ]**

# वेंगालील कृष्णन् कृष्ण मेनन

[ पृ. २३ वरून चालू ]

खरोखर नेहरू आणि मेनन यांचे संबंध विचित्र होते. परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत मेनन हे नेहरूंचे एकमेव सल्लागार. अलिप्ततावादाचे धोरण घडवायला नेहरूंइतकाच मेननचा हातभार लागला. परराष्ट्रीय धोरणातले महत्त्वाचे निर्णय नेहरू मेननना विचारल्याशिवाय कधी काही करीत नसत. मेननवर जेव्हा जेव्हा वार होत, तेव्हा तेव्हा खऱ्या पाठीराख्याप्रमाणे नेहरू ढालीप्रमाणे सारे वार स्वत: झलीत. फक्त हंगेरीप्रकरणी आणि चिनी आक्रमणाच्या वेळीच—जेव्हा चुकीची जबाबदारी दोघांवरही, विशेषत:, नेहरूंवर जास्त असताना नेहरूंनी मागे पाय घेऊन एकट्या मेननवर वार पडू दिले. राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी अशा करणीची गरजच असते म्हणा !

## ते 'प्रेशर' कुकर्स

१९५७ मध्ये श्री. कृष्ण मेनन मुंबईतून लोकसभेवर निवडून गेले आणि नेहरूंनी आपल्या या प्रिय मित्राकडे-सल्लागाराकडे-संरक्षणखाते सोपविले. लोकसभेचे तिकीट द्यायला मुंबई काँग्रेसने नाराजीच दाखवली होती. पण नेहरूंच्या आग्रहाने मेननना तिकीट मिळाले.

संरक्षण हा विषय श्री. मेनन यांना नवखा नव्हता. ब्रिटनमध्ये त्यांनी लष्करी विषयांचा कसून अभ्यास केला होता. त्यावर अनेक मान्यवर प्रबंधही लिहिले होते. त्यामुळे हे खाते त्यांना मिळताच त्यांनी झपाट्याने कामाला सुरुवात केली. सैनिकांचे पगार आणि इतर सोयी वाढवून त्यांनी सैनिकांत लोकप्रियता मिळवली. ब्रिटिशांच्या शिस्तीत आणि परंपरेत तयार झालेल्या भारतीय लष्करावर सँढर्स्टच्या लष्करी शाळेतून आलेल्या जनरल्सचा ठसा होता. हा सँढर्स्टचा अभिमान काढून टाकून त्या जागी खरा भारतीय अभिमान त्यांनी लष्करी अधिकाऱ्यांत भिनवला ही गोष्ट कुणीही मान्य करील. भारतीय लष्करात ब्रिटिशांनी मुद्दाम जाती-जमातींवर उभारलेल्या शीख, मराठा, रजपूत, जाट अशा रेजिमेंट्स् उभारून फूट पाडून ठेवली होती. लष्कराची ही जातीय विभागणी संपूर्ण बदलण्याची कृष्ण मेनन यांची योजना होती. पण काही जनरल्सच्या विरोधामुळे ती पूर्ण सफल झाली नाही.

त्यांच्या कारकीर्दीतच भारताचे संरक्षण उत्पादन दुपटीने वाढले. जेट फायटर्स, रिकॉईललेस गन्स, रणगाडाविरोधी तोफा, जीप्स, ट्रक्स आणि आणखी कितीतरी युद्धसाहित्य प्रथमच भारतात बनू लागले. गोष्टी भराभर उरकण्याकडे श्री. मेनन यांचा कल होता. त्यांच्या या घाईच्या हाकाटीमुळे अनेक वरिष्ठ अधिकारी नाराज

होत. संरक्षण कारखान्यांची यंत्रे चोवीस तास चालावीत म्हणून त्याच यंत्रांवर त्यांनी आणखी काही वस्तू बनवावयास सुरुवात केली. सैनिकांची केस कापण्याची यंत्रे आणि उंच प्रदेशात उपयोग करण्यासाठी हायप्रेशर कुकर्स. या गोष्टी पूर्वी परदेशांतून आयात कराव्या लागत; पण नेमक्या याच बाबतीत त्यांच्यावर टीकेची प्रचंड झोड उठली.

त्याचप्रमाणे लष्करातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रमोशन देताना ते खूप ढवळाढवळ करीत. मेनन आपली माणसे पुढे सरकवतात, असा त्यांच्यावर आरोप होता. तर प्रमोशन्स देताना सिनिऑरिटीपेक्षा अनुभव आणि पात्रता अशा कसोटया मी लावतो, असे मेनन यांचे म्हणणे होते. पण त्यामुळे लष्कराच्या वरच्या थरात त्यांच्याविरुद्ध चांगलाच असंतोष माजला होता.

चीन आणि तिबेट या प्रश्नांवरील त्यांची वेळोवेळची वक्तव्येही अतिशय संदिग्ध आणि संशय उत्पन्न करणारी होती. प्रथम चीनने आक्रमण केलेच नाही, नंतर चीनने थोडासाच निर्जन भाग व्यापला आहे, अशी त्यांची आणि नेहरूंची चिनी आक्रमण झाकण्याची पराकाष्ठा, झटपट लष्करी कारवाई करण्याची कुचराई यांमुळे लोकांतील त्यांच्याविषयीचा संशय वाढतच होता. १९६२ साली चीनने मोठ्या प्रमाणावर सीमा ओलांडली. भारतीय सैन्याचा बेसावधपणा उघडा पडला. आणि आतापर्यंत साचत आलेल्या जनतेतील असंतोषाचा स्फोट झाला. एक पक्ष, एक व्यक्तीच नव्हे तर सारे राष्ट्रच श्री. मेनन यांच्यावर खवळून उठले आणि मोठ्या वेगाने सत्तेच्या पायऱ्या चढत असलेले श्री. मेनन एकाएकी बाजूला फेकले गेले. जनतेच्या मनातील त्यांची प्रतिमा कायमची डागाळली.

**पक्षपाती धोरण**

चीन, तिबेट आणि हंगेरी या प्रकरणी श्री. मेनन यांची संदिग्ध वक्तव्ये, रशियाची उघड उघड बाजू घेणे, चिनी आक्रमणाबद्दल बराच काळ गुप्तता राखणे, यांमुळे त्यांच्या अलिप्ततावादाचे पितळ उघडे पडले. सुएझ कालव्याच्या वेळी श्री. मेनन यांना ब्रिटन आणि फ्रान्सचा वसाहतवाद दिसत होता. हंगेरियन क्रांती क्रुश्चेव्हने

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
**शर्मा स्वीट मार्ट**
दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

क्रूरपणे दडपली तिकडे मात्र श्री. मेनन यांनी सोयीस्करपणे डोळेझाक का करावी? अमेरिकेच्या डोळ्यातले त्यांना कुसळ दिसत होते. मग रशियाच्या डोळ्यातले मुसळ का दिसू नये? श्री. मेनन यांच्या अलिप्ततावादाला डाव्या बाजूला जोराची मुरड बसली होती हे स्पष्ट दिसते. एकदा ही गोष्ट स्पष्ट झाली, की, श्री. मेनन यांनी पाश्चात्त्य साम्राज्यवादावर चढविलेले हल्ले हे एकतर्फी आकसाने चढविलेले वाटतात.

तीच गोष्ट चीनविषयीची. पाकिस्तानला नंबर एकचा शत्रू मानणारे आणि त्याच्या प्रत्येक हालचालीकडे डोळ्यात तेल टाकून नजर ठेवणारे श्री. मेनन चीन-विषयी एवढे निर्धास्त का होते? बरे, १९५९ साली चिनी आक्रमणाचे गांभीर्य जाहीर झाल्यावर श्री. मेनन यांनी स्वतःही त्या आक्रमणाचे 'पाठीत खुपसलेला खंजीर' असे वर्णन केले होते. तरीही १९६२ पर्यंत सेना कशा गाफील राहिल्या? या प्रश्नाची उत्तरे जसे नेहरू देऊ शकले नाहीत, तसे स्वतः श्री. मेननही. चीनला पुन्हा पुन्हा चुचकारण्याचे धोरण नेहरूंनी अवलंबिले त्यामागे श्री. मेनन यांचाही मोठा हात असला पाहिजे.

त्यांच्या या एकतर्फी अलिप्ततावादामुळे आणि चीन प्रकरणामुळेच लोकांच्या मनात त्यांच्याविषयी कडवटपणा निर्माण झाला आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेचे लोकांना प्रचंड आकर्षण वाटत असूनही लोक त्यांचा तिरस्कार करतात. त्यांना घाबरतात. तडफेने लवलवणाऱ्या एखाद्या जातिवंत नागराजाप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्त्व वाटते. विजेसारखी त्यांची बुद्धिमत्ता जेवढी आकर्णक, तेवढेच त्यांच्या अंतरंगातील विष दाहक वाटते.

## काँग्रेस पक्षात स्थान नाही

१९६२ साली श्री. मेनन सत्तास्थानापासून दूर झाले. नेहरू गेल्यानंतर राज-कारणातला त्यांचा मोठा आधार नाहीसा झाला. श्री. मेनन यांची देशातल्या कुठल्या एका भागात राजकीय मुळे रुजली गेली नसल्याने नेहरू हाच केवळ त्यांचा आधार होता; परंतु श्री. मेनन अद्याप राजकारणातून बाजूला गेलेले नाहीत. जागतिक राजकारणाचा सखोल अभ्यास आणि त्यांच्याएवढी समज असणारे भारतीय पुढारी आता फारच कमी राहिले असतील. त्यांचे कितीही दोष असोत, त्यांचा कितीही द्वेष होवो, त्यांची कितीही हेटाळणी होवो, पण त्यांच्यात एक असे काही रहस्यमय आकर्षण आहे, की ते माणसाला त्यांच्याकडे खेचतेच. आज सत्तास्थानावर नसलेल्या कोणत्याही पुढाऱ्याच्या आणि कित्येक केंद्रीय आणि राज्यमंत्र्यांच्या भाषणांपेक्षा श्री. मेनन यांच्या भाषणांना जास्त गर्दी जमते. मुंबईच्या सुमारे दीड लाख लोकांनी त्यांना मुंबईतून लोकसभेचे तिकीट मिळावे, म्हणून सह्यांचा अर्ज केला. त्यांच्या या काटेरी व्यक्तिमत्त्वातही कुठेतरी आकर्षकपणा दडला आहे.

श्री. मेनन हे निर्व्यसनी आहेत. अतिशय कृश आणि उंच आकृती, हातात काठी आणि पाय घासत घासत चाललेली त्यांची मूर्ती पाहून वाटते, की म्हातारा थकला आहे. भाषण करण्यापूर्वी तर ते अर्धमेल्याप्रमाणे खुर्चीवर पडलेले असतात. पण एकदा माईकसमोर उभे राहिले, की आग ओकू लागतात. त्यांच्या अस्खलित इंग्रजी वाणींच्या शब्दाशब्दांतून त्यांचा गाढा अभ्यास, विषयाची जबरदस्त पकड, विद्युल्लतेसारखी चमकणारी बुद्धिमत्ता जाणवते.

श्री. मेनन जरी निवडून आले तरी सध्याच्या परिस्थितीत त्यांना एखादे सत्तास्थान मिळणे कठीणच. एक बुद्धिमान पुढारी स्वतःच्या मतांमुळे भारताला आता जवळ जवळ पारखा झाला आहे. मुंबई काँग्रेसचे लोकसभेचे तिकीट देण्याच्या वेळी जी खळबळ माजली त्यावरून सत्ताधारी गोटात त्यांची उरलेली किंमत ध्यानात येते.

## मेनन आणि पत्रकार

स्वभावाप्रमाणेच श्री. कृष्ण मेनन यांचा विनोद काटेरी आणि बोचरा असतो. तो त्यांचा विनोद नसतो, तर इतरांवर काढलेला राग तरी असतो किंवा स्वतःच्या डोक्यातला वैताग तरी बाहेर आलेला असतो.

संयुक्त राष्ट्रसंघात असताना त्याच्या डोक्यातील एका रक्तवाहिनीची शस्त्रक्रिया करण्यात आली. रक्ताची गोठून गोळी कुठे तरी अडकली होती. शस्त्रक्रियेनंतर दोन-तीन दिवस त्यांनी दाढी केली नव्हती. दोन दिवसांनंतर काही पत्रकार त्यांना भेटायला आले. काही तरी बोलायचे म्हणून एकजण त्यांना म्हणाला – " दाढी केल्यावर तुम्हांला जरा बरं वाटेल –"

त्यावर मेनन एकदम खेकसले –" माझं सोडा–माझ्याकडे पाहणाऱ्यांनाच अधिक बरं वाटेल."

वार्ताहरांशी त्यांची नेहमीच झडते. एकदा संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेला जाण्यासाठी मेनन विमानाने न्ययॉर्कला जाताना वाटेत लंडनला उतरले होते. पहाटे पहाटेच पिंजारलेले केस सावरीत मेनन विमानातून उतरत आहेत हे बघताच वार्ताहरांनी त्यांना घेरले.

एका अमेरिकन वार्ताहराने सरळच विचारले, "–आर यू ए कम्युनिस्ट ?"

आपली लांब काठी त्या वार्ताहराच्या नाकावर रोखीत मेननी उलट विचारले, "– आर यू ए फॅसिस्ट –?"



# यूल ब्रायनर

हॉलिवुडचा
तगडा
नायक

" काय म्हणतेस, हीरोच्या डोक्यावर केस नाहीत ?"

"हो ग, खरंच सांगते मी ! तुझा विश्वास बसत नसेल तर स्वतः जाऊन खात्री कर. न्यू एम्पायरला त्याचा 'दि किंग अँड आय्' हा चित्रपट लागलाय्."

अशाच प्रकारचे संवाद ज्या वेळी यूल ब्रायनरची नायकाच्या भूमिकेकरिता निवड झाली त्या वेळी हॉलिवूडच्या परिसरात ऐकू येत होते. डोक्यावर एकही केस नसलेल्या अवस्थेत तो पडद्यावर येणार असल्याची बातमी वाचून लोकांनी खूप टीका केली. चित्ररसिकांत या बातमीने खळबळ माजविली. डोक्याचा अगदी गोटा असलेला नायक प्रेक्षकांवर आपला कसा काय प्रभाव पाडू शकेल अशी जबरदस्त शंका प्रत्येकाच्या मनाला चाटून जात होती. जेव्हा यूलचा "दि किंग अॅन्ड आय्" हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा "पाहू तर या कसा काय दिसतो तो ?" या उद्देशाने प्रेक्षक सदर चित्रपट पाहावयास गेले. चित्रपट पाहून जव्हा प्रेक्षक चित्रपटगृहाबाहेर पडले, तेव्हा साऱ्यांचे एकच मत पडले, "वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा अभिनेता ! डोक्यावर केस नसले म्हणून काय झाले ? त्याच्या डोळयांत आगळीच चमक आहे. त्याची डौलदार चाल, त्याचे हावभाव, त्याचा चेहरा, दणकट बांधा, सारे काही आकर्षक व प्रभावी आहे. त्याच्यांत जबरदस्त आकर्षणशक्ती आहे."

चित्रपटातील आपल्या पहिल्याच पदार्पणात यशस्वी ठरलेल्या यूल ब्रायनरची कुळकथा मोठी गंमतीदार आहे. कारण, त्याबाबत त्याला स्वतःला जी माहिती आहे ती त्याने संपूर्णपणे केव्हाही व कोणालाही सांगितलेली नाही. त्यामुळे त्याच्या कुळकथेबद्दलचे गूढ कोणालाही अद्याप उकललेले नाही. उत्सुकता असूनही त्याला स्वतःला त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दल माहिती विचारण्याची कोणाचीही हिंमत होत नाही. याबाबत बोलताना यूल म्हणतो, " माझ्या खाजगी जीवनात दखल देण्याचा अधिकार कोणालाही नाही. मी कोणच्याही खाजगी भानगडीत पडत नाही. मी अभिनेता बनलो आहे त्याचा हा अर्थ नव्हे की माझे खाजगी जीवनही दुसऱ्यांचे बनले आहे. माझी कला सर्वांच्यासाठी आहे, परंतु माझे व्यक्तिगत जीवन केवळ माझ्याकरिताच आहे."

## उमेदवारीची वर्षे

अशा या यूल ब्रायनरचा जन्म ११ जुलै, १९२० रोजी रशियामधील साखलीन बेटावर झाला. त्याचे वडील रशियन असून व्यापारी होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीसच ते रशियामध्ये येऊन राहिले होते. ज्या वेळी त्यांनी आपला मुक्काम सैबेरियाहून चीनमधील पेकिंग येथे हलविला त्या वेळी शिक्षणाकरिता यूलला पॅरिसला पाठविण्यात आले. फ्रान्समध्ये जेमतेम दोन वर्षे शिकल्यानंतर वयाच्या

तेराव्या वर्षी यूलने संगीतकार म्हणून एका संचात प्रवेश केला. त्यानंतर सर्कसमध्येही डोंबाऱ्यापासून तो मूक नाट्यातील अभिनेत्यापर्यंतची कामे त्याने केली. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी त्याने सर्कसला रामराम ठोकला.

पॅरिसमधील मॅच्युरीन्स थिएटरमध्ये जॉर्जेस् व लुडमिला पिटोक यांच्या नाटक कंपनीत बिनपगारी उमेदवार म्हणून यूल कामाला राहिला. रंगभूमीवर काम करताना त्याने त्यातील सारे बारकावे टिपले. अर्थोत्पादनाकरिता पॅरिसच्या रेस्तोरांमध्ये नि कॅफेमध्ये तो गाणी गात असे व आपले रशियन वाद्य वाजवीत असे. याशिवाय त्याने आपले राहिलेले शिक्षणही त्याच काळात पूर्ण केले व बी. एस्. ही पदवी संपादन केली.

१९४१ मध्ये यूल अमेरिकेला आला. सर्कसमध्ये झोक्यावरून पडल्यामुळे फ्रान्समध्ये त्याला मिलिटरीत प्रवेश मिळू शकला नव्हता. मॉस्को आर्ट थिएटर ग्रुपबरोबर यूल अमेरिकेत आला; परंतु ज्या वेळी सदर संच युरोपला गेला तेव्हा मात्र यूल त्यांच्याबरोबर न जाता अमेरिकेतच राहिला. त्याला 'व्हॉईस ऑफ अमेरिके'चा फ्रेंच भाषेचा अनाऊन्सर म्हणून नोकरी मिळाली. १९४२ मध्ये अनाऊन्सरची नोकरी सांभाळून त्याने आठवड्याला २५ डॉलर पगारावर टेलिव्हिजनवर दिग्दर्शक व अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शेक्स्पीयरचे "ट्वेल्थ नाईट" हे नाटक करणाऱ्या संस्थेबरोबर त्याला अमेरिकेचा दौरा करण्याची संधी मिळाली. न्यूयॉर्कला परतल्यावर टेलिव्हिजनवर त्याचा "अॅट होम" हा दीड तासाचा कार्यक्रम होऊ लागला व तो चांगलाच लोकप्रिय ठरला.

१९४५ मध्ये ब्रॉडवेच्या रंगभूमीचे द्वार त्याच्यासाठी खुले झाले. "ल्युट साँग–" मध्ये मेरी मार्टिनबरोबर प्रमुख भूमिका करण्याची संधी त्याला मिळाली. पण याच नाटकामुळे त्याला इंग्लंडला जावे लागले. तिथे "डार्क आईज्"मध्ये त्याने काम केले. तो पॅरिसलाही गेला. अमेरिकेला परतल्यावर त्याने टेलिव्हिजनच्या कार्यक्रमात प्रामुख्याने भाग घेण्यास सुरुवात केली.

## ब्रॉडवे जिंकली

"अॅना" या ब्रॉडवेवरील नाटकातील त्याची भूमिका खूपच गाजली. या भूमिकेकरिता त्याला डोनल्डसन अॅवॉर्ड, अॅन्टोनिएटी पेरी अॅवॉर्ड व न्यूयॉर्क क्रिटिक्स् सर्कल अॅवॉर्ड देण्यात आले. याच नाटकात तो प्रथमच गोटा केलेल्या अवस्थेत रंगभूमीवर आला. आणि या यशावर कळस म्हणून की काय त्याच्या "दि किंग अॅंड आय्" या चित्रपटातील त्याची भूमिका कमालीची गाजली. त्याला अमाप लोकप्रियता मिळाली.

चित्रपटात व नाटकात भरघोस यश मिळाले असतानाही यूल ब्रायनरने आपले शिक्षण मात्र पुढे चालूच ठेवले. नॉर्थ-वेस्टर्न विद्यापीठातर्फे त्याने फिलॉसॉफी या

विपयाचे पीएच्. डी. करिता संशोधन केले.

१९५३ मध्ये प. वा. सेसिल वी द मिल या श्रेष्ठ निर्मात्याने " दि किंग अँड आय " हा चित्रपट पाहिला आणि लगेच यूलशी आपल्या " दि टेन कमांडमेंटस् " या महत्त्वाकांक्षी चित्रपटाकरिता करार केला. त्यापूर्वी टेलिव्हिजनवर काम करताना त्याने " पोर्ट ऑफ न्यूयॉर्क " नावाच्या चित्रपटातही भूमिका केली होती. " दि किंग अँड आय " या चित्रपटाने मात्र त्याला दिगंत कीर्ति मिळवून दिली, इतकेच नव्हे तर १९४६ चे अॅकॅडमी अॅवॉर्डही त्यालाच मिळाले.

त्याचा आगामी चित्रपट म्हणजे मिरीश कॉर्पोरेशनकृत युनायटेड आर्टिस्टचा " कास्ट ए जायंट शॅडो " हा होय. या चित्रपटात कर्क डग्लस व सेन्टा बर्गर यांच्याबरोबर यूल ब्रायनर चमकत आहे. इस्राएलच्या भूमिगत सैन्याचा डेप्युटी कमांडर म्हणून यूल ब्रायनर काम करीत आहे. त्याशिवाय मार्लन ब्रॅन्डोबरोबर " मॉरीच्युरी " या चित्रपटांतही त्याने भूमिका केली आहे. पैकी " कास्ट ए जायंट शॅडो " लवकरच भारतात प्रकाशित होणार आहे.

१९४३ मध्ये यूल ब्रायनरचा विवाह व्हर्जिनिया गिलमोर या अभिनेत्रीशी झाला. सुमारे १७ वर्षे संसार केल्यानंतर मात्र या विवाहाची परिणती घटस्फोटात झाली. १९६० मध्ये हा घटस्फोट घेतल्यानंतर यूलने लगेच युरोपच्या डोरीस क्लेनरशी विवाह केला. त्याला पहिल्या पत्नीपासून रॉकी नावाचा मुलगा व दुसऱ्या पत्नीपासून व्हिक्टोरिया नावाची मुलगी अशी दोन अपत्ये आहेत.

लुसेन, स्वित्झर्लंड व न्यूयॉर्क सिटी या तीन ठिकाणी यूलची घरे आहेत. सामाजिक कार्याची त्याला आवड आहे. वाचनाचा त्याला छंद आहे.

अभिनय हा प्रमुख व्यवसाय असलेला यूल अभिनयाविषयी बोलताना तो म्हणतो, " ज्या वेळी मी सेटवर काम करतो त्या वेळी मी यूल आहे हे विसरून जातो. मी भूमिका करीत असलेल्या पात्राशी समरस होऊन जातो. सेटवर जर कोणी मी यूल आहे असा आभास निर्माण केला तरी माझा मूड लागत नाही. " ज्या प्रकारे यूल सेटवर काम करतो तो प्रकार अगदी वाखाणण्यासारखा आहे. प्रख्यात अभिनेता टिरॉन पॉवरच्या आकस्मिक मृत्युमुळे " सॉलोमन अॅन्ड शिबा " या चित्रपटाच्या नायकाच्या भूमिकेकरिता यूलची निवड करण्यात आली. यूलने अगदी तत्परतेने, अत्यंत अल्पावधीत सदर चित्रपट पूर्ण होण्यास मदत केली. भूमिकेत तद्रूप होऊन अभिनय करण्याची त्याची हातोटी पाहून निर्माते व दिग्दर्शक चकित होऊन गेले. प्रेक्षकही त्याच्या जिवंत अभिनयामुळे प्रभावित होतात. म्हणूनच त्याच्या प्रत्येक नव्या चित्रपटाकडे रसिक प्रेक्षकांचे लक्ष लागून राहिलेले असते. " कास्ट ए जायंट शॅडो "ची यूलचे चाहते उत्कंठापूर्वक वाट पाहत असतील, यात नवल ते कोणते !

—अशोक प्रभाकर आंग्रे

## सरळ कथेवरील ढोबळ निर्मिती
# छोटा भाई

अशी 'भाभी' कधी झाली नाही; असा 'देवर' कधी जन्मालाच आला नाही. दीर-भावजयीच्या अमर प्रेमाची कहाणी आहे 'छोटा भाई'ची. शरद्चंद्रांच्या कादंबरीवरून 'ऑलिम्पिक पिक्चर्स' या मद्रासी संस्थेने काढलेला सुबोध मांडणीचा हा कौटुंबिक चित्रपट त्याच्या आगळेपणाने लक्ष वेधून घेतो.

निर्माते मद्रासी असले तरी 'मद्रासी टच' नाही. चित्रपट कौटुंबिक असला तरी 'भारताच्या थोर परंपरेची महान कौटुंबिक गाथा' वगैरे काही नाही. ही आहे एका कुटुंबातील भावसंघर्षाची कथा. एका दिवाणजीचा संसार कसा सुरेख चाललेला असतो. अन्नपूर्णेसारखी प्रेमळ, लाघवी बायको असते. अन्नपूर्णेला स्वत:चा मुलगा असतोच, शिवाय रामूसारखा खट्याळ, निष्पाप छोटा दीर असतो. मुलांना प्यायला मलईचे दूध, जेवायला खीरचपाती, खेळायला भलेमोठे घर, शिवाय 'हनुमाना'सारखा एडका. सगळे कसे मजेत चालू असते. दृष्ट लागण्यासारखा संसार असतो. पण एका सकाळीच अन्नपूर्णेच्या आईच्या रूपाने या सुखी संसारात 'इव्हिल' शिरते व तणतणाटाला, भांडाभांडीला, लपवाछपवीला सुरुवात होते. छोटचा रामूविषयी आकस घेऊन आलेली आई दोघा भावांत वैर निर्माण करते. त्यांच्यामध्ये फूट पाडते. ती यशस्वी होतेही. पण तात्पुरती. अंती रामू व भाभीचे प्रेमच सर्वश्रेष्ठ ठरते. दोन्ही भावांतील वाटण्या कोलमडतात, मधली कुलूपे तुटतात, 'इव्हिल' बाहेर पडते व सुखासमाधानाचा संसार चालू होतो.

या सिध्या कथेची सरळ मांडणी करून दिग्दर्शक आत्मा यांनी एक हृदयस्पर्शी चित्रकथा बनविली आहे. तामिळ भाषेतील चित्रपटांचे अनेक सन्मान घेऊन हिंदीमध्ये पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा हा पहिलाच चित्रपट त्यांच्या कौशल्याचे काहीच बारकावे दाखवत नाही. त्या अर्थाने त्यांचा हा चित्रपट फारच ढोबळ व गुळगुळीत आहे. पण कथा-निवेदनाची त्यांनी वापरलेली सरळसोट पद्धत मूळ कथेतील भावसंघर्षाचा परिणाम वाढविते.

असल्या कथेवरील चित्रपटांच्या यशाचे मोजमाप हृदयाला जाऊन भिडणाऱ्या त्यांतील प्रसंगांच्या क्षमतेवर अवलंबून असते. त्याला इतर कलात्मक दर्जाच्या पट्ट्या लावून चालणार नाहीत. किती वेळा प्रेक्षकांची छाती दाटून येते, स्त्रियांनी जवळ बाळगलेले रुमाल किती ओले होतात, किती हुंदके फुटतात, याची नोंद घेतली तर हा चित्रपट जमला आहे असेच म्हणावे

लागेल. आधीच्या सुखी संसाराचे किंवा नंतर बिघडलेल्या संसाराचे चित्र आत्मा यांनी चांगले उभे केले आहे. प्रसंग एका मागोमाग वरचढ कौटुंबिक संघर्षाने येतात, अत्युच्च टोकाला पोचतात व संघर्ष संपतो. ही मांडणी व्यवस्थित झाली आहे. पण रामूचा पुत्रवत् सांभाळ करण्याचे वचन दिलेली अन्नपूर्णा व तिचा लळा लागलेला रामू यांच्यामध्ये निर्माण झालेल्या विलक्षण प्रेमाचे हृद्य दर्शन चित्रपटात हवे त्या प्रमाणात झालेले आढळत नाही. छोट्या रामूच्या बाल भावभावनांचे मनोरम चित्र शरदचंद्रानी कादंबरीत रंगविले आहे म्हणे. चित्रपटात परंपरागत प्रसंगांनी त्याचे खोडयाळ रूप दाखविले आहे.

चित्रपटातल्या मोठेपणात खरा वाटा आहे नूतन व महेशकुमार यांच्या अभिनयाचा. नूतनचे अभिनयसामर्थ्य अफाट आहे हेच खरे. तिने हा चित्रपट फार वर नेऊन पोचविला. सगळे बेताचेच असलेल्या या चित्रपटात ती विलक्षण चमकून दिसते. छोट्या दीरावरचे अमर्याद प्रेम व कजाग आईचा जाच यांच्यामध्ये होणारा आपला कोंडमारा तिने समर्थपणे दाखविला आहे. रेहमानबरोबरचे छोटेसेच प्रणयप्रसंग तिने अगदी सहजतेने फार सूचक बनविले आहेत. 'अन्नपूर्णे'ची भूमिका खरी मीनाकुमारीस फिट्ट बसणारी. पण मीनाकुमारीचे कारुण्य न आणता तिचा सगळा साज नूतनने 'अन्नपूर्णे'ला चढविला आहे.

महेशकुमारनेही रामूच्या कामात कृत्रिमता टाळली आहे. स्वभावतःच कपाळावर ओघळलेले केस व गोंडस चेहरा यांमुळे तो खरोखरीचा खट्याळ, लाघवी, लळा लावणारा वाटतो. त्याचे काम अकृत्रिम बनण्यास मदत होते इंदरराज आनंद यांच्या संवादांची. उगाच प्रौढांचे संवाद म्हणणारा समजूतदार मुलगा त्यांनी उभाच केला नाही. ललिता पवार एक डोळा बारीक करीत करीत कजाग खाष्ट आई उभी करते.

लक्ष्मीकांत प्यारेलालनी गाण्यांना साध्या पण वेधक चाली दिलेल्या आहेत. गाणी कमीच आहेत. वाद्यांचा फारसा बडीवार ठेवलेला नाही. पार्श्वसंगीतात सुखी संसारावेळच्या बासरीचा किंवा नंतरच्या तणातणीच्या काळातील व्हायोलीनचा वापर ते ते प्रसंग खुलवितो. संगीतात असाधारण काहीच नाही.

खून नाहीत. हाणामारी नाही. उन्मादक दृश्ये नाहीत. नाच आहेत म्हणायचे मुलांच्या नीटस धांगडधिंग्याला. गाणी आहेत म्हणायचे देवांच्या प्रार्थनांना किंवा सणांच्या गीतांना. 'छोटा भाई' एक वेगळी, सात्त्विक चव देऊन जातो. ●

# राशी भविष्य : श्री. गो. जोशी : सायनाचार्य, नाशिक

दिनांक १० डिसेंबर ते १६ डिसेंबर १९६६

**मेष:**– मंगळ तुमचें आराध्य दैवत. तो षष्ठांत आहे – हवातसा आहे. विरोधकांना ठोकरून काढायला आता मुळीच कचरू नका. साडेसाती, चौथा गुरू वगैरे निराशाजनक विचार डोक्यातून काढून टाका. एक लक्षात ठेवा दुर्बलांनाच ग्रह छळतात.

दि. १६ ला सूर्य भाग्यस्थानी येताच एक नवा पर्वकाल सुरू होईल. तुमच्या कृतीकडे आणि उक्तीकडे लोक आदराने, कौतुकाने पाहू लागतील. दि. १२ ची अमावास्या संपताच सारा आसमंत उत्साहाने ओसंडून येईल. ईशकृपा आणि ग्रहांचे सामर्थ्य यांची शिदोरी पाठीशी बांधून वाटचाल करू लागतात तर उज्ज्वल भविष्यकाल फारसा दूर नाही याचा साक्षात्कार घडू लागेल. प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, मंगलकार्यात हिरीरीने भाग घ्यावा लागेल. १३-१४-१६ यशस्वी दिवस.

**वृषभ:**– यापुढे तरी निदान वृषभराशी व्यक्ती सतत आघाडीवर राहाव्यात, अशीच नियतीची इच्छा दिसते. ग्रहस्थितीचा चमत्कारच बघावयाचा असेल, तर दि. १५–१६ पासून तुमचे प्रत्येक पाऊल पवित्र्यातच पडत आहे, अशी जाणीव व्हायला लागेल. कर्तृत्वाला धार चढेल, बुद्धी कुशाग्र बनेल, प्रतिष्ठेची उंची हिमालयाएवढी वाढेल.

दगदग, धावपळ सतत करावी लागेल. त्याला उपाय नाही. ती तुमच्या पाचवीलाच पुजलेली आहे. पण या वेळच्या परिश्रमाचे श्रेय असे पदरी पडेल की, ते पाहून तुमच्या हितशत्रूंचे धाबे दणाणून जाईल. व्यावसायिक यश अपेक्षेबाहेर लाभेल. थोरांची कृपा कोणत्याही क्षणी लाभेल. प्रत्यक्ष लाभ जरी फारसा पदरी पडला नाही तरी लाखे मोलाची प्रतिष्ठा लाभेल. दि. १५–१६ सर्वोत्तम काल.

**मिथुन:**– मंगळासह हर्षलही चतुर्थात ही ग्रहस्थिती वैचारिक संघर्ष आणि स्फोटक प्रवृत्ती निर्माण करणारी असते. कसेही वागले, कितीही चांगले केले तरी गैरसमज निर्माण होतच राहतील आणि आपल्या कमजोर परिस्थितीचा हितशत्रू फायदा उठवण्याचा प्रयत्न करतील. संयम, शांतता आणि मौन हाच या अनिष्टतेवर रामबाण इलाज समजला जातो.

दि. १२, विशेषत: दि. १५ नंतर ही अनिष्टता कमी होऊ लागेल. त्यानंतरच हरवलेले स्वास्थ्य गवसेल. न होण्यासारखी कामे भराभर व्हायला लागतील.

वनस्थ गुरूची कृपा अगदी ऐन आणीबाणीच्या काली उपयोगी पडेल.

सध्याच्या कालात आव्हान देणे आणि आवाहन करणे या दोन्हीही गोष्टी प्रकर्षाने टाळा. मंगलकार्ये थाटात पार पडतील. अनेक जिवलगांच्या भेटीगाठी होतील. दि. १४ ते १६ विशेष अनुकूल काल.

**कर्क**:– कर्केचा वैभवसंपन्न गुरू तुमच्या राशीतून संचारत आहे. एवढी एकच गोष्ट तुमच्या चारित्र्याला उत्थान द्यायला पुरेसी आहे. समर्थांशी तुमचे घनिष्ठ संबंध आहेत, हे पाहूनच जग तुमच्याकडे आदराने पाहू लागेल.

प्रगतीची प्रसादचिन्हे गेल्या आठवड्यापासूनच दिसायला लागलेली असतील आणि या आठवड्यापासूनच काही भव्य–दिव्य करावे अशा ऊर्मी अंतःकरणात निर्माण व्हायला लागतील.

परस्थांच्या भेटीगाठी होतील, सांसारिक नाजूक समस्या सुटायला लागतील, कलाक्रीडा क्षेत्रांत नवे विक्रम निर्माण केले जातील. आणि राजकीय आखाड्यात तर तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही. असे अपेक्षासाफल्याचे क्षण जीवनात क्वचितच निर्माण होत असतात.

दि. १४-१५-१६ अनेक अपेक्षा सफल व्हाव्यात.

**सिंह**:– सध्याची ग्रहस्थिती फारशी अनुकूल नसतानाही तुम्ही आपले उच्च स्थान टिकवून आहात् यातच तुमच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचे दर्शन घडते. चारित्र्यसंपन्न व्यक्तीच्या वाटेला ग्रहही फिरकू शकत नाहीत हेच खरे ! निर्वार-निष्ठेचे व्रत आचरणाऱ्याला ग्रहही टरकून असतात !

खर्च खूप वाढेल, जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. पण नेत्रदीपक यश निश्चित पदरी पडेल. गेलेला पैसा आणि हरवलेले स्वास्थ्य काही प्रमाणांत तरी मिळवू शकाल. तुमच्या सावधानतेने हितशत्रूंच्या कारस्थानांना आळा बसेल, उद्योगधंद्यांचे क्षेत्र विशाल बनेल. निवडणुकीच्या आखाड्यात उतरलात तर प्रतिस्पर्ध्याला नेस्तनाबूत कराल. आवश्यक इतका पैसा कोठूनही हाती येईल. दि. १३–१४–१५ अपेक्षा सफल होतील.

**कन्या**:– तुमच्या राशीचा मंगळ आता तुमच्या प्रगतीच्या आड यायचे धाडस करणार नाही. त्याचा हृदयपालट झाल्यासारखे दिसेल. एकादश गुरूचे प्रचंड सामर्थ्य पाठीशी उभे असताना कोणताही अनिष्ट ग्रह तुमच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याचेही साहस करू शकणार नाही. हे दिवस पूर्णत्वाने अपेक्षासाफल्याचे नसले तरी अनिष्ट-अपयशाचे खासच नाहीत. प्रयत्नांची शिकस्त करून, जिवाचे रान करून यश पदरी पाडून घ्यावे लागेल.

दि. १५ च्या आसपास प्रकृतीची कुरकुर जाणवायला लागेल. अंतःकरणात बऱ्या-वाईट विचारांचे तुफान सुरू झाल्याने नेमके काय केले म्हणजे अपेक्षेप्रमाणे घडेल हे कळेनासे होईल. शक्यतो दूरचा प्रवास टाळा आणि वादविवादापासून चार हात सदैव दूरच राहा. दि. ११–१४–१६ अनुकूल दिवस.

**तूळ:–** बाराव्या मंगळाची उग्र कारकीर्द अजूनही २२ जानेवारीपर्यंत आहे. यामुळे सध्याचे दिवस अपेक्षेप्रमाणे स्वास्थ्याचे आहेत असे मीच काय, पण कोणीही म्हणू शकणार नाही. तरीसुद्धा गुरू-सूर्याच्या कृपेने या अनिष्ट कालावरही आपण मात करू शकाल, असा मला विश्वास वाटतो. सध्या दैव आणि प्रयत्न यांचा तुमच्या अंतर्मनात तीव्र झगडा सुरू आहे. हार-जीत कोणाची हे जरी सांगणे कठीण असले तरी अविश्रांत परिश्रमांचे मोल निसर्गाला पदरी टाकावेच लागेल. तात्पर्य, अपयशाचा हा काल नव्हे– दगदग मात्र खूपच जाणवेल.

खर्चाचे अंदाजपत्रक साफ चुकेल. आखीव वेळापत्रक खोटे ठरू लागेल. इष्ट-मित्रांची सहानुभूती ढामणे कठीण जाईल. पण नडणार नाही कुठेच. वेळ निभावून जाईल. दि. १३–१४–१६ अनुकूल व लाभदायक काळ.

**वृश्चिक:–** वैज्ञानिक संशोधन, कला, काव्य ही तुमची खास क्षेत्रे. त्या क्षेत्रात काही दिव्य–भव्य करावे, जगाच्या नजरा आपल्यावर खिळाव्यात असे काही घडवून आणावे अशा तुमच्या अंतःकरणात ऊर्मी नेहमी उठत असतात. त्या साऱ्यांना आकार येऊ लागेल. आताच भाग्यस्थ गुरूची ही सारी किमया. दूरचे प्रवास घडतील. मंगल कार्ये थाटामाटात निर्विघ्नपणे पार पडतील. ज्या ज्या तुमच्या असफल आशाआकांक्षा असतील त्या त्या पूर्णांशाने सफल व्हायला लागतील.

या कालात तुम्ही कुठेही गेलात, काहीही केलेत तरी तुमचे सर्वत्र स्वागत घडू लागेल. तुमच्या जीवनातील अत्युत्तम कालखंडापैकी हा एक आहे. दि. १४ ते २६ विशेष अनुकूल काळ.

**धनू:–** शुक्राने तुमच्या राशीत पाऊल टाकले त्या क्षणापासून तुमच्या प्रगत जीवनाच्या आशा अंकुरायला लागल्या. दि. १४ च्या बुध-गुरू त्रिकोणाचे तर आपणांस असे आवर्जून सांगणे आहे की, जे काही करायचे आहे ते आताच करा. संधी फक्त एकदाच दार ठोठावते. त्याक्षणी तिची दखल घेतली गेली नाही तर ती पुन्हा दिसणार नाही. जिवाभावाचे मित्र– अनंतकाल ज्यांचे हार्दिक सहकार्य लाभेल– आताच लाभतील. त्यांचे लाखमोलाचे सहकार्य लाभेल. डुबलेला धंदा पुन्हा ठाकठीक उभारला जाईल, दृष्टिक्षेपात येणाऱ्या प्रगतीच्या अनंत वाटांपैकी एखादी वाटही तुम्हांला तुमच्या इच्छित स्थलाकडे न्यायला समर्थ ठरेल.

हाती बराच पैसा येईल. मंगलकार्ये थाटात पार पडतील. दि. १४ ते १६ अनुकूल काळ.

**मकर:**– अचाट कर्तृत्वाचे ग्रह सूर्य आणि मंगळ यांनी तुमच्यावर कृपा करायचे ठरविल्यावर आणखी काय हवे ? या वेळी आपण थोडासा प्रयत्न करायला अवकाश. यश 'घे घे' म्हणून पाठीशी लागेल.

बढतीचे योग स्पष्टपणे यायला लागतील. स्थानांतर–स्थित्यंतर, कदाचित परदेशगमनही घडेल. नवे कार्यक्षेत्र गवसेल. राजकीय क्षेत्रात तर तुमचाच आवाज सर्वत्र उठून दिसू लागेल.

याच कालात प्रिय जनांच्या गाठीभेटी होतील. इष्टमित्र सहकार्याला धावून येतील. भंगलेल्या आशाआकांक्षा बेमालूमपणे सांधल्या जातील. एकंदरीत जीवनात एक नवा पर्वकाळ सुरू होत आहे. त्याचा योग्य तो उपयोग करून कृतार्थ व्हा.

दि. १० ते १२ अनेक गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडाव्यात.

**कुंभ:**– सध्या शुक्रासारखा तेजस्वी ग्रह एकादशस्थानी आहे. आणि अनेक ग्रह एकादशस्थानाकडे वाटचाल करू लागलेले आहेत. एवढे सामर्थ्य पाठीशी उभे असल्यावर आठव्या मंगळाची दखल घ्यायची गरजच काय ?

हा आठवडा खूपच धाईगर्दीचा जाणवेल. असंख्य कामांचे डोंगर उपसावे लागतील, अनेकांच्या भेटीगाठी घ्याव्या लागतील, सांस्कृतिक कार्यक्रमात हिरीरीने भाग घ्यावा लागेल. निवडणुकीसाठी सतत दौरे काढावे लागतील. आणि ग्रहांचा कौल अनुकूल मिळालेला असल्यामुळे हे सारे प्रयत्न अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील.

थोडेफार प्रकृतीला जपायला हवे. शांततेने व शिस्तीने कामे केलीत तर यशाबद्दल निश्चित राहायला मुळीच हरकत नाही. दि. १३–१४ विशेष अनुकूल काळ.

**मीन:**– सातव्या मंगळाने तुम्हांला आव्हान दिलेले आहे. पण गुरु-शुक्रादी अनेक ग्रहांचा आपणांस पाठिंबा असल्यामुळे त्याला तुम्ही प्रत्याव्हान देऊ शकता. दगदग, धडपड पुष्कळ करावी लागेल, पण अंगीकृत कार्यातील यश अपेक्षेबाहेर पदरी पडेल.

भागीदारीचे व्यवहार करणाऱ्या व्यक्तींना मात्र हे दिवस खूपच कटकटीचे, मतभेदाचे जाणवतील. कसेही प्रसंग येवोत कोर्टात म्हणून पाऊल टाकायचे नाही, अशी प्रतिज्ञा करा. तरच या प्रसंगामधून निभावून जाल.

धाडसी व साहसी व्यवहार अंगाशी येतील. लोकांना अधळपधळ अभिवचने द्यायचे तर प्रकर्षाने टाळा.

हा काळ तसा वाईट नाही. पण अपेक्षेप्रमाणे चांगला नाही. सावधानता बाळगा. दि. १२ ते १४ काहीसे अनुकूल दिवस.

● ● ●

## 'सिंडिकेट'ची कामराज यांच्यावर मात! : [ पृष्ठ ७ वरून ]

निवडणुकीला आगळा रंग चढणार आहे तो या अर्थानें.

दिल्लीमध्ये या हालचाली चालू असतानाच मुंबईतील असंतुष्ट काँग्रेसजनांनी पाटील यांच्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्याचा केविलवाणा प्रयत्न करून पाहिला. ए. बी. महाडेश्वर, प्रभाकर कुंटे, दीनानाथ कामत प्रभृतींनी नुकतीच एक बैठक बोलावून मेनन यांच्या उमेदवारीला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

मुंबई प्रदेश काँग्रेसमधील तिकिटवाटपातील गटबाजीच्या राजकारणावर या मंडळींनी यथेच्छ टीका केली. इतकेच नव्हे तर या निमित्ताने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व मुंबई प्रदेश काँग्रेस यांच्या विलिनीकरणाचा आग्रही . पुरस्कार करण्यात आला. या असंतुष्ट काँग्रेसजनांचा बोलविता धनी कोण आहे हे न सांगताही कळण्यासारखे आहे. नाईक यांचे मंडळाविरुद्ध बंड पुकारून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला बदनाम करण्याचा मुंबई प्रदेश काँग्रेसमधील आजच्या सत्तारूढ कार्यकर्त्यांनी प्रयत्न करून पाहिला होता. मेनन यांच्या उमेदवारीविरुद्ध पाटील दिल्लीत आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत असताना मुंबई प्रदेश काँग्रेसमध्येच त्यांच्याविरुद्ध एक मोठा गट निर्माण झाला आहे हे भासविण्याचा हा प्रयत्न आहे. परंतु येथे दिल्लीत या बंडाची कोणी दखल घेतली नाही. कारण या गटाची ताकद किती मामुली आहे हे काँग्रेस श्रेष्ठांना माहीत आहे.

एकीकडे हे निवडणुकीचे वारे वाहत असताना गोहत्याबंदीचे आंदोलनही उग्र रूप धारण करीत आहे. या आंदोलनाची केंद्र सरकारकडून आज जी उपेक्षा होत आहे ती बरीच महाग पडेल असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. विशेषत: ऋषिस्वरूप ब्रह्मचारी यांच्या निधनामुळे या आंदोलनाची उग्रता वाढण्याचा दाट संभव आहे. गोहत्याबंदीचे तत्त्व आणि मागणी मान्य असताना त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार एवढी खळखळ का करीत आहे, याचाच या निरीक्षकांना उलगडा होत नाही.

संयुक्त महाराष्ट्र, नागाप्रदेश, स्वतंत्र आंध्र, पंजाबी सुभा या मागण्यांबाबतही आधी हट्टी असलेले काँग्रेसश्रेष्ठ निदर्शनाचा, उपोषणाचा व लोकक्षोभाचा रेटा बसताच पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतात हा अनुभव काही नवा नाही. पं. नेहरूंसारख्या अनभिषिक्त सम्राटाच्या वेळच्या या कथा. मग आता तर केंद्रसत्ता अगोदरच दुर्बळ झालेली आहे. शिवाय केंद्रीय नेत्यांतही डावे आणि उजवे असे दोन प्रच्छन्न गट पडले आहेत. अशा परिस्थितीत एखादे मेनन-प्रकरण खपून जाईल. परंतु साधु-आचार्यांच्या आत्मक्लेशामधून आणि आत्मार्पणामधून धारदार बनत चाललेले गोहत्याबंदीचे आंदोलन हीच येत्या दीडदोन महिन्यांतील केंद्र सरकारची मुख्य डोकेदुखी ठरण्याचा संभव आहे. कोणी सांगावे कदाचित आज क्षुल्लक वाटणाऱ्या या घटनाच उद्याच्या सत्तास्पर्धेच्या राजकारणाला नवा अर्थ आणून देतील. ●




# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

प्रसिध्दिपूर्व ग्राहकांनी आपल्या प्रती कार्यालयातून
लवकर नेण्याची व्यवस्था करावी.


राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल…

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९